नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १९० * * नागपूर * शनिवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बिहारनंतर आता देशभरात एसआयआर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :**
बिहारनंतर निवडणूक आयोग आता देशभरात टप्प्याटप्प्याने विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) (शब्दशः मतदार यादी पडताळणी) करेल, असे निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.
पीटीआयच्या वृत्तानुसार, २०२६ मध्ये विधानसभा निवडणुका होणाऱ्या राज्यांमध्ये एसआयआर सुरू होईल. पहिल्या टप्प्यात आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये मतदार यादी पडताळणी होईल. आयोगाच्या मते, मतदार यादी अद्ययावत करणे आणि परदेशी नागरिक, मृत व्यक्ती किंवा स्थलांतरित झालेल्यांसारखे अवैध मतदार काढून टाकणे हा त्याचा उद्देश आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### नोबेलऐवजी फुटाणा, ट्रम्प झाला उताणा...

आपल्याकडे एक म्हण आहे त्याचा हिंदी तजुर्मा असा आहे की, 'बिन मांगे मोती मिले, मांगे मिले ना भिक' या उक्तीनुसार न्याय झाल्याचे उदाहरण आज दिसले आहे. जगात अजूनही शहाणे लोक आहेत, हे नोबेलच्या परीक्षकांनी सिद्ध करून टाकलेले आहे कारण, अमेरिकेचा अत्यंत उतावळा आणि नोबेल साठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेला ट्रम्प नावाचा अध्यक्ष, मला नोबेल द्या हो, मला नोबेल द्या हो असे म्हणत टाहो फोडत होता. आपणच भारत-पाकिस्तानचे युद्ध थांबवले. हा दावा त्याने किमान चार डझन म्हणजे ४८ वेळा केला, प्रत्यक्षात जागतिक बातम्यांच्या दूरचित्र वाहिन्या असे म्हणतात की, हा दावा त्यांनी किमान २०० वेळा केला आहे. अलीकडे व्हाईट हाऊस मधील नोकर असे बोलतात की, मी भारत पाकिस्तानचे युद्ध थांबवले असे ट्रम्प झोपेत असला तरी दररोज रात्री बरळत होता. त्यासोबतच मला शांततेचे नोबल द्या, मला शांततेचे नोबेल द्या असेही ट्रम्प मधून मधून झोपेतच बोलत होता. पण असा हा झोपेतही अशांत असलेला ट्रम्प कितीही झोपेत असला तरी नोबेल देणारे परीक्षक मात्र जागृत होते. या ट्रम्प नावाच्या अशांत माणसाला नोबेल का मिळणार नाही हे नोबेलच्या परीक्षकांना बरोबर माहीत होते. कारण तो फक्त अशांत नाही तर लोकांना छळण्यामध्ये एक नंबरचा युक्तीकांत होता आणि आहे, हे संपूर्ण जग ओळखून चुकलेले आहे. आता भविष्यात अशी माहिती येऊ शकते की नोबेल देणा?या परीक्षकांना अमेरिकेत यायचे असेल. तर त्यांच्या प्रत्येक व्यवहारावर हाच ट्रम्प तात्या १००% टेरिफ लावणार आहे. अमेरिकेच्या इतिहासात एवढा उथळ आणि नालायक माणूस एकदा नव्हे तर दोनदा अध्यक्षपदी निवडून आला यावरून अमेरिकन लोकांची बुद्धिमत्ता फारच खालच्या पातळीवर गेलेली आहे की काय असा संपूर्ण जगात संभ्रम निर्माण झालेला आहे. ट्रम्प साहेबांना नाकारले गेल्यामुळे नोबेल पारितोषक किती बोगस आहे असा शोध आपले रागाने फुगलेले टम साहेब (माफ करा) ट्रम्प साहेब लवकरच लावू शकतील, किंवा (विश्ववसनीय सूत्रांच्या आधारे) लावणार आहेत. आता इस्त्राईलच्या नेत्यान्याहूने ट्रम्प यांना फोन करून आपली शोक संवेदना व्यक्त करावी किंवा प्रकट करावी. त्यासोबतच पाकड्यांचा वाकडा सैन्य प्रमुख असीम याने आपल्या अश्रूंची फुले करून त्याला पाठवावी. कारण, अमेरिकन अध्यक्षांचा हितचिंतक असलेल्या भारताबरोबर या ट्रम्पने ज्या प्रकारचे वर्तन केलेले आहे. त्यामुळे आमच्या भारतातील तेहतीस कोटी देवदेवतांनी ट्रम्पला जो शाप दिलेला आहे त्याच्या पापाचेच हे फळ आहे असे आम्हाला वाटते. ट्रम्प साहेब नाराज होऊ नका जरा वाचा किंवा ऐका, यावर्षी आम्ही महासागरचा कर्मवीर पुरस्कार जाहीर करीत आहोत. या चार पुरस्कारापैकी एक पुरस्कार रोख रुपये २५०००/- आहे आणि आम्ही तो ट्रम्प यांना तो देणार आहोत. वाटल्यास किंवा जमल्यास ते मोटरसायकल वरून आले तरीही त्यांच्या पेट्रोलचा खर्च आम्ही सहज देऊ शकतो. शेवटी पुरस्कार तो पुरस्कार आणि नोबेल पेक्षा आम्ही काय लहान आहोत का? आमचे नाव महासागर आहे, आम्ही महासागर आहोत म्हणजे अनेक देश आमच्याही आमच्याशी संबंधित आहेत. सर्व देशांच्या शुभेच्छा 'आमच्या महासागरच्या' पाठीशी आहेत. त्यामुळे पुढल्या नोबेलची वाट पाहण्यापेक्षा या डोनाल्ड ट्रम्प यांनी अत्यंत शांतपणे नोबेल देवीची पूजा करावी आणि आमच्या महाराष्ट्रातील कोकण प्रांतातला एक नारळ अत्यंत शांतपणे एखाद्या देवीच्या चरणी फोडावा. त्याच्यानंतर त्यांनी कोकणातल्या एखाद्या देवीसमोर, 'आई माझी सत्याची...' म्हणून गा?हाणे मांडावे. फोडण्याचा नारळ त्यांनी म्हणजेच ट्रम्प तात्यांनी त्यांच्या स्वतः:च्या डोक्यावर फोडला तरी आमची हरकत नाही. वाटल्यास किंवा तिकडे नारळ मिळत नसल्यास आम्ही विदर्भ, मराठवाडा किंवा मुंबईपासून कुठूनही नारळ खरेदी करून कुरिअर सुद्धा करू शकतो याची त्यांनी नोंद घ्यावी. आम्ही आता मनापासून ट्रम्प साहेबांना नोबेल भेटले नाही त्याबद्दल सध्याच्या नियुक्त नोबेल कमिटीचा जाहीर निषेध करत आहोत आणि यापुढे ट्रम्प यांना नोबेल कमिटीचे काम सोपवावे, अशी शिफारस करत आहोत. ट्रम्प यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# ओबीसींच्या विराट मोर्चाने उपराजधानी दणाणली!




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१० :**
नागपूरमध्ये सकल ओबीसी समाजाने आयोजित केलेल्या भव्य महामोर्चातून सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. मराठा आरक्षणासंदर्भातील २ सप्टेंबरचा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्याची प्रमुख मागणी या मोर्चातून करण्यात आली. हा मोर्चा यशवंत स्टेडियमपासून सुरू होऊन संविधान चौकात सभेत रूपांतरित झाला.
मोर्चाचे नेतृत्व काँग्रेस नेते आणि माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केले. ते म्हणाले की, आम्ही मराठा आरक्षणाच्या विरोधात नाही, परंतु ओबीसींच्या हक्कांवर कुणाचीही गदा येऊ देणार नाही. या मोर्चात विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून हजारो ओबीसी बांधव, समाजनेते आणि संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले.
मोर्चेकऱ्यांनी आरोप केला की, सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतल्यामुळे ओबीसींच्या आरक्षणावर थेट अतिक्रमण होत आहे. त्यामुळे हा जीआर रद्द करून ओबीसींचा आरक्षण हक्क कायम ठेवावा, अशी मागणी त्यांनी केली. या आंदोलनामुळे राज्यातील ओबीसी विरुद्ध मराठा आरक्षण संघर्ष पुन्हा चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**राज्यभरातील ओबीसी सहभागी**
राज्यातील ओबीसी समाजाने नागपूरमध्ये भव्य महामोर्चाचे आयोजन केले. हा महामोर्चा यशवंत स्टेडियम येथून सुरू होऊन संविधान चौकात संपणार आहे. मोर्चात विदर्भासह राज्यभरातील ओबीसी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.
सकाळपासूनच मोचार्साठी मोठी गर्दी होत असल्याने नागपूर पोलिसांनी वाहतूक व्यवस्थेसाठी विशेष बंदोबस्त ठेवला होता. आयोजकांनी मोर्चा शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्याचे आवाहन केले होते.
ओबीसी समाजाच्या नेत्यांचे म्हणणे आहे की, राज्य सरकारच्या २ सप्टेंबरच्या जीआरमुळे ओबीसी आरक्षणाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे ओबीसींच्या शिक्षण, नोकरी आणि राजकीय आरक्षणावर परिणाम होईल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.
या आंदोलनाला राज्यातील विविध ओबीसी संघटना, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ आणि माजी प्रशासकीय अधिकारी यांनी पाठिंबा दर्शविला. तातडीने निर्णय मागे घेऊन ओबीसी समाजाचा विश्वास संपादन करण्याचे आवाहन नेत्यांनी केले आहे.

### तर, मुंबई, पुणे, ठाणे जाम होणार?

या मोर्चात बोलताना काही नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली.
फडणवीस सरकार ३७४ ओबीसी जातींच्या भरवशावर निवडून आले आहेत. त्यामुळे ते आमचा डीएनए ओबीसी असल्याच्या बढाया मारतात. सत्ता प्राप्त झाल्यानंतर ते ओबीसी समाजाला विसरले आहेत. मनोज जरांगे यासारख्या अशिक्षित व्यक्तीला नतमस्तक झाले आहेत.मराठा समाजाला ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याचा षडयंत्र करीत आहेत . ओबीसींच्या मानगुटीवर बसून मराठा समाजाला ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत, अशी टीका काँग्रेस नेते व या सकल ओबीसी महामोर्चाच्या आयोजनात पुढाकार घेतलेले काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली केली.
राज्य सरकारने जर ओबीसी आरक्षणाचा प्रश्न तात्काळ सोडवला नाही, तर पुढील टप्प्यात मुंबई, ठाणे आणि पुणे शहर जाम करण्याची आमची तयारी आहे. मोर्चाचा समारोप संविधान चौकात झाला. शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या आंदोलनात राज्यभरातून हजारो ओबीसी बांधवांनी सहभाग घेतला.
मोर्चासाठी यशवंत स्टेडियम आणि संविधान चौकात व्यासपीठ उभारण्यात आले होते. स्टेजवर २ सप्टेंबरचा काळा जीआर रद्द करा आणि ओबीसी आरक्षणाचा हक्क ओबीसी आरक्षण बचाव असे फलक झळकावण्यात आले होते.
काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, समन्वय समितीचे सदस्य उमेश कोराम आणि काँग्रेस नेते रवींद्र दरेकर यांनी मोर्चाच्या तयारीचा पुढाकार घेतला होता. या मोर्चात ओबीसी नेते लक्ष्मण हाके, अनिल देशमुख यांच्यासह अनेक नेते सहभागी झाले होते.

नागपूर शहरात उभारणार

## जागतिक दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर

स्पेनच्या फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य करार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१० :**
नागपुरात सर्व सोयी सुविधांनीयुक्त जागतिक दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यात येणार आहे. याबाबत स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी नागपूरला उभारण्यात येणारे कन्व्हेन्शन सेंटर'साठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जुळलेली असण्याची सूचना केली.
यावेळी भारतातील राजदूत जुआन अँटनियो, फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पायोनियर एक्झिबिशन अँड कॉन्व्हेन्शन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अरोरा आणि उपाध्यक्ष जीत अरोरा, नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर उपस्थित होते.
फडणवीस म्हणाले, नागपुरात प्रस्तावित असलेले कन्व्हेन्शन सेंटर केवळ प्रदर्शने, कार्यक्रम आदींसाठी नव्हे तर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी हक्काचे व्यासपीठ असावे. नागपूरचा इतिहास या कन्व्हेन्शन सेंटरच्या माध्यमातून येथे आलेल्या प्रत्येकाला कळावा. अशी सेंटरची अंतर्गत रचना असावी. हे सेंटर अत्यंत आकर्षक, आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त आणि पर्यावरण पूरक वास्तूचे मूर्तिमंत उदाहरण ठरावे.
स्पेनचे राजदूत म्हणाले, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांच्यात चांगले संबंध आहेत. यामुळे दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत होत आहे.

## व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया मचाडोंना शांततेचा नोबेल ट्रम्पचा पत्ता कट

■ **वृत्तसंस्था, स्टॉकहोम, दि. १० :**
व्हेनेझुएलातील विरोधी पक्षनेत्या मारिया मचाडो यांना व्हेनेझुएलामध्ये लोकशाही हक्कांना चालना देण्यासाठी आणि हुकूमशाहीतून लोकशाहीकडे शांततापूर्ण संक्रमण साध्य करण्यासाठी अथक प्रयत्नांसाठी नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.
नोबेल पारितोषिक समितीने म्हटले आहे की, हुकूमशाही राजवटीमुळे व्हेनेझुएलामध्ये राजकीय हालचाली अत्यंत कठीण आहेत. मचाडो यांनी सुमाते ही संघटना स्थापन केली, जी लोकशाहीच्या सुधारणेसाठी काम करते. त्यांनी देशात मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी सातत्याने वकिली केली आहे.
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प अनेक महिन्यांपासून नोबेल पुरस्कारासाठी दावेदारी करत होते, परंतु नोबेल समितीने त्यांची पुरस्कारासाठी निवड केली नाही.
विजेत्याला ११ दशलक्ष स्वीडिश क्रोनर (१०.३ कोटी), एक सुवर्णपदक आणि एक प्रमाणपत्र मिळेल. जर एकापेक्षा जास्त विजेते जिंकले तर बक्षीस रक्कम त्यांच्यामध्ये विभागली जाईल. १० डिसेंबर रोजी ओस्लो येथे पुरस्कार प्रदान केले जातील.

### हंगेरियन लेखक लास्झलो यांना साहित्याचे नोबेल

या वर्षीचा साहित्यातील नोबेल पुरस्कार हंगेरियन लेखक लास्झलो क्रास्नाहोरकाई यांना जाहीर झाला आहे. स्वीडिश अकादमीने या पुरस्काराची घोषणा केली.
स्वीडिश अकादमीने म्हटले आहे की, लास्झलो यांच्या रचना खूप प्रभावशाली आणि दूरदर्शी आहेत. जगात दहशत आणि भीती असतानाही ते कलेच्या शक्तीचे प्रदर्शन करतात. त्यांना ११ दशलक्ष स्वीडिश क्रोनर (१०.३ कोटी रुपये), सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र मिळेल. हे पुरस्कार १० डिसेंबर रोजी स्टॉकहोममध्ये प्रदान केले जातील.
लास्झलो यांच्या पुस्तकांवरून चित्रपट बनवले गेले आहेत. लास्झलो क्रास्नाहोरकाई हे हंगेरीच्या सर्वात प्रतिष्ठित समकालीन लेखकांपैकी एक आहेत.

दैनिक **महासागर**
आयोजित


स्व. सुरेश भट

स.न.वि.वि.
सुरेश भट महाराष्ट्राचे थोर गीतकार आणि मराठी विश्वात 'गझल' या लोकप्रिय विधेला जनमानसांपर्यंत पोचविणारे अफलातून व्यक्तिमत्त्व! स्व. सुरेश भट यांना १९७४ साली दैनिक महासागरच्या कार्यकारी संपादक पदावर आमंत्रित करुन त्यांना अमरावतीहून नागपुरला प्रस्थापित केले. त्यांच्या गझल प्रेमाचा बहर नागपूर शहरातच उगम पावला. आता या गझलेने मराठी साहित्य विश्वाला व्यापून टाकले आहे.
अशा गझल संप्रदायाचे आद्यगुरु सुरेश भट यांच्या गझलांना हिन्दी विश्वात परिचित करण्यासाठी त्यांचे अंतरंग शिष्य गझलकार **प्रदीप निफाडकर** यांनी **मराठी गझल के उस्ताद सुरेश भट और...** पुस्तक लिहिले असून ते हिन्दी साहित्य अकादमीने प्रकाशित केले आहे.
त्याचे प्रकाशन मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष माननीय **अक्षयकुमार काळे** यांचे शुभहस्ते संपन्न होईल. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यविश्व प्रेमी **डॉ. गिरीश गांधी** उपस्थित राहतील.
प्रकाशनानंतर **श्री. शाम जैन व श्रीमती श्रुती जैन** यांच्या सुमधुर गायनाचा गीत गझल संध्या हा कार्यक्रम होईल. भट यांच्या विविध गीतांच्या सोबतच भट यांच्या आठवणींना उजाळा देण्यात येईल.
हा कार्यक्रम **बनयन हॉल (Banyan Hall), चिटणवीस सेंटर, नागपूर येथे रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ६.३० वाजता** आयोजित केला आहे. आपण रसिक आहातच. उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

कार्यक्रम व्यवस्था
Ruturang Entertainment
BHAKTI JADHAV PRODUCTIONS

|| विनीत ||
श्रीकृष्ण चांडक यू.एस. लाल राहुल चांडक
आणि समस्त महासागर परिवार

## एकनाथ शिंदे योगेश कदमांवर नाराज?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१० :**
पुण्यातील कुख्यात गुंडाच्या भावाला शस्त्र परवाना देण्याचा निर्णय घेतल्याप्रकरणी अडचणीत आलेले गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर उपमुख्यमंत्री तथा सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांच्यावर नाराज झाल्याची चर्चा आहे.
योगेश कदम यांनी आज शिंदेंची भेट घेण्यासाठी सकाळीच त्यांचा बंगला गाठला. पण तिथे त्यांना तब्बल २ तास बसवून ठेवण्यात आले. यामुळे कदम यांचा पाय खोलात गेल्याचा दावा केला जात आहे. योगेश कदम हे कुख्यात गुंड नीलेश घायवळ याचा भाऊ सचिन घायवळ याला शस्त्र परवाना मंजूर केल्याप्रकरणी अडचणीत सापडलेत. विशेष म्हणजे पुणे पोलिसांनी नकारघंटा वाजवल्यानंतरही कदम यांनी ही फाईल पुढे रेटली. त्यामुळे विरोधकांनी विशेषतः ठाकरे गटाने टीकेची झोड उठली आहे.

## सावित्री जिंदाल देशातील सर्वात श्रीमंत महिला

■ **वृत्तसंस्था, हिसार, दि. १० :**
हरियाणातील हिसार येथील आमदार आणि ओपी जिंदाल ग्रुपच्या प्रमुख सावित्री जिंदाल या फोर्ब्स इंडिया रिच लिस्ट २०२५ नुसार भारतातील सर्वात श्रीमंत महिला ठरल्या आहेत. ३९.६ अब्ज डॉलर्सच्या एकूण संपत्तीसह, त्यांनी मुकेश अंबानी आणि गौतम अदानी यांच्यानंतर भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये तिसरे स्थान मिळवले आहे.



आता सावित्री जिंदाल जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये ४८ व्या क्रमांकावर आहेत. यापूर्वी एप्रिलमध्ये, फोर्ब्स अब्जाधीशांची यादी (मानकानुसार, ज्यांची एकूण संपत्ती किमान १ अब्ज अमेरिकन डॉलर्स म्हणजेच ८,३०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे) २०२५ मध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यावेळी सावित्री जिंदाल यांची एकूण संपत्ती ३५.५ अब्ज डॉलर्स होती.

## राजकारणात गुंडगिरी नको

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :**
कोथरूडमधील अलीकडील गोळीबारानंतर घायवळ गँगचा म्होरक्या नीलेश घायवळ आणि त्याच्या टोळीच्या कारवायांमुळे खळबळ उडाली आहे.



योगेश कदम यांनी नीलेशचा भाऊ सचिन घायवळ याला शस्त्र परवाना दिल्याचा आरोप होत असतानाच, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी भूमिका मांडली आहे. पुण्यात आज झालेल्या राष्ट्रवादी परिवार मिलन कार्यक्रमानंतर अजित पवार माध्यमांशी बोलत होते.
पत्रकारांनी नीलेश घायवळ आणि सचिन घायवळ यांच्या संदर्भात विचारले असता त्यांनी स्पष्ट सांगितले की, मी स्वतः पोलिस आयुक्तांना सांगितले आहे, कोण कोणत्या पक्षाचा, कोणाचा कार्यकर्ता, कोणाच्या जवळचा आहे, हे काहीही बघायचे नाही. ज्याने कायदा हातात घेतला असेल, नियम मोडले असतील, त्याच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी, असे अजित पवार म्हणाले. कायद्यापुढे सर्व समान आहेत, आणि या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप सहन केला जाणार नाही. कायदा सर्वांसाठी समान आहे. कोणी मंत्री, कार्यकर्ता, किंवा कोणत्याही पक्षाचा असो, पुण्यात गुंडगिरी वाढू देणार नाही, असे ते म्हणाले.



# ठाकरे बंधूंच्या युतीचा मुहूर्त ठरला!

## बीएमसीची निवडणूक जाहीर होताच होणार घोषणा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० : मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची राजकीय आघाडी केव्हा होणार? असा प्रश्न सध्या अवघ्या महाराष्ट्राला पडला आहे. त्यातच आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या गत १० दिवसांत ३ बैठका झाल्या आहेत. या बैठकांत मुंबई महापालिकेची निवडणूक जाहीर होताच या दोन्ही पक्षांच्या युतीची घोषणा करण्याचा निर्णय झाल्याची माहिती आहे.

महाराष्ट्रात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी आपापली मोर्चेबांधणी केली आहे. शिवसेनेचा ठाकरे गट व मनसे यांनीही मराठीच्या मुद्यावर एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, उद्धव व राज ठाकरे यांच्यातील सुसंवाद वाढला आहे.

पण या दोघांच्या पक्षांच्या युतीची अधिकृत घोषणा अद्यापही झाली नाही. पण आता ती लवकरच होण्याचे संकेत मिळत आहेत. वृत्तानुसार, मुंबई महापालिकेची निवडणूक जाहीर होताच या दोन्ही पक्षांच्या





राजकीय युतीची घोषणा केली जाईल.

सद्यस्थितीत मनसे व ठाकरे गटाची युती आकार घेण्यास सुरुवात झाली आहे. मागील १० दिवसांत संजय राऊत व राज ठाकरे यांच्यात तब्बल ३ बैठका झाल्यात. संजय राऊत यांनी शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन या भेटी घेतल्याची माहिती आहे.

युतीची चर्चा ही केवळ जागावाटपाच्या फॉर्म्युल्यापर्यंत मर्यादित नसते. तर प्रचारात कोणते मुद्दे असणार? किमान समान कार्यक्रम काय? दोन पक्षांच्या युतीत एखादा नवा पक्ष घ्यायचा काय? अशा विविध मुद्यांवर या चर्चेत उहापोह होतो. त्यामुळे संजय राऊत हे राज व उद्धव यांच्यात दुवा म्हणून काम करत आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, मनसेसोबत युती करण्याच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी वरुण सरदेसाई, अनिल परब आदी नेत्यांच्या खांद्यावर जबाबदारी टाकली आहे. पण जागावाटपाच्या चर्चेत काही पेच फसल्यास उद्धव व राज ठाकरे तथा संजय राऊत हे तीन नेते हा पेच सोडवण्याचा प्रयत्न करतील. कारण, या दोन्ही पक्षांचे मतदार जवळपास एकसारखेच आहेत. पुण्यात उद्धव ठाकरे गटाकडून वसंत मोरे, आदित्य शिरोडकर हे दोघे जागावाटपाची चर्चा करतील असे सांगितले जात आहे.

मनसे नेते अमित ठाकरे यांनी या प्रकरणी आपल्या पक्षाच्या नेत्यांच्या विभागवार बैठका घेतल्या आहेत. त्यात कोणत्या जागा मागायच्या? याची चाचपणी करण्यात आली. स्वतः मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबई शहर अध्यक्ष संदीप देशपांडे यांच्याशी संवाद साधला आहे.

त्यांच्यासोबत या मुद्यावर विस्तृत चर्चा झाली. ठाकरे गटाचे नेते ठाणे व पुण्यात शरदचंद्र पवार पक्षाला सोबत घेण्याच्या विचारात असल्याचीही माहिती आहे.

## लोकांना कर्जमाफीचा नाद



■ मुंबई: अतिवृष्टीमुळे शेतकरी कमालीच्या संकटात सापडला आहे. त्यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी लोकांना कर्जमाफीचा नाद लागल्याचे वादग्रस्त विधान केले आहे.

जळगावच्या चोपडा येथे एका बँकेच्या शाखेचे उद्घाटन झाले. यावेळी बाबासाहेब पाटील यांनी वरील वादग्रस्त विधान केले. ते म्हणाले की, लोकांना कर्जमाफीचा नाद लागला आहे. आम्हाला निवडून यायचे आहे. त्यामुळे निवडणुकीत आम्ही काहीतरी आश्वासन देतो. निवडणुकीच्या काळात कुणी गावात नदी आणून द्या अशी मागणी केली, तर त्यालाही गावात नदी आणून देण्याचे आश्वासन दिले जाते. त्यामुळे लोकांनी काय मागायचे? हे ठरवले पाहिजे.

दुसरीकडे, बाबासाहेब पाटील यांच्या या विधानावर आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणी बाबासाहेब पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, शेतकऱ्यांना कर्जमाफीचा नाद लागलाय, निवडून येण्यासाठी आश्वासन द्यावी लागतात, असं वक्तव्य करून राज्याच्या सहकारमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केलं. हे अत्यंत संतापजनक विधान आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचा नाद नाहीय तर नैसर्गिक आपत्ती आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळं शेतकरी उध्वस्त झालाय, त्यामुळं कर्जमाफी करून दिलासा द्यावा, माफक अपेक्षा असल्याचे ते म्हणाले.

## सगळ्यांना हाणले नाही तर, जयंत पाटील नाव नाही..




■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १० : भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि त्यांच्या कुटुंबीयांविषयी अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केल्यानंतर निर्माण झालेल्या वादावर आता स्वतः जयंत पाटील यांनी मौन तोडले आहे. इस्लामपूरमध्ये आयोजित मुलाखतीच्या कार्यक्रमात त्यांनी या सर्व घडामोडींवर भाष्य केले. त्यांनी पडळकरांना अप्रत्यक्षपणे सडेतोड इशारा दिला.

जयंत पाटील म्हणाले की, वेळ येईल तेव्हा आम्ही या सगळ्यांना उत्तर देऊ, तोपर्यंत वाट बघा. टप्प्यात आल्यावर करेक्ट कार्यक्रम होणारच. मी मागेही म्हटले होते की, आपले नाव ऐकले नाही असे एकही गाव नाही आणि सगळ्यांना हाणले नाही तर जयंत पाटील माझे नाव नाही.

त्यांच्या या वक्तव्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. त्यांच्या या भाषणातून त्यांनी पडळकरांना थेट नाव न घेता इशारा दिला आणि आपल्या शांततेचा अर्थ भीती नसल्याचे स्पष्ट केले. पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी पडळकरांना समज दिली होती, असे मी ऐकले आहे. मात्र त्यांनी त्यातून काही धडा घेतला का, हे माहीत नाही. माझ्याविरोधात अनेकांनी मिळून चौकशी मागितली, आरोप केले, पण मला काही अडचण नाही. फक्त बोलू नका, माझी चौकशी करा, असे मी सांगतो. एका व्यक्तीने माझ्या आईवडिलांबद्दल गलिच्छ भाषा वापरली आणि त्यानंतर त्या व्यक्तीच्या समर्थनार्थ सगळ्यांनी सभा घेतल्या. भाजपमध्ये असा प्रकार मी कधी पाहिला नव्हता. त्यामुळे आमच्या भागातील जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. लोकांना आता सर्व काही समजले आहे आणि याला उत्तर लोक मतपेटीतूनच देतील, असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, जयंत पाटील यांच्या शांततेवरूनही सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही बाजूंत चर्चा सुरू होती. प्रदेशाध्यक्षपद सोडल्यानंतर तुम्ही शांत का आहात? या प्रश्नावर पाटील म्हणाले की, मी प्रदेशाध्यक्ष असताना मतदारसंघातील जनतेला पुरेसा वेळ देऊ शकत नव्हतो. माझा जनसंपर्क कमी झाला होता. आता ती जबाबदारी नसल्याने मी लोकांमध्ये जाऊ शकतो, त्यांच्या समस्या ऐकू शकतो. त्यांनी यावेळी आपल्या कार्यपद्धतीत झालेल्या बदलाबाबतही भाष्य केले. लोकांच्या प्रश्नांवर उपाय शोधणे हेच आमचे ध्येय आहे. काही जण फक्त बोलत राहतात, पण आम्ही प्रत्यक्ष काम करून दाखवतो, असे सांगत त्यांनी आपल्या राजकीय धोरणाचा रोखही स्पष्ट केला.

## सकाळी अर्ज आणि लगेच संध्याकाळी कुणबी प्रमाणपत्र



मुंबई : सद्यःस्थितीत सकाळी अर्ज केल्यानंतर संध्याकाळी कुणबी प्रमाणपत्र हातात मिळत आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही? हे सांगा, अशी विचारणा ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारला केली आहे.

भाजपने यापूर्वीच ओबीसी हा आमचा डीएनए असल्याचे म्हटले आहे. कारण, त्यांना ७० टक्के ओबीसींनी मतदान केले होते. आता त्यांना या मतदानाची आवश्यकता आहे की नाही याची मला कल्पना नाही, असेही ते म्हणालेत. मराठा समाजाचे यशवंतराव चव्हाण, शरद पवारांपासून विलासराव देशमुख, नारायण राणेपर्यंत अनेक राज्यकर्ते झाले. त्यांनी सगळ्यांना सोबत घेऊन राजकारण केले. सर्वांना विश्वासात घेतले. आत्ता काय चालले आहे? हे समजत नाही. भटक्या विमुक्त व ओबीसी आहेत, त्यांच्यात मोठ्या प्रमाणात चलबिचल व भ्रम निर्माण होत आहे. पुढे काय होणार? हे सांगण्यासाठी मी फार मोठा नेता नाही. मुख्यमंत्री व भाजपचे नेते काय ते पाहतील. ओबीसी हा वर्ग आहे, एक जात नाही. त्यात ३७४ जाती आहेत. कोणत्याही एका जातीसाठी आम्ही लढत नाही. वेगवेगळ्या जातीतील लोक सध्या आत्महत्या करत आहेत. याकडे मी त्यांचे लक्ष वेधू इच्छितो, असे भुजबळ म्हणाले.

सध्या खोटी सर्टिफिकेट सर्रासपणे घेतली जात नाही. सकाळी अर्ज केला की, संध्याकाळी सर्टिफिकेट हातात येत आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कसा धक्का लागत नाही हे आम्हाला सांगा. काल कुणबी समाजाचा मोठा मोर्चा आझाद मैदानावर धडकला. ते खरे कुणबी आहेत. त्यांनी सुद्धा सक्त विरोध केला. आमच्यात चुकीचे कुणबी भरले जात आहेत. आपण सर्वजण काय सुरू आहे ते पाहत आहोत. मग धक्का कसा लागत नाही. तुम्ही जास्त लोक त्यात भरले आणि ते चुकीचे मार्गाने भरले तर धक्का कसा लागत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्यांचे संपर्कमंत्री म्हणून

## माणिकराव कोकाटेंची नियुक्ती

### राष्ट्रवादीकडून संघटन मजबूत करण्याचा प्रयत्न



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० : पावसाळी अधिवेशनात सभागृहात रमी खेळताना दिसलेल्या व्हिडिओमुळे एकदा वादात अडकलेल्या आणि मंत्रीपद गमावलेल्या कोकाटे काही काळ चर्चेत दिसून आले नाही. पण परवाच अजित पवारांनी छगन भुजबळ यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केल्यानंतर आता माणिकराव कोकाटे यांना नाशिकसह ३ जिल्ह्याचे संपर्कमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने ही निवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे. यामुळे आगामी निवडणुकीत नाशिक, धुळे आणि जळगाव या तीन जिल्ह्यातील माणिकराव कोकाटे यांच्या निकटवर्तीयांना संधी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

**पालकमंत्री नसतानाही कोकाटेंची निवड**

नाशिक जिल्ह्यात सध्या पालक मंत्रिपद रिक्त आहे. अशा वेळी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोकाटे यांना नाशिकचे संपर्कमंत्री केले आहे. कोकाटे यांचा नाशिक जिल्ह्यातील दांडगा जनसंपर्क आणि सिन्नरमधून निवडून आलेले आमदार या नात्याने त्यांचा स्थानिक राजकारणात प्रभाव आहे, हेही पक्षासाठी फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.

**भुजबळ डावलले का?**

राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते आणि नाशिकचेच छगन भुजबळ यांना डावलल्याच्या चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. भुजबळ हे नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी इच्छुक होते, शिवाय त्यांचा या भागात दीर्घकाळापासून प्रभाव आहे. तरीही पक्षाने ही जबाबदारी कोकाटे यांच्यावर सोपवली आहे, हे अनेकांच्या भुवया उंचावणारे ठरत आहे.

**शेतकरी उद्धवस्त कोकाटे दुबई-कतार दौऱ्यावर**

राज्यात अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर शेती पाण्याखाली गेलेली असताना आणि शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त झाले असताना, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे हे अधिकाऱ्यांसह दुबई व कतारच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत, असे वृत्त एका मराठी वृत्तपत्राने दिले आहे.

यामुळे ते पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. या दौऱ्याचा सर्व खर्च पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलाच्या वापरातून जमा होणाऱ्या निधीतून करण्यात येणार आहे. राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात असताना, मंत्री महोदयांचा परदेश दौऱ्यावर असताना त्यांच्यावर ३ जिल्ह्याच्या संपर्कमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आल्याने कोकाटे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. दुसरीकडे, आर्थिक संकट लक्षात घेता शासनाने मंत्र्यांच्या दौऱ्यावर बंदी घातली असतानाही कोकाटे सरकारी खर्चाने विदेशात गेलेच कस? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## मराठवाड्यात ४ महिन्यांत २१२ शेतकरी आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० : आमचे शेतकरी कर्जबाजारी आहे. गेल्या ४ महिन्यात मराठवाड्यात २१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. आत्महत्येचे प्रमाण वाढू शकते. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे प्राण महत्त्वाचे नाही का? की मराठवाडा आजही निजामांच्या राजवटीखाली आहे का? आणि त्या निजामांचे बाप महाराष्ट्रावर राज्य करत आहे असे आम्ही समजायचे का? असा सवाल उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.



संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये ज्यांचे सरकार आहे ही लोक निजामांचे बाप आहेत का? निजामांच्या वर मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे शोषण आणि अत्याचार सुरू आहे. तुम्ही थातूर-मातूर घोषणा करतात पण शेतकऱ्यांच्या हाती काहीही पडत नाही, ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. भ्रष्ट्राचाऱ्यांना पोसणारा पक्ष म्हणून भाजपकडे बोट दाखवावे लागेल असा टोला राऊत यांनी लगावला आहे.

भाजपमध्ये गेल्यावर खून, हत्या, गोळीबार असे गुन्हे जर माफ होत असतील तर या देशातील कायद्याचे पुस्तक कामाचे नाही ते जाळावे लागेल, असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे. रामदास कदम यांनी उडवलेली थुंकी त्यांना गिळावीच लागेल, अनिल परब यांनी व्यवस्थितपणे एक भूमिका मांडली आहे. रामदास कदम आणि त्यांचे गृहराज्यमंत्री पुत्र यांनी जे घोटाळे आणि गुन्हे केले आहेत ते चिंतेची गोष्ट असल्याचे ते म्हणाले.

## जरांगेंसमोर सरकार झुकले



मुंबई : मनोज जरांगे चौथी नापास माणसासमोर महाराष्ट्र शासनाने नुसता दबाव नाही स्वीकारला तर लोटांगण घातले आहे. बेकायदा, संविधान विरोधी आणि सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा अवमान करणारा जी.आर २ सप्टेंबरला काढण्यात आला असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. येत्या दोन महिन्यात महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा समाज कुणबी म्हणून ओबीसीमध्ये सामील झालेला असेल आणि जो ओबीसीमधील जाती यांच्या स्पर्धेत कुठेही टिकणार नाही. हे खेदाने नमूद करावे वाटते.

लक्ष्मण हाके म्हणाले की, ओबीसी समाजातील १०-१२ जणांनी आरक्षणासाठी जीव दिला यासाठी महाराष्ट्र सरकार कारणीभूत आहे. त्यांनी हे बळी घेतले आहे. महाराष्ट्र सरकारने ओबीसी हक्काचे संरक्षण केलेले नाही. आता मोर्चा निघत आहे, काही नेते समोर येत आहे, पण आता खूप वेळ झाला आहे. जी.आर पूर्वी जर मोर्चे निघाले असते तर कदाचित सरकारने हा जी.आर काढला नसता, असे हाके यांनी म्हटले आहे.

## तहसीलसमोर फेकली मदतीची रक्कम



■ वृत्तसंस्था, हिंगोली, दि. १० : हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे संपूर्ण पिक उध्वस्त झाले असून शासनाने जाहिर केलेली ८५०० रुपयांची मदत क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी गोरेगाव अप्पर तहसील कार्यालयासमोर फेकून दिली. यावेळी शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

हिंगोली जिल्ह्यात ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, हळद पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोयाबीनचा हाती आलेला घास अतिवृष्टीने हिरावून घेतला असून यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. काही ठिकाणी अल्पभूधारक शेतकऱ्यांना सोयाबीन काढणीचा खर्चही करणे कठीण झाले आहे. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा खर्च कसा करावा तसेच रब्बी हंगामात पेरणी करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या परिस्थितीत शासनाने हेक्टरी ८५०० रुपयांची मदत जाहिर केली आहे. मात्र सोयाबीनचा एकरी काढणीचा दर ४००० रुपये असून त्या शिवाय मळणी व वाहतुकीचा खर्च वेगळा करावा लागत आहे. त्यामुळे शासनाकडून मिळत असलेली मदत तुटपुंजी असल्याने संतापाची भावना निर्माण झाली आहे.

सदर मदत तुटपुंजी असल्याचा आरोप करीत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे आणि पदाधिकाऱ्यांनी आज सकाळी गोरेगाव अप्पर तहसील कार्यालयासमोर एकत्र येऊन शासनाने दिलेल्या मदतीची रक्कम तहसील कार्यालयासमोर फेकून दिली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला.

## सीएम दौऱ्यापूर्वी भाजप नेते मामा राजवाडेंना अटक

**गंगापूर रोड गोळीबार प्रकरण अंगलट**

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १० : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नाशिक दौऱ्याच्या काही तास आधीच नाशिक पोलिसांनी मोठी ॲक्शन घेतली आहे. नुकतेच ठाकरे गटातून भाजपमध्ये प्रवेश केलेले मामा राजवाडेंना गंगापूर रोडवरील गोळीबार प्रकरणात संशयित मानून अटक करण्यात आली.

गंगापूर रोड परिसरात काही दिवसांपूर्वी झालेल्या गोळीबाराच्या प्रकरणात भाजप नेते मामा राजवाडे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे पोलिस तपासातून समोर आले होते. या घटनेत जुन्या वैमनस्यातून दोन जणांवर गोळीबार करण्यात आला होता. सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या या गंभीर गुन्ह्यात आधीच भाजप नेते सुनील बागुल यांचा पुतण्या अजय बागुल याला अटक करण्यात आली आहे. तर इतर काही आरोपी अजूनही फरार आहेत.

तपासादरम्यान मामा राजवाडे यांचे नाव समोर आले आणि नाशिक गुन्हे शाखेकडून त्यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले. पोलिसांनी अनेक तास चौकशी केल्यानंतर रात्री उशिरा त्यांना अटक करण्यात आली. नाशिक क्राईम ब्रँचकडून मिळालेल्या माहितीनुसार, गोळीबारात वापरलेले हत्यार कोणाच्या सांगण्यावरून आणले गेले, याचा तपास सुरु आहे. याच प्रकरणात मामा राजवाडे यांच्या हालचाली संशयास्पद असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. फडणवीस यांच्या दौऱ्याच्या आदल्या रात्री झालेल्या या कारवाईमुळे भाजपच्या स्थानिक नेतृत्वात एकच खळबळ उडाली आहे.

मामा राजवाडे हे पूर्वी ठाकरे गटाचे नाशिक शहर महानगरप्रमुख होते. काही दिवसांपूर्वीच त्यांनी ठाकरे गटाचा निरोप घेऊन भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यावेळी भाजपने त्यांचा प्रवेश मोठ्या उत्साहात केला होता. मात्र, आता त्यांच्या अटकेमुळे भाजपच्या इनकमिंग मोहिमे वर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

राजवाडे हे भाजप नेते सुनील बागुल यांचे निकटवर्तीय मानले जातात. भाजपमध्ये प्रवेश करतानाच राजवाडे यांनी पक्षाच्या प्रदेश नेतृत्वाची भेट घेऊन शुद्धीकरण झाले असा दावा केला होता. पण विरोधकांनी त्यावर तात्काळ टीका केली होती.

## जगभरात दुमदुमली भारताची लोकशाही!



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० : भारताची लोकशाही व्यवस्था केवळ देशापुरती मर्यादित नसून ती जगासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचं प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बाबार्डोस येथे झालेल्या ६८ व्या राष्ट्रकुल संसदीय परिषदेत केलं. त्यांच्या ठाम आणि विचारपूर्ण भूमिकेची आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर दखल घेण्यात आली.

महिला सक्षमीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, दिव्यांग नागरिकांचे अधिकार, आपत्ती काळातील संवेदनशीलता आणि स्थानिक लोकशाहीची ताकद या सर्व विषयांवर त्यांनी मांडलेले विचार अनेक देशांच्या प्रतिनिधींना भावले. बीजिंग संमेलनानंतर महिला सक्षमीकरणात भारताने घडवलेलं लोकशाहीमूल्यांवर आधारित परिवर्तन जगासाठी दिशा दाखवणारं आहे, असे ठाम शब्दांत त्या म्हणाल्या.

एआय संदर्भात बोलताना त्यांनी तंत्रज्ञानाच्या सकारात्मक वापरासोबत त्याचा गैरवापर होऊ नये, यासाठी जागतिक पातळीवर जबाबदारीची चौकट तयार करण्याची गरज व्यक्त केली. सीपीएची पुढील वाटचाल तसेच डिसॲबिलीटी ॲन्ड इन्क्लुसन सत्रातही त्यांनी धोरणात्मक विचार मांडले. महिला, बालक व दिव्यांग नागरिकांच्या संरक्षणासाठी आपत्ती काळात ठोस जागतिक उपाययोजनांची मागणी त्यांनी केली.

लोकशाहीच्या भारतीय मॉडेलवर बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केलं की, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व स्तरांवर शांततामय निवडणुका हे भारताचं लोकशाही बळ आहे. त्यांच्या या भूमिकेचं परिषदेतील विविध देशांतील प्रतिनिधींनी स्वागत केलं.

या अधिवेशनात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभा उपसभापती हरिवंश सिंग, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. भारतीय प्रतिनिधींच्या सक्रिय सहभागात डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या प्रभावी सादरीकरणाने जागतिक व्यासपीठावर भारताची लोकशाही पुन्हा एकदा उजळून निघाली.

## पतित पावन संघटनेची डीसीएम एकनाथ शिंदेंकडे धाव



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० : राज्यात निवडणूकपूर्व राजकीय हालचालींना वेग आला असून आता हिंदुत्ववादी विचारधारेच्या संघटनांचाही सहभाग वाढताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर एका महत्त्वपूर्ण भेटीने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.

राज्यमंत्री योगेश कदम यांच्या पुढाकाराने पतित पावन संघटना पुणे यांचे पदाधिकारी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत सौजन्य भेट घेतली. राज्यातील सामाजिक व धार्मिक घडामोडींवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या भेटीमुळे हिंदुत्ववादी गटांमध्ये नवीन समीकरणांची कुजबुज सुरु आहे.

पतित पावन संघटना ही अनेक दशकांपासून हिंदुत्व, सांस्कृतिक परंपरा आणि राष्ट्रभक्तीची मूल्ये समाजात रुजविणारे कार्य करत आहे. अशा पारंपरिक संघटनेचा शिंदे यांच्या संपर्कात येणं हे केवळ औपचारिकतेपुरतं न राहता राजकीय अर्थाने महत्त्वाचं मानले जाते.

या भेटीद्वारे पतित पावन संघटना आणि शिवसेना हिंदुत्ववादी विचारांच्या विस्ताराला नवे अधिष्ठान मिळेल, असे राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट करताच या हालचालींना अधिक वेग मिळाल्याचे संकेत मिळत आहेत. याप्रसंगी पतितपावन संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# २७५ अवैध प्रवासी वाहनांवर 'आरटीओ'ची कारवाई

### परवाना नियमांचे उल्लंघन

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १० :**

अमरावती विभागात महामार्ग, राज्यमार्ग आणि ग्रामीण रस्त्यांवर नियमबाह्य पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या स्टेज कॅरेज बसेस तसेच अवैध प्रवासी वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या दोषी वाहनांवर दंडात्मक शुल्क आकारून वाहतुकीला शिस्त लावण्याची मोहीम सुरू आहे.

अमरावती ते मोर्शी, वरुड ते पांढुर्णा, मुलताई रस्त्यावरील तसेच परतवाडा ते अंजनगाव, आकोट मार्गे अकोला आणि परतवाडा ते धारणी या प्रमुख मार्गांवर धावणाऱ्या बसेसची तपासणी करण्यात आली. यामध्ये



विनापरवाना वाहतूक, कॉन्ट्रॅक्ट कॅरेज परवान्याच्या शर्तींचा भंग करणाऱ्या, जादा भाडे आकारणाऱ्या तसेच वेळापत्रकाचे पालन न करणाऱ्या बसेसवर कारवाई करण्यात आली आहे.

आरटीओ विभागाने १६ डिसेंबर २०२४ पासून सप्टेंबर २०२५ पर्यंत विशेष तपासणी मोहीम राबवली. १६ डिसेंबर २०२४ ते ३० जून २०२५ या कालावधीत ४२९ वाहने तपासली गेली असून त्यापैकी १४३ दोषी ठरली. या कालावधीत एकूण ७ लाख ७० हजार ७५० रुपये इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. तर १ जुलै २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या तीन महिन्यांत ३९६ वाहने तपासून १३२ दोषी वाहनांवर ७ लाख २७ हजार २५० रुपये इतके दंडात्मक शुल्क आकारण्यात आले आहे. अंदाजे नऊ महिन्यांच्या कालावधीत एकूण ८२५ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी २७५ वाहने दोषी आढळली आहेत. या कारवाईतून १४ लाख ९८ हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे. अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी ही मोहीम यापुढेही सुरूच राहणार असून, दोषी बस मालक व चालकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिला आहे.

तसेच, सणासुदीच्या काळात रस्ते वाहतूक सुरक्षा आणि ज्यादा भाडेवाढ या अनुषंगाने तपासणी मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. सण कालावधीत मुंबई, पुणे यासारख्या महानगरांमधून अमरावतीत येणाऱ्या विद्यार्थी, नोकरदार लोकांची संख्या मोठी असते. अशावेळी प्रवाशांची निकड लक्षात घेऊन प्रचंड भाडेवाढ केली जात असते. दिवाळी सणाच्या वेळी तर हा अनुभव दरवर्षी येतो. आरटीओच्या या कारवाईमुळे प्रवाशांची लूट करणाऱ्यांवर जरब बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा शहरातील श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात सुरू असलेल्या युवा महोत्सवाममध्ये विद्यापीठ परिक्षेत्रांतर्गत येणा-यअमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलडाणा जिल्हांमधील १९५ महाविद्यालयांच्या जवळपास सहा हजार विद्यार्थी कलावंतांनी २८ कला प्रकारामध्ये आपल्या कलेचे उत्कृष्टरित्या प्रदर्शन करित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नावलौकीक केला.लोकवाद्यवृंद, लोक/आदिवासी नृत्य, एकांकिका, प्रहसन, मुकनाट, नकला, पाश्चिमात्य वाद्य संगीत, शास्त्रीय वाद्यसंगीत, (तालवाद्य), शास्त्रीय वाद्यसंगीत (स्वरवाद्य), भारतीय सुगम संगीत, भारतीय समूहगान, भारतीय शास्त्रीय नृत्य, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्थळिचत्र, पोस्टर मेकिंग, व्यंगचित्रे, मातीकला, कव्वाली, रांगोळी, मेहंदी, स्थापना अशा कला प्रकाराचे चार दिवस उत्कृष्टरित्या प्रदर्शन केले. समारोपीय समारंभामध्ये विद्यार्थी कलावंतांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

### स्वस्तधान्य दुकानातील गरिबांच्या तांदळावर व्यावसायिकांचा डोळा

# रेशन तांदळाचा वाढता काळाबाजार

■ महासागर प्रतिनिधी
**नांदगाव खंडेश्वर, दि. १० :**

गरजू व गरिबांना अन्न देण्यासाठी राबवण्यात येत असलेली गरीब कल्याण अन्न योजना काळा बाजार करणाऱ्यांसाठी वरदान ठरली आहे. योजनेतील तांदूळ तस्करांच्या हाती पडत असून नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील बहुसंख्य गावांमध्ये बेकायदेशीरपणे तांदूळ जमा करून मोठ्या व्यावसायिकांना विकला जात आहे. त्यामुळे गरिबांच्या तांदळावर अन्य पैसे कमावू लागले लागल्याचे चित्र आहे.



नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) कुटुंबांना तांदूळ वाटप होते. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला दरमाह पाच किलो तांदूळ दिले जात आहेत. मात्र, तांदळाची काळ्या बाजारात विक्री करण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू आहे. तरीदेखील त्याचीही विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र, नागरिकांकडून हा तांदूळ व्यापारी खरेदी करत आहेत. शिवाय काही लोक रेशन तांदूळ न वापरता थेट विक्री करत आहेत. हा तांदूळ मोठे व्यापारी खरेदी करून महाराष्ट्रासह विविध राज्यांना पुरवत असल्याचीही शक्यता नाकारता येत नाही. आजही मोठ्या प्रमाणात शहरासह जिल्ह्यात रेशनच्या तांदळाचा काळाबाजार सुरू असल्याचे दिसून येत आहे. रेशन तांदूळ संकलनासाठी व्यापारी ऑटो रिक्षा व मालवाहू वाहने घेऊन गावागावांत फिरत आहेत. तांदळाची खरेदी १५ ते २० रुपये प्रति किलोने केली जात आहे. लोक तांदूळ खरेदी केल्यानंतर लगेच पैसे देत आहेत.

**तांदूळ मोठे व्यापारी खरेदी करून महाराष्ट्रासह विविध राज्यांना पुरवत असल्याचीही शक्यता नाकारता येत नाही**

रेशनचा तांदूळ विक्रीनंतर लगेचच हॉटेल्सना पुरवला जात आहे. काही हॉटेल मालक इडली, डोसा करण्यासाठी हा तांदूळ लोकांना २० ते २५ रुपये प्रति किलो दराने विकला जात आहेत.

# 'सीसीआय'च्या कापूस खरेदीला अद्याप प्रतीक्षा

### नोव्हेंबरमध्ये लागणार खरेदीला मुहूत



■ महासागर प्रतिनिधी
**अकोट , दि. १० :**

विदर्भातील वऱ्हाड प्रांताला पांढऱ्या सोन्याचं कोठार म्हटलं जायचंय. मात्र, काळ बदलत गेला अनब बदलत्या पीक पद्धतीमुळे ही ओळख नष्ट होण्याची भीती सतवायला लागली.

मात्र, यंदा निसर्गानं साथ न दिल्याने वऱ्हाडात कापसाचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. पांढऱ्या सोन्याचा उत्पादक शेतकरी सी. सी.आय च्या कापूस खरेदीची वाट पाहत आहे ही खरेदी नोव्हेंबरमध्ये सुरू होण्याची शक्यता असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. वऱ्हाड आणि त्यातही अकोट तालुक्यात कपाशीचे पीक फार मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाते.

सुमारे तीन ते चार वर्षांपूर्वी रेकॉर्ड ब्रेक १४ हजार रुपये प्रति क्विंटल भाव कपाशीला मिळाला होता.

आता कापूस विक्री कुठल्याही बाजारात करता येत असल्याने आजूबाजूच्या तालुक्यातील शेतकरी देखील अकोट केंद्रावर कापूस विक्रीसाठी आणत होते. कापसवर प्रक्रिया करणारे जीन प्रेस सुद्धा अकोट परिसरात मोठ्या प्रमाणावर आहेत.

आता या वर्षी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा फटका बसण्याची शक्यता आहे.

त्यामुळे शेतकरी चांगल्या भावासाठी 'सीसीआय' वर आशा लावून आहेत. या वर्षी कपाशीच्या हमीभाव ८ हजार दहा रुपये राहण्याची शक्यता आहे.

# चांदूरबाजार तहसीलवर शिवसेनेचा मोर्चा



**चांदुर बाजार :** चांदुर बाजार शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी तालुक्यातील शिवसैनिक चांदूर बाजार तहसील कार्यालयावर धडक दिली. या वेळी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हंबरडा मोर्चाचे आयोजन केले होते. या वेळी खासदार अरविंद सावंत यांच्या उपस्थितीत ओला दुष्काळ जाहीर करणे, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत करणे, पंतप्रधान पिक विमा योजनेत अटी काढून सरसकट पिक विमा देणे, गरजू घरकुल धारकांना घरकुल मंजूर करून घरकुलचा लाभ देणे, संजय गांधी श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना मेडिकल दाखल्यावर वयाचा पुरावा ग्राह्य धरावा, आदी मागणीचे निवेदन तहसीलदारांना देऊन केली चर्चा केली. या वेळी शिवसेना जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे, उपजिल्हा प्रमुख आशिष वाटाने, महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख निर्मला कौडण्यपुरे, तालुका प्रमुख शैलेश पांडे, युवासेना तालुका प्रमुख रोशन जयसिंगपूरे, उप तालुका प्रमुख अनिल सायंदे, पप्पू आखरे, सुरेश काकडे, श्रुती वाघमारे, दीपक भडके आदींची उपस्थिती होती.

# ज्येष्ठ समाज सेवकांचा सत्कार




■ महासागर प्रतिनिधी
**दिग्रस, दि. १० :**

ज्येष्ठ नागरिकांप्रती सदभावना निर्माण व्हावी, त्यांचा सन्मान व्हावा, त्यांनी आयुष्यात केलेल्या कर्तव्याची जाण व्हावी या अशा अनेक उद्देशाने ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात येतो. ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून संत श्री. दोला महाराज वृद्धाश्रम उमरी पठार येथे ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. समाजातील ५८ ज्येष्ठ सामाजसेवकांचा जीवन गौरव सन्मानाने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुरेश राठी तर प्रमुख पाहुणे म्हणून सुशीला पाटील, प्रिया तोडसाम, मंगल मुन, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मधुकर रत्ने, दिवाकर ब्राम्हणकर, सुरेश तलमले, मारोती डोंगरे, ज्ञानेश्वर गालचेलवार, त्रिवेदी, गणेश शेरे, संजय दुधे आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ज्येष्ठ समाजसेवक वाघ गुरुजी लोणी, व्यसनमुक्ती सम्राट मधुकरराव खोडे महाराज, द. तू. नंदापुरे, हरिओम भूत, किसन बोरले, कांतीलाल कोठारी, प्रा. प्रेम राठोड, विनय मीरासे, बाबाराव मडावी, प्रा. रमेश शर्मा, ॲड. रायवार, स्वामी योगचित्तम सरस्वती, श्याम रननवरे, बी. डी. भानावत, किशोर दर्डा, योगेश पालिवाल, डॉ. योगेंद्र मारू, संजय भंडारी, गोविंदवार, प्रजय चौधरी, डॉ. प्रवीण राखुंडे, हभप वासुदेव महाराज नांदे, शंकर चाडावार, डॉ. कन्नावार, डॉ. अरविंद दामले, बाबुलाल रतने, भारती जानी, उषा धूत, प्रा. राजाभाऊ पद्यावार, बापूराव पालकृतवार, आनंदराव गावंडे, दिनेश दत्तानी, सुचिता तिवारी, सुंदरा भानावत, वंदना शेरे, गजानन घोडेराव, विजय रुडे, प्रेमचंद अग्रवाल, प्रा. ठाकरे, जीवनलाल राठी, थोडगे, डॉ. सुधा राठी, दिलीप गंगशेट्टीवार, प्रा. हनुमंते, कामाजी रत्ने, नामदेव रुडे, श्रावण सिरसाठ, प्रकाश डब्बावार, लक्ष्मण कडवं, डॉ. निवृत्ती पिस्तूलकर, डॉ. प्रकाश नंदूरकर, डॉ. अनिल पटेल, प्रा. न. मा. जोशी, विजय कोषटवार, ॲड. विजय शिंदे या सर्व ज्येष्ठ साजसेवकांना, शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन जीवन गौरव सन्मानाने सन्मानित करण्यात आले.

अपंग मुकुंद देशपांडे यांना मातोश्री जमुनाबाई थावरा डोंगरे यांच्या स्मृतीत स्मृती सत्कर्मी पुरस्कार शंकर डोंगरे यांच्या वतीने ११ हजार रुपये व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन जयप्रकाश डोंगरे, राजू जयस्वाल, मनोज लंके, सुधीर वानखडे तसेच कार्यक्रमाचे संचालन वृद्धाश्रमाचे जयंत नंदापुरे यांनी केले. या कार्यक्रमाला वृद्धाश्रमातील प्रवेशित १६० वृद्ध व गावातील परिसरातील बहुसंख्येने ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.

### १२ ला गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ

**अमरावती:** विदर्भ कुंभार समाज सुधार समितीच्यावतीने १२ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता बडनेरा रोडवरील संत गोरोबा काका सांस्कृतिक भवन, शशिनगर येथे गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. समारंभात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, कला आणि क्रीडा क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणा-यव्यक्तींचा विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. समारंभाचे अध्यक्षस्थानी श्री सुधाकर शेंडोकार, उद्घाटक म्हणून माजी खासदार सौ. नवनीत राणा, प्रमुख अतिथी म्हणून आमदार रवि राणा, भाजपा ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष श्री संजय गाते, उपविभागीय अधिकारी श्री मनोज लोणारकर, पंजाबराव काकडे, डॉ. श्रीराम कोल्हे, डॉ. संजय साळिवकर, देविदास काळकर, देविदास धामणकर, भगवान जामकर, वसंतराव जवळेकर, मारोतराव शेंडोकार, अरुण चोंडके, अभियंता बबनराव जगदाळे, भगवन सूर्यवंशी, गुलाबराव सोनोने प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.याप्रसंगी श्री संत शिरोमणी गोरोबा काका प्रवेशव्दाराचे लोकार्पण तसेच भवनाच्या वरच्या मजल्याचे बांधकाम करणारे स्थापत्य अभियंता श्री रविंद्र धुळे यांचा सपत्निक सत्कार करण्यात येणार आहे.

### कडबी बाजारात मनपाद्वारे चार ट्रक प्लास्टिक जप्त



**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या प्लास्टिक मुक्ती अभियानाला गती देण्यासाठी मंगळवारी ७ ऑक्टोबरला कडबी बाजार परिसरात मोठ्या प्रमाणावर धडक तपासणी मोहीम राबवण्यात आली. या कारवाईत मनपाच्या पथकाने बंदी घातलेल्या प्लास्टिक साहित्याचा चार ट्रक असा मोठा साठा जप्त करण्यात आला. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त सौ. शिल्पा नाईक व सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभाग व स्वच्छता विभागाच्या संयुक्त पथकाने ही मोहीम हाती घेतली. सकाळपासूनच मनपाचे पथक कडबी बाजार परिसरात दाखल झाले. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्या, सिंगल युज कप, प्लेट्स, ग्लासेस आणि अन्य प्लास्टिक साहित्य विक्रीसाठी ठेवलेले आढळले. मनपाच्या अधिकाऱ्यांनी तब्बल हा चार ट्रक प्लास्टिक साठा जप्त केला व पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली. पूर्वसूचना देऊनही अनेक व्यापारी बंदी घातलेल्या प्लास्टिकचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्याने मनपाने ही कठोर कारवाई केली. या मोहिमेत अतिक्रमण निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# सहपालकमंत्री आशीष जयस्वाल यांच्या हस्तक्षेपामुळे महायुतीत वादाची ठिणगी

■ महासागर प्रतिनिधी
**गडचिरोली, दि. १० :**

सहपालकमंत्री आशीष जयस्वाल यांचा अहेरी विधानसभेतील विकासकामांमध्ये वाढलेल्या हस्तक्षेपावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नेते तथा आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. जयस्वाल केवळ विकासकामच नव्हे तर अधिकाऱ्यांवरही दबाव टाकत असल्याचा आरोप आत्राम यांनी केला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर महायुतीत वादाची ठिणगी पडल्याचे चित्र आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्यानंतर सहपालकमंत्री म्हणून शिंदेसेनेचे आशीष जयस्वाल यांच्याकडे जबाबदारी दिली. त्यामुळे जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामे व प्रश्न मार्गी लागणार, अशी अपेक्षा व्यक्त केल्या जात होती. मात्र, वर्षभरात प्रलंबित प्रश्न तर सोडा जिल्हा नियोजन, खनिकर्म, सार्वजनिक बांधकाम आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बेलगाम कारभारावर वेसण घालणेही त्यांना जमलेले नाही. उलट सहपालकमंत्री आशीष जयस्वाल यांच्यामुळे महायुतीतीत अंतर्गत धुसफूस वाढल्याचे चित्र आहे. सुरुवातीला भाजपच्या नेत्यांनी त्यांच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी जयस्वाल यांच्यावर गंभीर आरोप केले आहे.

धर्मरावबाबा आत्राम म्हणतात, सहपालकमंत्री आशीष जयस्वाल यांनी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेत विकास कामे केली पाहिजे. परंतु गेल्या काही काळापासून अहेरी विधानसभेतील त्यांचा हस्तक्षेप वाढला आहे. जिल्हा नियोजन, खनिज निधीच्या वितरनापासून विकास कामे वाटप करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. अधिकाऱ्यांनाही ते आदेश देतात. हे चुकीचे आहे. मी सुद्धा आठ वेळा विधानसभेची निवडणूक लढवलेली आहे. उद्या मी मंत्री झाल्यावर यांच्या विधानसभेत जाऊन हस्तक्षेप केल्यास चालेल काय, असा प्रश्न आत्राम यांनी माध्यमांशी बोलताना केला.

जयस्वाल यांनी हे सर्व प्रकार न करता जिल्ह्यातील विकास कामांचे प्रश्न कसे मार्गी लागतील याकडे लक्ष दिल्यास बरे होईल. यापुढे माझ्या विधानसभेत कोणीही हस्तक्षेप केल्यास मी खपवून घेणार नाही. असा इशारा धर्मरावबाबा आत्राम यांनी दिला आहे. सोबतच याचा परिणाम येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातही दिसेल, असेही त्यांनी सागितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जबाबदारी स्विकारल्यानंतर नागपुरातील नेत्यांचा हस्तक्षेप अधिक वाढला आहे.

मधल्या काळात आमदार परिणय फुके, मोहन मते तसेच मुख्यमंत्र्यांच्या जवळील नेत्यांनी येथील खनिज आणि इतर निधीमध्ये वाटा मागितला होता. तसे पत्रही जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले. यासोबत बाहेरील काही कंत्राटदार येथील अधिकाऱ्यांवर मोठमोठ्या मंत्र्यांची नावे सांगून दबाव टाकत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे येथील भाजप नेत्यांसह महायुतीतील नेत्यांची चांगलीच कोंडी झाल्याचे पाहायला मिळत आहे.

# सिंधू शेरनी डॉ. रोमा बजाज यांना आदर्श डॉक्टर पुरस्कार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १० :**

संजीवनी निसर्गोपचार आणि योगिक विज्ञान फाऊंडेशनच्या संचालक आणि एमडी आणि पीएचडीधारक डॉ. रोमा राजेश बजाज यांना अलीकडेच सर्वोत्कृष्ट डॉक्टर पुरस्कार विजेते घोषित करण्यात आला होता. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त नागपूर येथील वसंतराव नाईक मेमोरियल हॉलमध्ये हा प्रतिष्ठित समारंभ पार पडला. कौटुंबिक कारणांमुळे डॉ. रोमा बजाज या समारंभाला उपस्थित राहू शकल्या नाहीत, त्यामुळे हा पुरस्कार त्यांच्या घरी पोहोचवण्यात आला. अमरावतीचे सुपुत्र तथा भारत सरकार क्रीडा व युवक कल्याण विभागाचे राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा अंतर्राष्ट्रीय सार्क संघटनेचे युवा दूत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी राज्यपाल नामित सिनेट सदस्य तसेच महाराष्ट्र शासनाचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मनीष शंकरराव गवई यांनी त्यांच्या निवासस्थानी



स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान केले. भारत सरकारच्या मान्यता प्राप्त येहोर हिर फाऊंडेशनच्या वतीने डॉ. रोमा राजेश बजाज यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या राज्य युवा धोरण समितीचे विशेष निमंत्रित सदस्य पदी निवड झाल्याबद्दल डॉ. मनीष गवई यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. येहोर ग्रुपचे सीईओ डॉ. राजेश कुमार बोरकुटे आणि नाशिक आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. विनोद चौधरी यांनी शुभेच्छांसह स्वाक्षरी केलेले स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले राज्य युवा धोरण समितीचे विशेष निमंत्रित सदस्य डॉ. मनीष गवई यांनी डॉ. रोमा बजाज यांना हा पुरस्कार प्रदान केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ टाइम्स ऑफ इंडिया पत्रकार राजा गडलिंग, क्रांतीभूषण खडसे, डॉ. निर्मल सरदार, डॉ. डेटराम मनोजा, बीएसएस अमरावती अध्यक्ष आणि भाजप शहर उपाध्यक्ष राजू राजदेव, अनिता गगलानी, कांचन किंगर, मीना अडवाणी, राणी, जया आणि शितल हे प्रमुख उपस्थित होते.हे उल्लेखनीय आहे की सर्व सामाजिक उपक्रमांमध्ये आणि धार्मिक, सामाजिक आणि आरोग्य कार्यात नेहमीच सक्रिय असलेल्या सिंधी समाजाच्या सिंधी सिंहिनी डॉ. रोमा राजेश बजाज भाजप महिला मोर्चाच्या शहर उपाध्यक्ष आहेत. त्यांना राज्य सरकारकडून क्रांती ज्योती, सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना राष्ट्रीय आरोग्य पुरस्कार आणि सुवर्णपदकांसह अन्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आदर्श पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ रोमा बजाज यांचा सर्व स्तरांवरून सन्मान केला जात आहे आणि त्यांना सिंधू शेरनी म्हणून संबोधित करण्यात आले .

# शेतकऱ्यांना विशेष मदत जाहीर करा देवेंद्र भुयार यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
**मोर्शी , दि. १० :**

मोर्शी विधानसभा मतदार संघ हा विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून मागील काही वर्षांपासून अस्मानी व सुलतानी संकटांमुळे मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाला असून कर्जबाजारी होण्याच्या मार्गावर आहे. शासनाने अतिवृष्टी मदतीचा शासन निर्णय जाहीर केला असून त्यामध्ये संपूर्ण वरूड तालुका बगळण्यात आला आहे. तसेच मोर्शी तालुक्यात ७ महसूल मंडळाचा समावेश असून मोर्शी



तालुक्यातून रिद्धपूर मंडळाचेच पंचनामे शासनाकडे सादर झाल्यामुळे शासनाने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या अतिवृष्टी च्या पॅकेज मधून मोर्शी तालुक्यातील फक्त रिद्धपूर मंडळालाच मदत मिळणार असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे मोर्शी ६ महसूल मंडळ मदतीपासून वंचित राहणार आहे. वरुड मोर्शी तालुक्यातील संत्रा, मोसंबी, कपाशी, तूर, सोयाबीन, मिरची, पिकाचे ३३% पेक्षा नुकसान झाल्यामुळे वरूड मोर्शी तालुक्यातील ५० हजार हेक्टर क्षेत्रावरील संत्रा मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये प्रमाणे १६३ कोटी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत विशेष बाब म्हणून जाहीर करून नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.


## हरि गोविंद इंटरनॅशनल लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: १२५, वर्धमान नगर, राधा कृष्ण मंदिराजवळ, नागपूर-०८.
EMAIL: hgil.ngp@gmail.com WEBSITE: www.hgil.in
PH : 09373126605 CIN: L99999MH1989PLC050528

**असाधारण सर्वसाधारण बैठकीची सूचना**

सूचना देण्यात येत आहे की हरि गोविंद इंटरनॅशनल लिमिटेडच्या सदस्यांची अतिरिक्त सर्वसाधारण सभा (ईजिएम) सोमवार, ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता १२५, वर्धमान नगर, राधा कृष्ण मंदिर जवळ, नागपूर - ४४०००८ येथील नोंदणीकृत कार्यालयात आयोजित केली जाईल. कंपनीने १० ऑक्टोबर २०२५ रोजीच्या ईजिएम ची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सर्व सदस्यांना पाठवली आहे ज्यांचे ई-मेल आयडी डिपॉझिटरी सहभागी/कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, सॅटेलाइट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, (आरटीए) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. ईजिएम ची सूचना स्पष्टीकरणात्मक विधानासह कंपनीच्या www.hgil.in या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

कायद्याच्या कलम १०८ आणि कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमांच्या नियम २० च्या तरतुदींनुसार, २०१४ मध्ये सुधारणा केल्यानुसार आणि भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४४ नुसार, सदस्यांना ईजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर आरटीएने प्रदान केलेल्या ई-व्होटिंग सेवांद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा प्रदान केली आहे. सदस्यांचे मतदानाचे अधिकार २७ ऑक्टोबर २०२५ रोजी ('कट-ऑफ डेट') कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटलमध्ये त्यांच्याकडे असलेल्या इक्विटी शेअर्सच्या प्रमाणात असतील.

रिमोट ई-व्होटिंग कालावधी शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होईल आणि रविवार, ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता संपेल. या कालावधीत, सदस्य इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात. त्यानंतर रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल बंद केले जाईल. जे सदस्य एजीएममध्ये उपस्थित असतील आणि रिमोट ई-व्होटिंगद्वारे ठरावांवर मतदान केलेले नसेल आणि अन्यथा त्यांना तसे करण्यास मनाई केलेली नसेल, ते एजीएम दरम्यान मतदान करण्यास पात्र असतील.

ज्या सदस्यांनी एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केले आहे ते देखील एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात/सहभागी होऊ शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. ज्या सदस्यांनी प्रत्यक्ष शेअर्स धारण केले आहेत आणि ज्यांनी त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही त्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते संबंधित डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदवावेत. आणि त्यांचे ईमेल पत्ते कंपनीच्या रजिस्ट्रारकडे अपडेट करावेत. आणि शेअर ट्रान्सफर एजंट, सॅटेलाइट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडे ईमेल आयडी आणि संपर्क क्रमांक अपडेट करण्यासाठी आणि एजीएमची सूचना मिळवण्यासाठी.

सदस्यांना विनंती आहे की त्यांनी ईजीएमच्या सूचनेतील सर्व सूचना आणि विशेषतः ईजीएममध्ये सामील होण्याच्या सूचना, रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत काळजीपूर्वक वाचाव्यात.

कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या शेअरहोल्डर्ससाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि शेअरहोल्डर्ससाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता. किंवा टोल फ्री क्रमांक: १८००१०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० वर कॉल करा किंवा श्री. अभिषेक मिश्रा (व्यवस्थापक) आणि श्री. अमन गोयल (सहाय्यक व्यवस्थापक) यांना evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवा.

मंडळाच्या आदेशानुसार
हरी गोविंद इंटरनॅशनल लिमिटेडसाठी
स्वा/-
जुगल किशोर हरिकिशन मणियार
पूर्ण-वेळ-संचालक
डीआयएन: ००९४२३७

स्थळ: नागपूर
दिनांक: ११ ऑक्टोबर २०२५

# परतत्वस्पर्शी कवी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष लेख**

-------------------

धर्म रक्षावयासाठीं' करणे आटी आम्हासी " या तुकोक्तीनुसार भगवान श्री ज्ञानोबाराय, भारतीय ऐक्याचे महान प्रतीक नामदेवराय, शांतीब्रह्म एकनाथ महाराज, जगद्गुरु तुकाराम महाराज या महाराष्ट्रीयन वारकरी संत चतुष्टयांचे ग्रंथ लेखनाचे व धर्म रक्षणाचे उर्वरित कार्य पूर्ण करण्यासाठी अहोरात्र झटून आपल्या गद्य व पदयात्मक लिखाणाद्वारे समाज प्रबोधन करणारे प्रभुभाषी भाषाप्रभू व परतत्वस्पर्शी कवी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे होत. त्यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांचे थोडक्यात तात्विक चिंतन.

-------------

वंदनीय महाराज हे विवेकाधिष्टीत विद्वत्तेचे धनी , किंबहुना विद्वत्तेचा वान अंगावर उमटलेला जातवान विद्वान होते. तसेच ते तीक्ष्ण असे वाग्बाण हातात घेऊन फिरणारा शूरवीर सैनिक, साहित्य सोनियाच्या खाणीचे खजिनदार होते. बरेचदा बोलणाऱ्या वक्त्याला लिहिता येत नाही आणि लिहिणारा लेखक शक्यतोवर भाषण देत नाही.

परंतु महाराज हे वाणी आणि लेखणी दोन्हीही समानतेने चालविणारे सर्वश्रेष्ठ धनुर्धर अजुर्नाप्रमाणे सव्यसाची योद्धा सुद्धा होते. ते साधकांच्या संशयरूप ग्रंथीची शब्दाद्वारे शस्त्रक्रिया करणारे उत्कृष्ट शल्यचिकित्सक तर, अखिल मानव समाजाला अधिकारानुरू उपदेश करणाऱ्या हाडाच्या शिक्षका बरोबरच केवळ शब्दोपचाराने मानसिक रोगांचे निराकरण करणारे सर्वोत्कृष्ट मानसोपचारतज्ञ होते. ते आपल्या अफाट शब्दसंग्रहाच्या बळावर अनेकांचा पूर्वग्रह दूर करणारे शब्द साक्षात्कारी लेखक व हृदय शस्त्रक्रिया नाही तर, हृदय परिवर्तन करून वाल्ह्याचा वाल्मीक ऋषी बनविणारा आधुनिक नारदच होते.

ते भारत भूमीला मातीचा तुकडा नाही तर, माता मानणारे आदर्श भूमिपुत्र व केवळ प्रवचनाच्या पोपटपंचीतून नव्हे तर, स्वतःच्या स्वच्छ आचरणातून समाजात अमुलाग्र परिवर्तन घडविणारे आणि ज्यांच्या कृतीचे प्रत्येकाने अनुकरण व विचाराचे अनुसरण करावे असे अनुकरणीय व अनुसरणीय साधू सत्पुरुष होते.

ज्यांच्या पोटात आणि ओठात एकच गोष्ट असणारे ते उत्कृष्ट प्रबोधनकार व शास्त्रीय सिद्धांतांना बाधा न येऊ देता



**श्री संत ज्ञानेश्वरदासानुदास भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ श्री संत वासुदेव महाराज स्मृती मंदिर, श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ.**

आधुनिकतेचा पुरस्कर करणारे अर्थातच नास्तिक नसलेले अस्सल पुरोगामी होते. कुठलीही रुढी व परंपरा मोडीत न काढता सुरळीत करणारे बावनकशी सत्यशोधक व समाजाचे मन, मेंदू व मनगट मजबूत करणारे वस्ताद (पैलवान) होते. देशिक, भाषिक व प्रादेशिक ऐक्य घडविणारे उत्कृष्ट संघटक, प्रांतवादाच्या भिंती मोडून टाकत धार्मिकतेबरोबरच आधुनिकतेचा प्रचार करणारे उत्कृष्ट प्रचारक, निरूपद्रवी आदर्श मानव निर्मितीचा कारखानदार होते.

ज्यांचा चेहरा अत्यंत तेजस्वी आणि वाणी अतिव ओजस्वी तसेच त्यांच्या वागण्यात लिनता व बोलण्यात विद्वत्ता असल्यामुळेच प्रबोधनासह परिवर्तनाची ताकद असलेला व पटविणे आणि पेटविणे दोन्हीही कार्यामध्ये पटूता असलेला प्रभावी धाराप्रवाही धिरोदात्तवक्ता व स्वचरित्रातील चमत्कारापेक्षा शब्दातील चमत्कृतीने साहित्यिक क्षेत्रात सूर्यासम चमकणारा साहित्यकार संत होते.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये संत परंपरेचा वारसा चालविणारा समर्थ वारसदार व स्वातंत्र्याच्या प्रदीर्घ लढ्यांती प्राप्त झालेल्या स्वराज्याचे सुराज्य निर्माण व्हावे याकरिता रात्रंदिवस झटणारा सेनानी, त्याचप्रमाणे स्वदेश, संस्कृती व सदगुरु या त्रयींच्या प्रति नीतांत निष्ठा असणारा डोळस श्रद्धावान तसेच प्रचारक पुत्रांच्या रूपाने शासनाच्या कुटुंब नियोजनाचा त्रिकोण मोडणारा बालब्रह्मचारी होते. लेखणी, कथनी (बोलणे) आणि करनी (कृती) समान असलेला शब्दधनी लेखक, भारत मातेचा सामाजिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक आघाडी सांभाळणारे शिलेदार, विशेष म्हणजे सत्य (धर्मकारण) आणि सत्ता (राजकारण) यांचा समन्वय घडविणारा सुयोग्य निस्वार्थ समन्वयक होते. एवढेच नाही तर देशनिष्ठ व विज्ञान निष्ठांबरोबरच ईश्वरनिष्ठांनाही जोडणारा ते उत्तम सेतू (पुल) होते.

ज्यांचे व्यक्तिमत्व आकर्षक , व्यवहार पारदर्शक व प्रबोधन परमात्म दर्शक असून; ज्यांचे अनेक भाषांवर प्रभुत्व, तसेच अनेक अनेक प्रचारकांचे गुरुत्व असतांना सुद्धा ज्यांच्या आचारात मात्र नेहमी लघुत्व होते.

ज्यांचे जीवन आजन्म अनुकरणीय, कार्य अतुलनीय आणि आचार, विचार आणि संस्कार तसेच ज्ञान, भक्ती व वैराग्य यांच्या अजोड संगमाने ज्यांची प्रत्येक कृती आचरणीय होती.

ज्यांच्या मनगटात कर्तृत्व, हातात नेतृत्व असतांना सुद्धा वृत्तीत मात्र स्वतःला तुकड्या दास म्हणून घेण्याएवढे लघुत्व होते. असे श्वेत वस्त्रातील अलौकिक संन्याशी म्हणजेच वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे होत.

त्यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्ताने हे शब्द सुमन त्यांचे चरणी समर्पित करून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

# भारतातील बाललैंगिक गुणोत्तर १००० मुलांमागे फक्त ९२९ मुली

दरवर्षी ११ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट मुलींच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता यासारख्या मूलभूत सुविधांचा लाभ मिळवून देणे आणि समाजातील लिंगसमानतेची स्थिती सुधारण्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हे आहे.

मात्र, या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर भारतातील मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील गंभीर असमानता चिंतेचा विषय ठरते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण नुसार भारतात जन्मावेळी लिंग गुणोत्तर, म्हणजेच प्रत्येक १,००० मुलांमागे जन्मलेल्या मुलींची संख्या फक्त ९२९ इतकी आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ही संख्या नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तराच्या (९५२ मुली प्रति १,००० मुले) तुलनेत खूपच कमी आहे. ही विकृती फक्त आकडेवारीवर आधारित समस्या नाही, तर समाजातील मुलींबाबत असलेले मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेद स्पष्ट करते. नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तर साधारणतः ९५२ मुली प्रति १,००० मुले असते, हे नैसर्गिक प्रक्रिया आणि जैविक घटकांच्या परिणामस्वरूप तयार होते. मात्र भारतातील मुलींच्या जन्मातील घट ही समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून गंभीर समस्या आहे.

मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा लिंगभेद, सामाजिक अपेक्षा, मुलींबाबतच्या आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनाशी निगडीत आहे. काही भागांत मुलींचे जीवन कमी महत्त्वाचे मानले जाते, मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि पोषण यामध्ये पुरुषांच्या तुलनेत कमी गुंतवणूक केली जाते, त्यामुळे मुलींचा दर्जा सामाजिकदृष्ट्या कमी होतो.

भारतामध्ये मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येतील घटाचे कारण बहुप्रकारे आहे. सर्वप्रथम, लिंग निवडीच्या प्रथांचा विचार करता येतो. गर्भधारणेदरम्यान मुलींचे लिंग ठरवून, गर्भपात करून किंवा मुलींचा जन्म टाळण्याच्या प्रथांमुळे जन्मावेळी मुलींच्या संख्येत घट होते. लिंग निवडीच्या प्रथा, ज्या मुलींचा जन्म टाळण्यासाठी किंवा गर्भावस्थेत लिंग ठरवून गर्भपात करण्यासाठी केल्या जातात, या समस्येचे मूळ कारण आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गभार्तील लिंग ठरवणे, मग ते अवैध असले तरी, काही भागांत अजूनही चालू आहे. या प्रथेमुळे फक्त मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येत घट होत नाही, तर समाजात मुलींबाबतचा दृष्टिकोन, त्यांच्या मूल्याची कल्पना आणि लिंगसमानतेची स्थितीही ढासळते.

मुलींचा जन्म सामाजिक आव्हान मानला जातो, कधी आर्थिक भार म्हणून, तर कधी सामाजिक मर्यादा आणि सांस्कृतिक रूढींच्या आधारे कमी महत्त्वाचा मानला जातो. ही प्रथा केवळ भारतापुरती मर्यादित नसून, काही अन्य आशियाई देशांमध्येही दिसून येते, मात्र भारतात तिचा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव विशेष स्पष्ट आहे. मुलींच्या जन्मावर असलेला आर्थिक आणि सामाजिक दबाव देखील यामागे मुख्य कारण आहे.

लग्नाचा खर्च, मुलींच्या शिक्षणाचा भार, आणि मुलींच्या भविष्याबाबत असलेली सुरक्षिततेची चिंता यामुळे अनेक कुटुंब मुलींच्या जन्माला प्राधान्य देत नाहीत. या मानसिकतेत बदल करणे आणि मुलींचे मूल्य उंचावणे हे समाजाच्या प्रत्येक घटकावर अवलंबून आहे.

भारत सरकारने या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना उपाययोजना राबविल्या आहेत. Pre-Conceptionand Pre-Natal Diagnostic Techniques (PCPNDT) Act, १९९४ ह्या कायद्याद्वारे गर्भावस्थेत लिंग निर्धारणावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

हा कायदा मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील असमानतेवर नियंत्रण ठेवण्याचा एक महत्त्वाचा आधार आहे. तथापि, काही ठिकाणी या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे नाही, ज्यामुळे लिंग निवडीच्या प्रथा काही प्रमाणात अजूनही चालू आहेत. त्यामुळे केवळ कायदे नाही तर समाजातील मानसिकतेत बदल आणणे गरजेचे आहे. मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि सुरक्षिततेची हमी देणे, त्यांच्या सामाजिक मूल्याची दखल घेणे आणि त्यांच्या विकासासाठी योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. उदा. हरियाणा राज्यातील पंचकुला जिल्ह्यात २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर सुधारले असून ते ९५१ वर पोहोचले आहे, जे २०२४ मध्ये ९१४ होते. या सुधारणामागे ढउढठउळ कायद्याची कठोर अंमलबजावणी, टळढ कायद्याची अंमलबजावणी, जिल्हा प्रशासनाची समन्वयित कार्यवाही आणि जनजागृती मोहिमांचा मोठा वाटा आहे.

पंचकुला प्रशासनाने १३७ PNDT केंद्रांची, ४६ MTP केंद्रांची आणि १५ BAMS क्लिनिकांची तपासणी केली, ज्यामुळे लिंग गुणोत्तरात सुधारणा साधली गेली. तथापि, गाझियाबाद (उत्तर प्रदेश) येथे २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर ८५३ वर खाली आले आहे, जे बेकायदेशीर गर्भपात केंद्रे आणि लिंग निवडीच्या प्रथांमुळे आहे. या ठिकाणी प्रशासनाने उपाययोजना राबवल्या असल्या तरी समस्या अजूनही गंभीर आहे.

यासोबतच सामाजिक उपाययोजनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. बेटी बचाओ बेटी पढाओ योजना ही या दिशेने एक महत्वाचा उपक्रम आहे. या योजनेचा उद्देश मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि लिंगभेद कमी करणे आहे. या योजनेअंतर्गत मुलींच्या आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सुरक्षिततेसाठी विविध कार्यक्रम राबवले जातात.

शाळा, सामाजिक संस्था आणि स्थानिक समुदाय यामार्फत मुलींच्या हक्कांबाबत जनजागृती केली जाते. समाजात लिंगसमानतेबाबत मानसिकतेत बदल आणण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहेत. मुलींच्या विकासासाठी पालक, शिक्षक, प्रशासन आणि समाजाने एकत्रित काम करणे अत्यावश्यक आहे.

मुलींची जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही फक्त आकडेवारी किंवा सामाजिक प्रश्न नाही, तर त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावरही होतो. हा प्रश्न समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे.

लिंगभेदामुळे महिलांवरील हिंसा, लैंगिक छळ आणि समाजातील असमानतेची स्थिती अधिक वाढते. परिणामी, मुलींच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजाच्या संतुलनासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. मुलींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे, त्यांना समान संधी देणे, आणि लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच खरे उद्दिष्ट असावे.

मुलींचे योग्य स्वागत करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता याची हमी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा उत्सव नाही, तर मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य आणि लिंगसमानतेसाठी जनजागृतीचा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

शेवटी, मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही केवळ आकडेवारी नाही, तर समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा समाजातील लिंगभेद आणि मुलींबाबतच्या मानसिकतेचा स्पष्ट सूचक आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक विकासासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य, आणि लिंगसमानतेसाठी मुलींच्या अधिकारांसाठी जनजागृतीचा दिन आहे. मुलींचे योग्य स्वागत करणे, त्यांचा जन्म स्वागतार्ह असावा, त्यांना शिक्षण, पोषण आणि सुरक्षितता मिळावी, आणि लिंगभेदाचा पूर्णपणे विरोध केला जावा ही समाजाची जबाबदारी आहे. मुलींना शिक्षणाची आणि विकासाची संधी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच या दिवसाचे खऱ्या अर्थाने औचित्य आहे.

या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

■ ■ ■

# माणसातील हरवलेली मानवता जागृत करणारं 'जागरण'

अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या साहित्याचा तेजस्वी व आकर्षक आलेख गगनाला भिडवणारे आणि तळागाळातील दीनदलित, शोषित, पिडित, वंचित, उपेक्षितांना आपल्या निर्भिड लेखणीच्या माध्यमातून जागृत करणारे व त्यांना निडरपणे व बेडरपणे जगायला शिकवणारे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध लेखक, कवी, साहित्यिक तथा वात्रटीकाकार आणि हजारो युवकांचे आयडॉल, माझे मार्गदर्शक भारत सातपुते सर यांनी लिहिलेले जागरण नावाचे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पुस्तक नुकतेच वाचनात आले.





हे जागरण नावाचे पुस्तक वाचताना सातपुते सरांनी आपल्या बालपणापासून ते आतापर्यंतच्या सर्व आठवणी, जीवनात आलेले चांगले वाईट प्रसंग, त्यांना गरिबीचे व जातीयतेचे सोसावे लागलेले विखारी चटके आणि शिक्षकी पेशा सांभाळत असताना शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांची निष्क्रियता, कामचुकारपणा, आळशीपणा, चालढकलपणा तसेच तालुक्याचे व गावाचे राजकारण शाळेत आणणे आणि शिकवताना टंगळमंगळपणा करणे आणि सरांना इथल्या व्यवस्थेमुळे सोसावे लागणारे असूडाचे जबरदस्त फटके हे त्यांनी जागरण या त्यांच्या आत्मचरित्रात अगदी पोटतिडकीने आपल्यासमोर ठेवले आहे.

सातपुते सर हे अतिशय गरीब परिस्थितीतून तावूनसुलाखून निघालेले एक जबरदस्त व्यक्तिमत्व आहे. त्यांना जीवनात गरिबीला व दारिद्र्याला कसे हिंमतीने तोंड द्यावे लागले आणि शिक्षणासाठी कसा आर्थिक संकटाचा सामना करावा लागला, हे त्यांनी जागरण या पुस्तकात अगदी सविस्तरपणे मांडले आहे. सरांना शालेय जीवनापासूनच लेखनाची खूप आवड होती. कविता लिहिणे, निबंध लिहिणे, वर्तमानपत्रात वेगवेगळ्या विषयावर लेख लिहिणे हे सातपुते सरांचा शालेय जीवनापासूनच आवडता छंद होता.



बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, जि. लातूर.
7498715661

त्यांना पुस्तक प्रकाशित करताना बऱ्याच वेळा सावकाराचे कर्ज काढावे लागले आहे. त्यांनी जवळपास पाच डझन पुस्तके आजवर प्रकाशित केले आहेत आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची दखल घेऊन त्यांना विविध सामाजिक संघटना तसेच प्रशासकीय यंत्रणा यांनी विविध पुरस्कार देऊन यथोचित गौरव केला आहे.

आतापर्यंत त्यांना शंभर पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एवढे पुरस्कार मिळवणारे सातपुते सर हे महाराष्ट्रातील एकमेव व्यक्तिमत्व असेल. त्यांच्या बऱ्याच कविता व लेख पुस्तकात अभ्यासक्रमासाठी समाविष्ट करण्यात आले आहेत. ते निरंतर व अहोरात्र लिहीत असतात. महाराष्ट्रात जेवढे कवी आहेत तेवढ्या कवींना लाजवणाऱ्या व आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या कविता सातपुते सरांनी आपल्या काव्यसंग्रहात लिहिलेल्या आहेत.

जीवनाची वाटचाल करत असताना त्यांच्या वाटेवर अनेक बोचरी काटे आली, अनेक खाचखळगे आली, दुःखाचे डोंगर आडवे आले, जातीमुळे त्यांना अपमानास्पद व हीन दर्जाची वागणूक मिळाली, असा त्यांना जीवनाच्या विविध टप्प्यावर संघर्ष करावा लागला. त्यांच्या घरची परिस्थिती अतिशय हलाखीची व गरीब होती. सातपुते सरांना बंबई मिठाई खाण्यासाठी आईकडे रडगाणे लावल्यावर आई तुराट्यात खवून ठेवलेले केस गोळा करून त्याची बंबईमिठाई सरांना घेऊन द्यायची.

त्यांना शालेय साहित्य व पुस्तके विकत घ्यायला पैसे नसायचे. तेव्हा त्यांना खूप खूप दुःख व्हायचे आणि त्यांचे डोळे ओले व्हायचे. पण ते खचून कधीच गेले नाहीत. उलट जिद्दीने पेटून उठून आपले काम करतच राहिले आणि उच्च शिक्षण शिकून शिक्षकाची नोकरी काबीज केली. त्याकाळी दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला लेखणीच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले.

प्रशासनाला व येथील गुलामगिरीत खितपत पडलेल्या सामान्य माणसांना लेखणीच्या माध्यमातून जागृत करण्याचे काम केले. शिक्षकी पेशा सांभाळत असताना त्यांनी चांगल्या वाईट शिक्षकांचे बारकाईने निरीक्षण करून वाईट शिक्षकांना लेखणीच्या माध्यमातून चांगलाच धडा शिकवला आणि कर्तृत्ववान शिक्षकांचा लेखणीच्या माध्यमातून त्यांनी नेहमी सन्मान केला आहे. म्हणजे त्यांनी शिक्षकांना सुद्धा जागृत करण्याचं काम या जागरण पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे.

जागरण हे असे आत्मचरित्र आहे की, ते मेलेल्या माणसाला,जसे की ज्यांना अस्तित्वाची जाणीव नाही अशा माणसांना जागृत करण्याचं काम या जागरण पुस्तकाच्या माध्यमातून नक्कीच होणार आहे. म्हणून जागरण पुस्तक वाचणे ही काळाची गरज आहे.

जागरण पुस्तक गुलामाला गुलामीची जाणीव करून देते. माणसाला माणूस असल्याची जाणीव करून देते. कर्तव्यात कामचुकारपणा करणाऱ्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जागृत करून कर्तव्यपरायणता शिकवते. हल्ली समाज झोपेत आहे. तो स्वतःच्या अस्तित्वाला विसरून गेला आहे, आणि माणसासारखे जीवन न जगता हैवानासारखे जीवन जगत आहे. माणुसकीला पायदळी तुडवून सख्ख्या भावासोबत मनामध्ये कपट धरून राहत आहे.

गुंठाभर जमिनीसाठी व इंचभर जागेसाठी सख्ख्या भावाचा काटा काढत आहेत. म्हणजे त्याच्यातील राक्षसपणा नष्ट होऊन माणूसपण जागृत होणे काळाची गरज आहे. जर आपल्यातला माणूस व मानवता जागी करायची असेल तर आपण जागरण हे पुस्तक वाचलेच पाहिजे.

जागरण हे पुस्तक एकदा हातात घेतले तर ते शेवट होईपर्यंत खाली ठेवूच वाटत नाही, इतके प्रभावी, आकर्षक व दर्जेदार पुस्तक आपल्याला भारत सातपुते सरांनी लिहून दिले आहे. प्रत्येकाने वाचावे अशा साध्या, सोप्या व सरळ भाषेत त्यांनी लिखाण केले आहे. हे पुस्तक कोणीही वाचले तरी समजते. माणसातील मानवता जागृत करून माणसाचे अस्तित्व प्राप्त करून देणाऱ्या सातपुते सरांना खरोखरच सलाम करावा वाटतो. त्यांचा जीवन संघर्ष व त्यांची समाजाप्रती असणारी अस्मिता सरांनी अतिशय मार्मिकपणे लिहून समाजाप्रती असणारी निष्ठा दाखवली आहे.

फक्त वर्तमानपत्रात लिहिणे सोपे आहे. परंतु पुस्तके लिहिणे खरोखरच खूप कठीण काम आहे. जेवढे लेखक वर्तमानपत्रात लेख लिहितात त्यांचे कुठे एक दोन पुस्तके प्रकाशित झाले आहेत. परंतु सर काव्य संमेलन व शिक्षकी पेशा सांभाळत लेखन कार्य करतात, ही काय साधी गोष्ट नाही माय!

त्यांचा सतत होत असणारा सन्मान हाच त्यांच्या कायार्ची खरी देणगी आहे. अतिशय गरीब कुटुंबात जन्मलेले भारत सातपुते सर आज संबंध महाराष्ट्राच्या ओठावर आहेत. त्यांनी आपली एक आगळी वेगळी छाप लोकांवर पाडून समाजात एक जबरदस्त प्रतिमा तयार केली आहे. त्यांचा संबंध खूप मोठ्या लोकांसोबत आहे...तरीपण ते अगदी साधे राहतात...माझ्यासारख्या होतकरू व नवख्या लेखकाला वेळात वेळ काढून फोन लावतात आणि लिहिण्यासाठी आणखीन प्रोत्साहित करतात.

शून्यातून विश्व निर्माण करणारे भारत सातपुते सर खरोखरच इतर कवींसाठी, लेखकांसाठी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचा जीवन संघर्ष भल्याभल्यांना थक्क करणारा आहे. त्यांच्या जागरण या पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. हे आत्मचरित्र खरोखरच खूप वाचनीय व चिंतनीय आहे, ते वाचताना माणूस स्वतःला एका वेगळ्या विश्वात घेऊन जातो.

सरांच्या पुस्तकाचे परीक्षण करण्याएवढा मी मोठा लेखक नाही हो...सरांच्या पुस्तकांची समीक्षा खूप मोठ मोठ्या लेखकांनी नामांकित वर्तमानपत्रांमध्ये केली आहे. सरांचा मित्रपरिवार खूप मोठा व दांडगा आहे. त्यांच्या कविता कोणालाही खूप आवडतात आणि मनाला भावतात, तेव्हा कोणताही माणूस मंत्रमुग्ध होऊन जातो. सरांची शैली एकदम जबरदस्त व व्याकरण दृष्ट्या खूप छान आहे. असं हे माणसातील मानवता जागृत करणारं जागरण प्रत्येकाने वाचावे, हीच नम्र विनंती!

-----------------

**जागरण : भारत सातपुते**
**मांजरा प्रकाशन, लातूर.**
**किंमत : २५०/-**
**८०८७६९५०००**

■ ■ ■

## (खबर हटके) जांभई आल्याने तुटली महिलेची मान

ब्रिटनमध्ये एका ३६ वर्षीय महिलेची जांभई देताना मान मोडली.

**तिचा जीव वाचवण्यासाठी डॉक्टरांना आपत्कालीन शस्त्रक्रिया करावी लागली.**






**खरंतर, हेली ब्लॅक नावाच्या महिलेला सकाळी उठल्यानंतर जांभई येताचे तिच्या संपूर्ण शरीरात** विजेचा झटका जाणवला.

**दरम्यान, महिलेचा हात हवेत अडकला होता. स्कॅनमध्ये असे दिसून आले की जोरदार जांभईने तिच्या C6 आणि C7 हाडांना तिच्या मणक्यात ढकलले होते.**

**शस्त्रक्रियेमुळे तिचा जीव वाचला आहे, पण तिच्या मज्जातंतूंना कायमचे नुकसान झाले आहे. ती आता औषधांशिवाय नीट चालू शकत नाही.**







## तंबाखू चघळल्याने कॅन्सर : सिगरेटपेक्षाही धोकादायक

खरं तर कोणतेही व्यसन हानिकारकच आहे. पण, सिगरेट अधिक धोकादायक आणि तंबाखूने काही होत नाही, असा गैरसमज बाळगून तुम्ही असाल तर ही बातमी नक्की वाचा. कारण, बिना धुराचे तुमचे आयुष्य तंबाखू सेवनाने उद्धवस्त होऊ शकते.

नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात असे समोर आले आहे की, गुटखा, पान मसाला आणि जर्दा यासारखे तंबाखू चघळल्याने सिगरेटपेक्षा कर्करोगाला जास्त प्रमाणात प्रोत्साहन मिळते. त्यात असलेली रसायने थेट तोंड आणि घशाच्या पेशींचे नुकसान करतात, ज्यामुळे लवकर आणि आक्रमक कर्करोग होण्याचा धोका वाढतो.

अनेकदा लोकांना असे वाटते की सिगरेट ओढणे अधिक धोकादायक आहे आणि तंबाखू चघळणे फार हानिकारक नाही. तुम्हालाही जर असे वाटत असेल तर तुम्हीही पूर्णपणे चुकीचे आहात. एका अभ्यासात असे दिसून आले आहे की तंबाखू चघळण्यामुळे सिगरेटपेक्षा कर्करोगाचा धोका लवकर वाढतो.

सिगरेटच्या धुरामुळे शरीराचे गंभीर नुकसान होते, तर तंबाखूमध्ये असलेल्या काही धोकादायक रसायनांमुळे शरीराच्या पेशींचे अधिक नुकसान होते. तंबाखू चघळण्यामुळे कर्करोग लवकर आणि आक्रमकपणे विकसित होतो. जे गुटखा, पान मसाला किंवा जर्दा हानिकारक मानत नाहीत त्यांच्यासाठी हे संशोधन एक इशारा आहे. तंबाखू धूम्रपान न करताही आपले जीवन धुरकट बनवू शकते.

अहवालानुसार, एका जागतिक अभ्यासात असे दिसून आले आहे की तंबाखू चघळणाऱ्या लोकांमध्ये तोंडाचा कर्करोग आणि घशाचा कर्करोग अधिक वेगाने विकसित होतो. शास्त्रज्ञांना असे आढळले आहे की तंबाखू चघळण्यामध्ये आढळणारे नायट्रोसामाइन्स आणि पॉलीसाइक्लिक अरोमॅटिक हायड्रोकार्बन सारखे घटक थेट डीएनएला नुकसान करतात.

सिगारेटबद्दल बोलायचे झाले तर सिगारेटमध्ये निकोटीन आणि टारचे प्रमाण जास्त असते, परंतु तंबाखू चघळण्यामध्ये जास्त कार्सिनोजेनिक रसायने असतात. सिगारेटचा धूर शरीरात पोहोचण्यापूर्वी वातावरणात काही प्रमाणात पसरतो, तर चघळलेला तंबाखू तोंडाच्या पेशींच्या थेट संपर्कात येतो.

गुटखा, पान मसाला, जर्दा आणि इतर चघळण्यायोग्य तंबाखूजन्य पदार्थ आजकाल तरुणांमध्ये खूप सामान्य झाले आहेत. ही सवय फॅशन किंवा तणाव कमी करण्याचा एक मार्ग मानली जाते, परंतु या उत्पादनांमुळे कर्करोग तसेच दात किडणे, हिरड्यांचे आजार आणि पाचक समस्या देखील उद्भवतात.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### संत तुकडोजींचा संदेश

**करावे वाचन चिंतन**
**संवादातून करा कृती**
**गावाची होईल प्रगती**
**ही ग्रामगीतेची शक्ति..!**

**ग्रामगीतेचा राज्यकर्ते व**
**जनतेने केला अंगीकार**
**तर रामराज्याचे स्वप्न**
**निश्चीत होईल साकार..!**

**संत तुकडोजींची वाणी**
**दिव्यत्वाची अनुभूती**
**आम्हीच आहो करंटे**
**म्हणून होतेय अधोगती.!**

# एचडीएफसी बँके तर्फे माय बिझनेस क्युआरची सुरुवात, भारतातील पहिल्या छोट्या व्यवसायांसाठी विशेष अशा इन्स्टंट डिजिटल स्टोअर फ्रंट क्युआर ची घोषणा



**मुंबई, १० ऑक्टोबर :** एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे आज त्यांच्या माय बिझनेस क्युआरची सुरुवात करत असल्याची घोषणा ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ मध्ये केली.

माय बिझनेस क्युआर हा छोट्या व्यावसायिकांसाठी विशेष असा भारतातील पहिला कॉमर्स आयडेंटिटी क्युआर आहे. या क्युआरची सुरुवात ही बँकेच्या स्मार्ट हब व्यापार या प्रसिध्द ॲपची पुढची पायरी म्हणून व्यापारीफाय च्या सहकार्याने करण्यात आली असून स्मार्टहब व्यापारचे आधी पासूनच देशभरांतील २ दशलक्षांहून अधिक व्यापारी वापर करत आहेत.

या अनोख्या क्युआरचा उपयोग भारतातील दोन डिजिटल सवयींच्या वापरातून होत आहे. जसे क्युआर पेमेंट आणि चॅट, यामुळे आता सोपा एंगेजमेंट वर आधारीत खरेदीचा अनोखा अनुभव प्राप्त होतो. माय बिझनेस क्युआर मुळे व्यापारी आता त्यांचे डिजिटल प्रोफाईल तयार करुन त्यांच्या स्टोअर फ्रंटला दुप्पट क्षमतेचे प्रोफाईल बनवू शकतील. यामुळे ग्राहक आता स्कॅन करुन त्या व्यापाऱ्याचे प्रोफाईल त्यांच्या फोन मध्ये थेट सेव्ह करु शकतील. माय बिझनेस क्युआर मुळे व्यापारी आता अधिक प्रमाणात सर्च इंजिन ऑप्टिमाईज्ड लिस्टींग्ज मिळवून ग्राहकांना सुध्दा थेट ऑर्डर करुन उत्पादने आणि सेवांसाठी लगेच पेमेंट अतिशय सुरक्षित पध्दतीने करणे शक्य होणार आहे.

एचडीएफसी बँकेच्या या नवीन उत्पादनामुळे एसएमईज ना स्थानिक डिजिटल व्यवसायातील अधिक हिस्सा मिळवणे शक्य होईल, ते सुध्दा अधिकची मोठी गुंतवणूक, जटील गोष्टी किंवा तंत्रज्ञानात सुधारणा न करता हे शक्य होईल.

या सुरुवाती विषयी बोलतांना एचडीएफसी बँकेच्या पेमेंट्स आणि डायरेक्ट बँकिंग चॅनल्स चे प्रमुख रजनीश प्रभू यांनी सांगितले एचडीएफसी बँके मध्ये आम्ही नेहमीच प्रत्येक व्यापाऱ्याला तंत्रज्ञानाने सक्षम करुन त्यांच्या व्यवसायाची वाढ करत ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यास सक्षम करत असतो. आमच्या स्मार्टहब व्यापार ॲप मुळे आम्ही डिजिटल पेमेंट्स व्यापाऱ्यांसाठी सोपे करण्या बरोबरच आता माय बिझनेस क्युआर मुळे त्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेत त्यांचा व्यापार वाढवण्यास मदत करत आहोत. जीएफएफ मधील ही सुरुवात आमच्या छोट्या व्यापाऱ्यांना सोप्या आणि सर्वसमावेशक तंत्रज्ञानाच्या उपायांचा वापर करण्याच्या आमच्या वचनबध्दतेला अधोरेखित करते.

या विषयी अधिक माहिती देतांना व्यापारीफायच्या संस्थापिका रुबी जैन यांनी सांगितले व्यापारीफाय मध्ये आम्ही नेहमीच प्रत्येक छोट्या व्यवसायाला सोपी डिजिटल ओळख देण्यास सक्षम करुन त्यामुळे ते ग्राहकांना सर्च, सेव्ह आणि एंगेज करु शकतील. एचडीएफसी बँके बरोबर एकत्र येऊन आम्ही भारतातील व्यापाऱ्यांना क्षेत्रात प्रथमच कॉमर्स आयडेंटिटी क्युआर देत असून हा क्युआर त्यांची ओळख, शोध आणि ग्राहकांच्या जोडणीसह व्यापारही देत आहेत. हे केवळ तंत्रज्ञान नव्हे तर यामुळे कोट्यावधी स्थानिक व्यावसायिकांना सध्याच्या डिजिटल इको सिस्टिम मध्ये जोडून असलेल्या ग्राहकांबरोबरही जोडण्याची संधी देत आहेत.

# लवकर निदान झाल्यास जीव वाचू शकतो: वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे डॉ. सागर भालेराव यांनी स्तन कर्करोग जागरूकता महिन्याचे महत्त्व सांगितले



**नागपूर, १० ऑक्टोबर :** जगभरात स्तन कर्करोग जनजागृती महिना साजरा होत असताना, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील प्रमुख सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. सागर भालेराव यांनी भारतातील वाढत्या स्तन कर्करोगाच्या धोक्याचा सामना करण्यासाठी लवकर निदान, वेळेवर उपचार आणि योग्य जीवनशैलीबाबत जागरूकता यांचे महत्त्व सांगितले आहे.

डॉ. भालेराव यांनी सांगितले स्तन कर्करोग म्हणजे मृत्युदंड नाही. योग्य जागरूकता, प्रतिबंधात्मक उपाय आणि लवकर निदान यांमुळे आपण अनेक जीव वाचवू शकतो. त्यांनी पुढे सांगितले की स्तन कर्करोगाविरुद्धची पहिली लढाई म्हणजे जागरूकता, जी फक्त रुग्णांसाठीच नाही तर त्यांच्या कुटुंबासाठी आणि संपूर्ण समाजासाठी देखील महत्त्वाची आहे.

भारतातील वाढता स्तन कर्करोगाचा धोका

भारतात दरवर्षी स्तन कर्करोगाचे रुग्ण वाढत आहेत आणि महिलांमध्ये हा आजार सर्वाधिक दिसून येतो. डॉ. भालेराव सांगतात, अधिकांश रुग्ण आमच्याकडे उशिरा येतात, जेव्हा उपचारांचे पर्याय कमी होतात आणि उपचार करणे कठीण होते. नियमित तपासणी करणे आणि स्तनात गाठी किंवा इतर बदल जाणवले तर त्वरित तपासणी करणे अतिशय गरजेचे आहे.

त्यांनी असेही सांगितले की, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर, स्तनाच्या कर्करोगावर लक्ष केंद्रित करून जागरूकता मोहीम आणि तपासणी कार्यक्रम नियमितपणे आयोजित करते, ज्यामध्ये महिलांना लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीबाबत शिक्षित केले जाते.

प्रतिबंधासाठी जागरूकता आणि जीवनशैली महत्त्वाची

डॉ. भालेराव यांच्या मते, योग्य जीवनशैली स्तनकर्करोगाचा धोका कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. तंबाखू सेवन टाळणे, संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे आणि तणाव व्यवस्थापित करणे या सर्व गोष्टी मदत करू शकतात. ते महिलांना नियमितपणे स्वतःची स्तन तपासणी (ब्रेस्ट सेल्फ-एग्झामिनेशन) आणि वयाच्या ४० वर्षांनंतर किंवा कुटुंबात कर्करोगाचा इतिहास असल्यास नियमित मॅमोग्राफी करण्यासाठी प्रोत्साहित करतात. आम्हाला असे वाटते की प्रतिबंध हा सर्वोत्तम उपचार आहे. आमचा उद्देश अधिकाधिक महिलांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि अत्याधुनिक निदान सुविधा उपलब्ध करून देऊन वेळेवर उपचार सुनिश्चित करणे हा आहे, त्यांनी असेही नमूद केले.

भीती आणि गैरसमज तोडण्याची गरज

डॉ. भालेराव यांच्या मते, स्तन कर्करोगाबाबत अजूनही समाजात भीती आणि गैरसमज आहेत. अनेक महिला भीतीमुळे किंवा चुकीच्या समजुतींमुळे डॉक्टरांकडे उशिरा जातात. आता स्तनकर्करोगाविषयी मोकळेपणाने बोलण्याची आणि उपचार घेत असलेल्या महिलांना पाठिंबा देण्याची गरज आहे. लवकर निदान खरोखरच जीव वाचवते, असे ते ठामपणे सांगतात.

आधुनिक उपचार आशेचा किरण

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे अत्याधुनिक सुविधा आणि अनुभवी डॉक्टरांच्या टीमच्या माध्यमातून निदानापासून शस्त्रक्रिया आणि पुनर्वसनापर्यंत स्तन कर्करोगाचे संपूर्ण उपचार केले जातात.

आमचा उद्देश फक्त कर्करोगाचा उपचार करणे नाही, तर प्रत्येक रुग्णामध्ये आशा आणि आत्मविश्वास परत निर्माण करणे आहे, असे डॉ. भालेराव म्हणाले.

स्तन कर्करोग जनजागृती महिन्यासाठी संदेश

डॉ. भालेराव शेवटी म्हणाले, स्तन कर्करोगाबाबतची जनजागृती ही फक्त ऑक्टोबरपुरती मर्यादित नाही, ती दररोजची जबाबदारी आहे. शिका, तपासा आणि इतरांना जागरूक करा. लवकर निदानाची सवय लावली, तर अनेकांचे जीव वाचू शकतात.

# एक्रस लिमिटेड आयपीओ द्वारे ७२० कोटी रु. चे फ्रेश कॅपिटल उभारणार

**मुंबई, १० ऑक्टोबर :** एरोस्पेस व कंझ्युमर सेगमेंटमध्ये पूर्णपणे व्हर्टिकली इंटिग्रेटेड उत्पादन क्षमता सादर करण्यासाठी भारतात एका सिंगल स्पेशल इकॉनॉमिक झोनमध्ये कार्यरत एकमेव प्रिसिजन कॉम्पोनंट (अचूक घटक) उत्पादक एक्रस लिमिटेड (एक्रस) (स्रोत: एफ अँड एस अहवाल) प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) द्वारे ७२० कोटी रु. पर्यंत फ्रेश कॅपिटल उभारणार आहे.

एक्रसने फ्रेश इश्यूसाठी अपडेटेड ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केले असून त्यामध्ये ७२० कोटी रु. पर्यंत प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. याशिवाय, ऑफर फॉर सेल अंतर्गत प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्य असलेले एकूण ३१,७७२,३६८ पर्यंतचे इक्विटी शेअर्स विक्रीसाठी आहेत.

एक्रसचे नेतृत्व स्वतंत्र प्रवर्तक, कार्यकारी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिवपुत्रप्पा मेलिगेरी करत असून ते कंपनीला धोरणात्मक दृष्टीकोन देत नेतृत्व करत आहेत. तसेच, कंपनीकडे अनुभवी व्यवस्थापन संघ असून त्यांना या उद्योग क्षेत्रातील कामाचा चांगला अनुभव आहे. याशिवाय, अमायकस कॅपिटल प्रायव्हेट इक्विटी, एलएलपी, अमायकस कॅपिटल पार्टनर्स, अमांसा इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड, स्टेडव्ह्यू कॅपिटल मॉरिशस लिमिटेड, कॅटामरान एकम आणि स्पार्टा ग्रुप एलएलसी हे गुंतवणूकदार एकत्रितरीत्या ऑफरपूर्व इक्विटी शेअर भांडवलातील २५.५४% हिस्सा धरून आहेत.

जरी एक्रस प्रामुख्याने एरोस्पेस क्षेत्रात कार्यरत असले तरी गेल्या काही वर्षात कंपनीने कंझ्युमर क्लायंट साठी आपल्या उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार करत कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, प्लॅस्टिक्स आणि कंझ्युमर ड्युरेबल्सचा समावेश केला आहे. यामध्ये कुकवेअर सारखी कंझ्युमर ड्युरेबल्स, प्लॅस्टिक्स (आउटडोअर टॉयज, फिगरिन्स), तसेच पोर्टेबल कॉम्प्युटर्स आणि स्मार्ट डिव्हाइसेस सारखी कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्ससाठी कॉम्पोनंट्स यांचा समावेश आहे.

# ग्रोमॅक्स ॲग्री इक्विपमेंटने ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च



**अकोला :** ग्रोमॅक्स ॲग्री इक्विपमेंट लिमिटेड (पूर्वीचे महिंद्रा गुजरात ट्रॅक्टर लिमिटेड), जे महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आणि गुजरात सरकार यांच्यातील संयुक्त उद्यम आहे, यांनी ४डब्ल्यूडी आणि २डब्ल्यूडी कॅटेगिरीमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले आहेत. यामध्ये भारतातील पहिली फॅक्टरी-फिटेड कॅबिन सिरीज (सब-५० एचपी सेगमेंट) समाविष्ट आहे.

ग्रोमॅक्सच्या दमदार आणि इंधन-कार्यक्षम डिझेल इंजिन्स तसेच जागतिक दर्जाच्या गिअरबॉक्स तंत्रज्ञानावर चालणारे हे नवे ट्रॅक्टर उच्च परफॉर्मन्ससाठी ओळखले जातात आणि वापरण्यास सोपे आहेत.

लॉन्चच्या वेळी बोलताना वीजय नाकरा प्रेसिडेंट, फार्मइक्विपमेंट बिझनेस, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड म्हणाले, ग्रोमॅक्समध्ये आमचे ध्येय म्हणजे भारतीय शेतीच्या बदलत्या गरजांना अनुरूप, विश्वासार्ह उत्पादने उपलब्ध करून मॅक्सिमम ग्रोथ साध्य करणे. एका दिवसात ८ नवे ट्रॅक्टर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो प्रत्येक ट्रॅक्टर जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानावर आधारित असून शेतकऱ्यांना वर्षभर उत्पादनक्षमतेसाठी सक्षम बनवण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. भारताचा पहिला सब-५० एचपी फॅक्टरी-फिटेड कॅबिन ट्रॅक्टर लॉन्च करून, ग्रोमॅक्स मूल्य, परफॉर्मन्स आणि परवडणारी किंमत यांचा आदर्श समतोल शोधणाऱ्या वाढत्या ग्राहकवर्गाची सेवा करत आहे. उत्सव काळात लॉन्च झाल्याने हे नवे ट्रॅक्टर ऑक्टोबर २०२५ पासून ग्रोमॅक्स डिलरशिप्सवर उपलब्ध होणार आहेत.

# कोमाकी इलेक्ट्रिकतर्फे फॅम वन आणि टू वाहनांची श्रेणी सादर



**मुंबई, १० ऑक्टोबर :** आघाडीचा इलेक्ट्रिक वाहन ब्रँड असलेल्या कोमाकी इलेक्ट्रिक कंपनीने नुकतीच फॅम वन आणि फॅम टू वाहनांची श्रेणी बाजारात आणली आहे. या वाहनांची प्रारंभिक किंमत अनुक्रमे ९९,९९९ रुपये आणि १,२६,९९९ रुपये आहे. हे वाहन कुटूंबासाठी एक उत्तम राईड सादर करताना आरामदायक सफर घडविण्याबरोबरच बचत वाढविण्यात मोलाचे योगदान देते.

स्मार्ट तीन चाकी इलेक्ट्रिक स्कूटर घरगुती आणि व्यावसायिक अशा दोन्ही हेतुंसाठी तयार करण्यात आलेली आहे. फॅम वन आणि फॅम टू वाहनांचा अनुक्रमे १०० किमीपेक्षा अधिक आणि २०० किमीपेक्षा अधिक पल्ला आहे आणि लिपो फोर बॅटरीचा या स्कूटरमध्ये वापर करण्यात आलेला आहे. या बॅटरीचे प्रगत तंत्रज्ञान अतुलनीय गुणवत्ता, विश्वासार्हता आणि कामगिरी बजावते. तसेच ती दीर्घकाळ टिकते आणि ऊर्जा-कार्यक्षम निकषांचे तंतोतंत पालन करते. लिपो फोर बॅटरी ३००० ते ५००० चार्ज सायकल टिकते. यातून तिचा उच्च-स्तरीय टिकाऊपणा सिध्द होतो.

उत्कृष्ट सुरक्षिततेची हमी देण्यात लिथियम बॅटरी आघाडीवर आहे. मूळातः तिचे आकारमान सुटसुटीत असून वजनाने ती हलकी आहे. अतिउष्णता, आग आणि स्फोट यासारख्या जोखमींचा ती उत्तमप्रकारे मुकाबला करु शकते. ती जलद गतीने चार्ज होत असल्यामुळे ईव्ही वाहनांच्या वापरासाठी डाउनटाइम लक्षणीयरीत्या कमी होतो. शिवाय, तिच्यात कोणतेही विषारी धातू नसल्यामुळे ती पर्यावरणपूरक आहे आणि तिच्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होत नाही.

या वाहनांच्या अनावरणप्रसंगी बोलताना, कोमाकी इलेक्ट्रिक व्हेईकल्सच्या सह-संस्थापक गुंजन मल्होत्रा म्हणाल्या, फॅम इलेक्ट्रिक स्कूटरचे अनावरण हे घरगुती आणि व्यावसायिक या दोन्ही उद्देशांसाठी असून कुटुंबासाठी प्रवासाच्या संकल्पनेला नवे रुप देण्याच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे. हे पर्यावरणपूरक वाहन नवीन पिढीच्या वाहनचालकांना अत्याधुनिक सेवा प्रदान करण्यासाठी आणि दररोजचा प्रवास आरामदायक करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेले आहे.

# वाहन उद्योगाच्या पुढील प्रवासासाठी अभिनवता आणि किफायतशीरपणा यातील समतोल साधत मूल्य आधारित दृष्टीकोन गरजेचा : सीआयआय नेक्सजेन मोबिलिटी शो मध्ये विविध तज्ञांचे मत

**पुणे, १० ऑक्टोबर :** वाहन उद्योग हा झपाट्याने एआय वैशिष्ट्यांसह सॉफ्टवेअर आधारित परिसंस्थांमध्ये परिवर्तित होत आहे.अशा वेळेस अभिनवता,अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि किफायतशीरपणा यामधील समतोल साधत मूल्यआधारित दृष्टीकोन गरजेचा आहे,असे मत तज्ञानी व्यक्त केले. ९ते११ ऑक्टोबर दरम्यान सुरू असलेल्या सीआयआय नेक्सजेन मोबिलिटी शो २०२५ मधील सीआयआय सॉफ्टवेअर - लेड मोबिलिटी कॉन्क्लेव्ह या चर्चासत्रात विविध तज्ञांनी आपले मत मांडले.इनोव्हेट. इंटिग्रेट. इम्पॅक्ट: द फ्युचर ऑफ मोबिलिटी या या संकल्पनेअंतर्गत आयोजित हे आंतरराष्ट्रीय एक्स्पो आणि परिषद वाहन उद्योगातील संपूर्ण मूल्य साखळीतील भागधारकांना एकत्र आणून मोबिलिटीचे भविष्य आकार देत आहेत.




मारुती सुझुकी इंडिया लि.चे कार्यकारी समिती सदस्य सी.व्ही.रमण म्हणाले की,वाहनांमध्ये सॉफ्टवेअर आणि एआय चलित वैशिष्ट्यांचा हिस्सा वाढत असताना मूल्य आधारित दृष्टीकोन गरजेचा आहे.सध्या भारतात प्रत्येक हजार व्यक्तींमागे ३६ कारची संख्या २०३५ पर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे.त्यामुळे पुढील पिढीसाठी वाहने तयार करत असताना एक नव्हे तर ग्राहकांच्या गरजेनुरुप अनेक उपाय शोधावे लागतील.

टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्स आणि टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटीचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी स्वेन पात्युस्का म्हणाले की,भारतीय ग्राहक हा जगातील सर्वात तरुण आहे.त्यांना त्यांच्या आवडी-निवडी आहेत.त्यांना पर्यावरणाची चिंता आहे.जायच्या ठिकाणापेक्षा त्यांना प्रवास आवडतो आणि गाडीमधल्या वैशिष्ट्यांमध्ये स्मार्ट फीचर्स व सतत अपग्रेड्स लागतात.

आरएसबी समूहाच्या व्यवसाय विकास व धोरण विभागाचे कार्यकारी संचालक निशित बेहेरा म्हणाले की, वाहनांमध्ये आधुनिकीकरण होत असताना पुरवठादारांना देखील हे बदल लक्षात घेऊन त्यानुसार गरजांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

कंस्टक्चो ये मुख्य कार्यकारी अधिकारी रवी डोली म्हणाले की, भारतातील वाहन उद्योग हे अभियांत्रिकीसाठी आजवर ओळखले जायचे. सध्याच्या काळात सॉफ्टवेअर हे फक्त क्सेसरी नसून वाहन उद्योगाच्या विकासाला चालना देत आहे.एकेकाळी हार्डवेअरचे वर्चस्व असलेला हा उद्योग सॉफ्टवेअर केंद्रित होत आहे.भारताची सॉफ्टवेअर आणि स्टार्टअप क्षेत्रातील ताकद लक्षात घेता या परिवर्तनामध्ये भारताला मोठी संधी आहे.

टाटा एलक्ससआयच्या ऑटोमोटिव्ह विभागाचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी सुंदर गणपती म्हणाले की, आजचा काळ हा सॉफ्टवेअर चलित वाहन उद्योगाचा आहे.भारतात सादर होणाऱ्या कार्समध्ये अधिकाधिक सॉफ्टवेअरचा समावेश होत आहे.भारताने जीसीसी क्षेत्रात असलेल्या आपल्या प्रावीण्याचा उपयोग स्थानिक बरोबर जगासाठी सोल्युशन्स तयार करायला हवेत.

केपीआयटी टेक्नॉलॉजीजच्या विक्री आणि स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हज विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष संग्राम कदम यांनी या चर्चासत्रात स्वागतपर भाषण केले.

या प्रदर्शनात इलेक्ट्रिक, हायब्रीड, हायड्रोजन आणि पर्यायी इंधन वाहनांमध्ये पुढील पिढीचे तंत्रज्ञान प्रदर्शित करण्यात आले.

# वी ने आयएमसी २०२५ मध्ये ग्राहक आणि व्यवसायांसाठी प्रस्तुत केली वी प्रोटेक्टची एआय-पॉवर्ड सुरक्षा

**मुंबई, १० ऑक्टोबर :** भारतातील आघाडीची टेलिकॉम कंपनी वी ने आज वी प्रोटेक्ट या सर्वसमावेशक एआय-पॉवर्ड उपक्रमाची घोषणा केली. यामध्ये वीचे सर्व ग्राहक, नेटवर्क आणि व्यवसायांच्या सुरक्षेसाठीच्या उपायांना एकत्रित केले जाईल व अशातऱ्हेने स्पॅम, स्कॅम आणि सायबर हल्ल्यांच्या वेगाने वाढत्या धोक्यांच्या विरोधातील उपायांना एकाच छताखाली उपलब्ध करून दिले जाईल.

या उपक्रमांतर्गत वी ने इंडिया मोबाईल काँग्रेस २०२५ मध्ये दोन प्रभावी उपाययोजना प्रस्तुत केल्या आहेत - एआयवर आधारित व्हॉइस स्पॅम डिटेक्शन सिस्टिम आणि एआय-चालित नेटवर्क डिफेन्स आणि इन्सिडेंट रिस्पॉन्स सिस्टिम.

वी ची व्हॉइस स्पॅम डिटेक्शन सिस्टिम धोकादायक आणि फसवे स्पॅम कॉल्स पटकन ओळखते व त्यांची स्पष्ट सूचना देते. अत्याधुनिक एआय मॉडेल्स, वेब क्रॉलर्स आणि युजर फीडबॅक वापरून ही सिस्टिम संशयास्पद कॉलर्स ग्राहकापर्यंत पोहोचण्याच्या आधीच त्यांना ओळखते. एखाद्या वी ग्राहकाला जेव्हा संभाव्य फसव्या नंबरवरून कॉल येईल, तेव्हा फोन स्क्रीनवर सस्पेक्टेड स्पॅम असे दिसेल. त्यामुळे ग्राहक आधीच ठरवू शकेल की त्या कॉलला उत्तर द्यायचे की नाही. याचे काम थर्ड-पार्टी कॉलर आयडी ॲप्सप्रमाणे चालते, ही यंत्रणा वीच्या नेटवर्कमध्ये काम करते त्यामुळे अधिक अचूक असते, यामध्ये गोपनीयता अधिक जास्त असते.

वी प्रोटेक्टच्या माध्यमातून वी कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची सायबर क्षमता आणि ग्राहकांचा विश्वास मजबूत करण्याची आपली वचनबद्धता वी ने अधोरेखित केली आहे आणि भारताचे डिजिटल भविष्य घडवण्यात सुरक्षित आणि विश्वासार्ह योगदान देणारी कंपनी हे आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.

वीचे चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर श्री जगबीर सिंग यांनी वी प्रोटेक्टविषयी सांगितले, भारतात डिजिटलचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, जागतिक स्तरावर भारताचे महत्त्व वाढत आहे, त्यामुळे ग्राहकांचे नेटवर्क सुरक्षित राखणे हे आता अधिक महत्त्वाचे बनले आहे. वी प्रोटेक्टमध्ये प्रगत एआय आणि सक्रिय उपाययोजनांचा वापर केला आहे, ते आमच्या ग्राहकांना सुरक्षित ठेवते व आमचे नेटवर्क मजबूत करते. वी प्रोटेक्ट म्हणजे डिजिटल वातावरणाची सुरक्षितता व विश्वासार्हता वाढावी यासाठीची आमची वचनबद्धता आहे.

# 'कोटक बिझलॅब्स'कडून भारतातील ७५ हून अधिक धाडसी 'स्टार्टअप्स'ना सक्षम करण्यासाठी सीझन-२ लाँच



**मुंबई, १० ऑक्टोबर :** कोटक महिंद्रा बँक लिमिटेडने (केएमबीएल/ कोटक) आज 'कोटक बिझलॅब्स ॲक्सिलरेटर प्रोग्राम'च्या सीझन-२ च्या लाँचची घोषणा केली. हा कार्यक्रम 'कोटक'च्या प्रमुख 'सामाजिक उत्तरदायित्व' (सीएसआर) उपक्रमाचा एक प्रभावी विस्तार आहे. यामध्ये सुरुवातीच्या महसूल टप्प्यातील स्टार्टअप्सना सखोल मार्गदर्शन, बाजारपेठेतील प्रवेश आणि उत्प्रेरक निधीसह पाठिंबा दिला जातो, त्या अनुषंगाने या उपक्रमाची रचना करण्यात आली आहे.

'एनएसआरसीईएल'चे सीईओ आनंद श्री गणेश म्हणाले, की 'कोटक बिझलॅब्सच्या दुसऱ्या सीझनद्वारे भारताच्या गतिमान स्टार्टअप परिसंस्थेला सक्षम करण्यासाठी कोटक महिंद्रा बँकेबरोबर पुन्हा एकदा भागीदारी करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. विविध क्षेत्रातील आशादायक स्टार्टअप्सना सखोल मार्गदर्शन, बाजारपेठेतील प्रवेश आणि उत्प्रेरक निधी प्रदान करून, हा उपक्रम महानगरांव्यतिरिक्त टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये परिवर्तनकारी नवकल्पनांना प्रेरणा देतो. ''एनएसआरसीईएल'मध्ये, आमचे ध्येय भारताच्या विकासाला चालना देणारे प्रभावी उपाय तयार करणाऱ्या धाडसी उद्योजकांना पोषण देण्याच्या कोटकच्या दृष्टिकोनाशी थेट जुळते.'

इन्क्युबेशन भागीदार, आयआयएमए व्हेंचर्स चिंतन बक्षी म्हणाले, की कोटक बिझलॅब्सना वेगळे करणारी गोष्ट म्हणजे टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील संस्थापकांना दिले जाणारे सखोल आणि संरचित समर्थन, ज्यामध्ये काही कठीण सामाजिक आणि पर्यावरणीय आव्हाने सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणारे स्टार्टअप्स आहेत. आयआयएमए व्हेंचर्सच्या भागीदारीत, हा उपक्रम गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांमधील विविध स्टार्टअप्सच्या संस्थापकांना बहुस्तरीय मार्गदर्शन, समर्थन प्रदान करण्यासाठी संरचित आहे, ज्यामध्ये स्थानिक गुंतवणूकदार आणि मालमत्ताधारक (हाय नेट वर्थ इंडिव्हिज्युअल्स - एचएनआयएस) सक्रिय करण्यासाठी चार शहरांमध्ये कार्यक्रम, 'आयआयएमए' येथे सखोल मूलभूत प्रशिक्षण आणि संरचित मार्गदर्शन तसेच तांत्रिक सहाय्य दिले जाते.'

# मला विश्वास आहे की या मालिकेची कथा प्रेक्षकांना आठवण करून देईल की स्त्रियांना समाजाने लादलेल्या मर्यादांनी परिभाषित केले जाऊ शकत नाही, शीझान खान

**मुंबई, १० ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील नवीन मालिका गंगा माई की बेटियाँ ने प्रेक्षकांच्या मनात घर केले आहे. या हृदयस्पर्शी कथेला शीझान खान सिध्दूची भूमिका साकारून एक शक्तीशाली पैलू देत आहे. सिध्दू हा एक भीतीदायक पण खरंतर मुळात एक भावुक पण पैसे उधार देणारा माणूस आहे, ज्याचे आयुष्य मुख्यत्वे त्याच्या आईभोवती फिरते. या मुलाखतीत शीझानने सांगितले की त्याने सिध्दूच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वात कसा जीव ओतला, या मालिकेच्या संकल्पनेसोबत त्याचे वैयक्तिक नाते काय आहे आणि ही कथा प्रेक्षकांच्या मनाशी कशी जुळेल.

प्र. गंगा माई की बेटियाँ ही मालिका जिद्द, आत्मसन्मान आणि कुटुंब या विषयांवर प्रकाश टाकते. हे व्यापक विषय तुझ्यासोबत वैयक्तिक पातळीवर कसे जोडलेले आहेत?

उ. गंगा माई की बेटियाँ ही केवळ एक कथा सांगणारी मालिका नाही, तर माझ्या मते ती आपल्या आयुष्याचेच प्रतिबिंब आहे. जिद्द, सन्मान आणि कौटुंबिक नाती या फक्त कल्पना नाहीत. हे आपण रोज आपल्या आजूबाजूला पाहतो. आपल्या जवळच्या लोकांशी असलेले आपले प्रेम आणि नाते आपल्याला स्वप्ने पाहायला, लढायला आणि कधीही हार न मानायला बळ देतात. या मालिकेचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती एक आई आणि तिच्या मुलींच्या प्रवासातून या सार्वत्रिक मूल्यांचा उत्सव साजरा करते. ती त्या शांत शक्तीचे दर्शन घडवते जी अनेक स्त्रिया आपल्या दैनंदिन आयुष्यात जगतात. मला माझ्या आयुष्यातील अनेक स्त्रिया, मग त्या माझ्या कुटुंबातील असोत, मैत्रिणी असोत किंवा अगदी अनोळखी, अशाच जिद्दीने जगताना दिसतात. हे सर्व पाहून मला प्रेरणा मिळते की या मूल्यांशी नाते घट्ट ठेवावे आणि यातूनच अशा कथा गंगा माई की बेटियाँसारख्या सांगणे का महत्त्वाचे आहे याची आठवण होते.

प्र. ही मालिका त्याग, पितृसत्तात्मक समाज आणि सामाजिक न्याय या विषयांवर प्रकाश टाकते. अशा संवेदनशील विषयांवर काम करताना भारतीय टीव्ही कधी कधी जास्त संदेशात्मक होतो असे तुला वाटते का? आणि गंगा माई की बेटियाँ योग्य संतुलन कसे साधते?

उ. हे खरे आहे की अशा प्रभावशाली विषयांवर काम करताना कधी कधी गोष्ट जास्त संदेशप्रधान किंवा जड वाटण्याची शक्यता असते. पण गंगा माई की बेटियाँ मध्ये मला जे आवडले ते म्हणजे ती कधीही भारी संदेश देत असल्यासारखी वाटत नाही. ही कथा भावनांवर, दैनंदिन संघर्षांवर आणि अशा क्षणांवर आधारित आहे जे प्रेक्षक आपल्या घरबसल्या अनुभवू शकतात.



संदेश पात्रांच्या अनुभवातून नैसर्गिकरित्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो, त्याची जबरदस्ती केली जात नाही. मला वाटते की हेच प्रेक्षकांशी जुळणार आहे; प्रेक्षक कथा आणि तिच्या माणुसकीशी जोडले जातील, आणि यातील विषय वेगळे किंवा खूप नैतिकवादी नाहीत तर नैसर्गिक भाग वाटतील.


## आज का अंदाज

शनिवार ११ ऑक्टोबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार |
|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | |
| १२९ | १४० | १६९ | १९९ | |
| २४६ | २३० | २६८ | २८९ | |
| ३१० | ३५७ | ३६७ | ३७९ | |
| २१ | ५१ | ६० | ९० | |
| २४ | ५४ | ६८ | ९८ | |
| २७ | ५७ | ६३ | ९३ | |

**११ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४६ | ७६ |
| ३७० | २४५ | १६७ | २५० |
| ४६० | ४८९ | ३५६ | ३६८ |
| ५५० | ११९ | २२० | ४६७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ६ ९ ८ ७

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# गंगा माई की बेटियाँ ही केवळ एक कथा सांगणारी मालिका नाही, ती आपल्या आयुष्याचेच प्रतिबिंब आहे : सृष्टी जैन

**मुंबई, १० ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील हृदयस्पर्शी नाट्य गंगा माई की बेटियाँ प्रेक्षकांच्या मनावर आपला ठसा उमटवत आहे, यामागे या मालिकेचे वास्तववादी कथानक आणि प्रभावी पात्रे आहेत. कथानकाच्या केंद्रस्थानी आहे सहाना, गंगा माईची सौम्य पण शांतपणे ठाम पहिली मुलगी, जी साकारत आहे सृष्टी जैन. कुटुंबाचा भावनिक आधार असलेली सहाना आपल्या आईच्या कठीण परिस्थितीला आणि आपल्या लहान बहिणींच्या उत्साही स्वप्नांना संतुलित करते, तसेच घर आणि त्यांची साधी खानावळ यशस्वीपणे चालवते.

प्र. सहाना अनेकदा तिच्या ठाम स्वभावाच्या बहिणी, स्नेहा, आणि तिच्या आईमध्ये समतोल राखते. तू ही संतुलनाची भूमिका स्क्रीनवर कशी साकारलीस?

उ. मला सहानाची मध्यस्थ म्हणून भूमिका तिच्या पात्रातील सर्वात सुंदर पैलूंपैकी एक वाटली. ती हळूहळू आणि संयमाने वातावरणात समरसता राखणारी आहे म्हणून प्रत्येक संवादात तिचा संयम दाखवण्याचा माझा प्रयत्न होता. स्क्रीनवर हे उभे करण्यासाठी मी तिच्या स्वरात सौम्यता, शरीरभाषेत शांतता आणि चेहऱ्यावरील समजूतदारपणा या गोष्टींवर काम केले. ती बोलण्यापेक्षा जास्त ऐकते आणि बोलते तेव्हा नेहमी सहानुभूती आणि सौजन्याने बोलते. हे पात्र साकारताना मी तिच्या सहानुभूतीवर लक्ष केंद्रित केले. ती वाद जिंकण्याचा किंवा आपला मुद्दा सिद्ध करण्याचा प्रयत्न करत नाही, तर प्रेम आणि समरसता जपण्याचा प्रयत्न करते.

प्र. सहानाच्या व्यक्तिरेखेला तिच्या कुटुंबाचा भावनिक आधार म्हणून लिहिले गेले आहे सौम्य पण शांतपणे ठाम. तिच्या कोणत्या गुणांनी तुला कलाकार म्हणून आकर्षित केले?

उ. मला सहानामध्ये सर्वात जास्त आवडलेली गोष्ट म्हणजे तिची शांत ताकद आणि निस्वार्थी स्वभाव. ती संयम आणि भावनिक बुद्धिमत्तेने आपले कुटुंब एकत्र ठेवते. घरातील खानावळ सांभाळणे असो, आईसाठी आधार बनणे असो, किंवा तिच्या ठाम स्वभावाच्या लहान बहिणी आणि आईमध्ये संतुलन राखणे असो, ती नेहमीच समतोलपणा आणि स्थिरता आणते. मला तिच्या सौम्यतेत जिद्द कशी मिसळते हे खूप भावले; तिचा शांतपणा तिची सर्वात मोठी ताकद आहे. तिच्या प्रवासाला आणखी खास बनवणारी गोष्ट म्हणजे ती हळूहळू अधिक आत्मविश्वासी आणि स्वतंत्र स्त्री बनते, तरीही आपली उबदारपणा आणि साधेपणा हरवत नाही.

प्र. सहाना अनेकदा तिच्या ठाम स्वभावाच्या बहिणी, स्नेहा, आणि तिच्या आईमध्ये समतोल राखते. तू ही संतुलनाची भूमिका स्क्रीनवर कशी साकारलीस?

उ. मला सहानाची मध्यस्थ म्हणून भूमिका तिच्या पात्रातील सर्वात सुंदर पैलूंपैकी एक वाटली. ती हळूहळू आणि संयमाने वातावरणात समरसता राखणारी आहे म्हणून प्रत्येक संवादात तिचा संयम दाखवण्याचा माझा प्रयत्न होता. स्क्रीनवर हे उभे करण्यासाठी मी तिच्या स्वरात सौम्यता, शरीरभाषेत शांतता आणि चेहऱ्यावरील समजूतदारपणा या गोष्टींवर काम केले. ती बोलण्यापेक्षा जास्त ऐकते आणि बोलते तेव्हा नेहमी सहानुभूती आणि सौजन्याने बोलते.

# पाय फ्रॅक्चर असूनही सयंतानी घोष आपली आगामी मालिका जगधात्रीच्या चित्रीकरणासाठी वचनबद्ध!

**नागपूर, १० ऑक्टोबर :** झी टीव्हीची आगामी मालिका जगधात्री अशा स्त्रियांचा प्रभावशाली आरसा आहे ज्या रोज शांत पण अखंडपणे लढाया लढतात. ही मालिका एका तरुण मुलीच्या प्रवासाची कहाणी सांगते, जी जणू तिच्या स्वतःच्या घरात अदृश्यच आहे, पण एक निडर अंडरकव्हर एजंट म्हणून अपराधाशी लढण्यास आणि आपली ओळख मिळवण्यास सज्ज आहे.

जगधात्रीच्या भूमिकेत सोनाक्षी बत्रा मुख्य नायिकेच्या रुपात असून या मालिकेत आणखीही जबरदस्त कलाकारांचा समावेश आहे आणि त्यात फर्मान हैदर शिवायच्या भूमिकेत आहे. एक ठाम इच्छाशक्ती असलेली आणि आपल्या जगावर शिस्तीने राज्य करणारी प्रभावशाली मीडिया मोगल मायाच्या भूमिकेत सयंतानी घोष आहे. मायाच्या व्यक्तिरेखेला अनेक स्तर असून ही भूमिका प्रभावशाली आणि सखोल आहे. ती बाहेरून सामर्थ्य दाखवते, तर आतल्या आत संघर्षाचा भार शांतपणे वाहते.

सयंतानी घोष यांची भूमिका तिच्या कामावरील अथक समर्पणामुळे आणखी प्रेरणादायी ठरत आहे. अलीकडेच पायाला फ्रॅक्चर असूनही सयंतानी तिने आपल्या मालिकेसाठी पूर्ण समर्पणाने शूटिंग सुरू ठेवले आहे. तिचा हा चिकाटीचा अनुभव जगधात्रीमधील निडर आणि जिद्दीच्या आत्म्याशी साधर्म्य दाखवतो आणि हे सिद्ध करतो की खरी ताकद ही आव्हानांच्या अभावात नसून त्यांच्यावर मात करण्याच्या धैर्यात असते.

सयंतानी घोष म्हणाली, जगधात्रीमधील मायाची भूमिका साकारणे हा एक सन्मान आणि आव्हान दोन्ही आहे कारण ती अनेक स्तरांची आहे. ती निडर, शिस्तप्रिय आणि तरीही संवेदनशील असे व्यक्तिमत्त्व आहे. दुर्दैवाने अलीकडेच माझा पाय फ्रॅक्चर झाला होता, पण म्हणतात ना की शो मस्ट गो ऑन! मी या अडथळ्यामुळे माझ्या अभिनयावर किंवा प्रेक्षकांबद्दलच्या समर्पणावर काहीही परिणाम होऊ दिला नाही. पण प्रॉडक्शन टीम माझी खूप काळजी घेते, सेटवर सुरक्षिततेची सर्व सोय केली आहे.

## वैदर्भिय गाडीलोहार व तत्समजाती महासंघ, नागपूर

रजि. नं. महाराष्ट्र F/10996 - (N)

त्रैमासिक निवडणुकीचा कार्यक्रम धर्मदाय आयुक्त क्र.-१ नागपूर चे आदेशान्वये निवडणूक अधिकारी म्हणून मला मिळालेल्या अधिकृत अधिकाराच्या वापर करून निवडणुकीचे वेळापत्रक प्रसिद्धकरीत आहे.

निवडणुकीचे वेळापत्रक

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक यादी प्रसिद्ध करणे | १४/१०/२०२५ | सकाळी ११:०० वाजता | गाडीलोहार समाज संघटना, ज्ञानेश्वर नगर, नागपूर |
| २ | प्राथमिक यादीवरील आक्षेप घेणे, स्वीकारणे | १४/१०/२०२५ | दु. १२:०० ते ०२:०० पर्यंत | ——" —— |
| ३ | प्राथमिक यादीवर आक्षेप व सुनावणी | १४/१०/२०२५ | दु. ०२:०० ते ०४:०० पर्यंत | ——" —— |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे | १४/१०/२०२५ | साय. ०५:०० वाजता | ——" —— |
| ५ | उमेदवारी अर्जाचे वाटप करणे | १९/१०/२०२५ | सकाळी ०९:०० ते ११:०० पर्यंत | ——" —— |
| ६ | उमेदवारी अर्ज स्वीकारणे | १९/१०/२०२५ | दु. ११:०० ते ०२:०० पर्यंत | ——" —— |
| ७ | उमेदवारी अर्जाची छाननी व प्रसिद्ध करणे | १९/१०/२०२५ | दु. ०२:०० ते ०४:०० पर्यंत | ——" —— |
| ८ | उमेदवारी अर्जावर आक्षेप घेणे व प्रसिद्ध करणे | १९/१०/२०२५ | दु. ०४:०० ते ०६:०० पर्यंत | ——" —— |
| ९ | वैद्य उमेदवाराची यादी प्रसिद्ध करणे | १९/१०/२०२५ | साय ०६:०० ते ०७:०० पर्यंत | ——" —— |
| १० | उमेदवारी अर्ज मागे घेणे | २६/१०/२०२५ | सकाळी ९:०० ते १२:०० पर्यंत | ——" —— |
| ११ | उमेदवाराच्या नावाने यादी प्रसिद्ध करणे | २६/१०/२०२५ | दु. ०२:०० ते ०४:०० पर्यंत | ——" —— |
| १२ | निवडणूक अविरोध झाल्यास किंवा उमेदवारीत स्पर्धा न झाल्यास निकाल घोषित करणे | २६/१०/२०२५ | दु. ०४:०० ते ०६:०० पर्यंत | ——" —— |
| १३ | उमेदवारी अर्जात स्पर्धा निर्माण झाल्यास मतदान, निकाल घोषित करणे. | ०२/११/२०२५ | सकाळी १०:०० ते ०३:०० पर्यंत | अध्यापक भवन गणेशपेठ बस स्टॅन्ड समोर नागपूर येथे |

टीप : निवडणुकीचा शर्ती व अटी या बाबत ज्ञानेश्वर नगरच्या कार्यालयात प्रसिद्धपत्र व मतदान यादीच्या सोबत पहायला मिळेल.

निवडणूक निर्णय अधिकारी
ॲड. सौरभ राऊत, (नागपूर)

# राकेश तिवारी यांच्यावर गुन्हा दाखल करा : महाविकास आघाडीची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा, दि. १० :** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवर नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर झालेला हल्ला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिलेल्या धर्मनिरपेक्षतेवर हा हल्ला आहे. एकीकडे मूलभूत अधिकार मागणाऱ्या सोनम वांगचूक यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केल्या जातो तर दुसरीकडे ज्यांनी देशाच्या न्यायव्यवस्थेवर हल्ला चढवला त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला जात नाही? ही न्यायव्यवस्थेची खिल्ली तर लोकशाहीची हत्या आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत महाविकास आघाडीच्या वतीने आज धरणे आंदोलन करत राष्ट्रपती यांच्या नावाने निवेदन देण्यात आले. वकील राकेश तिवारी यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा अधिनियमाअंतर्गत देशद्रोहासारखे कडके गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणीच निवेदनातून करण्यात आली.

यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे, उबाठा जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर, आमदार सिद्धार्थ खरात, शिवसेना प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके,जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटील, नरेश शेळके, प्रदेश सरचिटणीस श्याम उमाळकर, सतीश मेहेंद्रे, सुनील सपकाळ, डॉ. इसरार, दिलीप जाधव, गणेश पाटील, ॲड. अनंतराव वानखेडे, प्रा. राजू गवई, डॉ. ज्योती खेडेकर, ईश्वरराव इंगळे, रामभाऊ खेडेकर उपस्थित होते.

# देह व्यापाराच्या दोन अड्ड्यांवर धाड

# आठ पीडितांसह १२ जण ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १० :** शहरातील फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शांतीनगर व गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील न्यू हनुमान नगरमध्ये प्रत्येकी एका घरात देहव्यापाराचा अड्डा सुरू होते. या दोन्ही ठिकाणी गुरुवारी (दि. ९) गुन्हे शाखेने धाड टाकली. या वेळी अड्डा चालवणाऱ्या दोन महिला, एका पुरुषासह, एक ग्राहक आणि आठ पीडितांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

न्यू हनुमान नगरातील एका घरात एक महिला हा अड्डा चालवत होती. याबाबत गुन्हे शाखेला माहिती मिळाल्यानंतर एपीआय अमोल कडू व त्यांच्या पथकाने धाड टाकली. या वेळी पोलिसांनी एक बनावट ग्राहक पाठवला. त्यानंतर धाड टाकली. पोलिसांनी या ठिकाणाहून तीन पीडित महिला तसेच अड्डा चालवणारी एक अशा चौघींना ताब्यात घेतले आहे. या वेळी त्या ठिकाणाहून काही आक्षेपार्ह वस्तूसुद्धा पोलिसांनी जप्त केल्या आहेत. याचवेळी गुरुवारी दुपारी गुन्हे शाखेच्या पथकाने फ्रेजरपुरा हद्दीतील शांती नगरातील एका घरावर धाड टाकली. तेथून देहव्यापार चालवणाऱ्या अनिल भिवाजी पनवार (वय ५५) याच्यासह एक महिला तसेच ग्राहक नीलेश बाबुराव खडसे (३८, रा. महादेव खोरी) यांच्यासह देहव्यापार करणाऱ्या पाच जणींना ताब्यात घेतले. ती महिला व दोन व्यक्तींविरुद्ध फ्रेजरपुरा येथे गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांना प्राप्त माहितीच्या आधारे सपोनि अमोल कडू व महेश इंगोले यांच्या पथकाने या कारवाई केल्या आहेत. या दोन्ही प्रकरणात फ्रेजरपुरा व गाडगेनगर ठाण्यात ‘पीटा’ ॲक्टनुसार स्वतंत्र गुन्हा दाखल केला. विशेष म्हणजे, ३० सप्टेंबरला सुद्धा गुन्हे शाखेने फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत अशीच कारवाई केली होती. कुंटणखाना चालवणारे ग्राहकाकडून १५०० रुपये घेत असून, पीडित महिलेला मात्र प्रति ग्राहक ५०० रुपये देत होते, असे पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत समोर आले. या दोन्ही ठिकाणी मागील काही वर्षांपासून कुंटणखाना सुरू असल्याचे प्राथमिकदृष्ट्या समोर आले. देहव्यापार चालवणाऱ्यांच्या मोबाइल क्रमांकांची पडताळणी करून त्यांना मदत करणाऱ्या व त्यांच्याकडे ग्राहक म्हणून जाणाऱ्या संबंधितांची गुन्हे शाखेकडून चौकशी करण्यात येणार आहे.

# राज्याच्या नव मांडणीची आज गरज : प्रा. ज्ञानेश वाकुडकर



■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १० :** राज्याची सर्व क्षेत्रात होत असलेली पीछेहाट व परिस्थिती बघता राज्यात आज नवमांडणीची गरज असून विकासाच्या दृष्टीने हा नवा परीघ निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे मत नागपूर येथील व्याख्याते प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांनी व्यक्त केले. ते बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या नवरात्र व्याख्यानमालेत बोलत होते. त्यांनी चतुर्थ पुष्प गुंफले. उद्याचा महाराष्ट्र कसा असावा? या विषयावर त्यांनी आपल्या व्याख्यानात ऊहापोह केला. प्रा. वाकुडकर पुढे म्हणाले, गाव म्हणजे विश्वाचा नकाशा, गावावरून देशाची परीक्षा ही संत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेची ओवी खरी करून दाखवण्याची स्थिती निर्माण झाली आहे. ते म्हणाले, राज्याची विकासाची परीक्षा खऱ्या अर्थाने समाजाच्या एकंदर स्थितीवर अवलंबून असते. आपले वास्तविकरित्या राजकीय प्रबोधन झालेच नाही. आधी साधे मतदान कुणाला करावे हेही मतदारांना माहीत नसते. ते म्हणाले, देशाला जिवंत ठेवण्याचे काम हे खऱ्या अर्थाने शेतीचेच आहे. कास्तकार समृद्ध व विकसित झाला पाहिजे. त्याचे अनंत प्रश्न हे शासनाने सोडले पाहिजेत. त्याच्या शेतमालाला भाव मिळाला पाहिजे. शेतकरी सुखी तर देश सुखी ही संकल्पना खऱ्या अर्थाने पूर्ण झाली पाहिजे. मात्र, शेतमालाला भाव, आरक्षण यावर अद्यापही कायमचा तोडगा निघाला नसल्याचे त्यांनी सांगितले. सत्र प्रारंभी बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार, सचिव अनुराग मिश्र यांच्या उपस्थितीत व्याख्याते प्रा. वाकुडकर यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक सचिव अनुराग मिश्रा यांनी केले, तर वक्ता परिचय ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी कवठेकर यांनी केला.आभार सचिव अनुराग मिश्र यांनी मानले. गुरुवारी, ९ ऑक्टोबर रोजी पुणे येथील श्रुती तांबे या ‘२१ व्या शतकातील भारत स्वप्न आणि भविष्यवेध’ या विषयावर पुष्प गुंफणार आहेत. १० ऑक्टोबर रोजी पुणे येथील अन्वर राजन हे ‘समतेच्या दिशेने’ आणि दुसऱ्या दिवशी ११ ऑक्टोबर रोजी ‘हिंदू, मुस्लिम प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मता’ या विषयावर बोलणार आहेत. शेवटच्या दिवशी अर्थात १२ ऑक्टोबर रोजी पुणे येथील नितीश नवसागरे ‘भारतीय संविधानाची ७५ वर्ष’ या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

# शेती, घरांच्या नुकसानीची मदत द्या



## ट्रॅक्टर घेऊन रस्त्यावर उतरले शेतकरी

■ महासागर प्रतिनिधी
**उमरखेड , दि. १० :** तालुक्यातील अतिवृष्टी आणि पैनगंगा नदीच्या पुरामुळे झालेल्या शेती व घरांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना भरीव मदत मिळावी, यासह २१ मागण्यांसाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने उमरखेड उपविभागीय अधिकारी कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. यावेळी ५५ ट्रॅक्टरसह कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीपासून निघालेल्या या मोर्चाने शहरातील प्रमुख मार्गांनी मार्गक्रमण करत उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक दिली. या मोर्चाचे नेतृत्व माजी मंत्री वसंतराव पुरके, सचिन नाईक, तातू देशमुख, साहेबराव कांबळे, राम देवसरकर, दत्तराव शिंदे, नंदकिशोर अग्रवाल यांनी केले. यावेळी काँग्रेसने सादर केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये शेतकऱ्यांची कर्ज माफी करावी यासह आनेक बाबतीत २१ मागण्या करण्यात आल्या. न्यायव्यवस्थेची गळचेपी करून देशात अराजकता निर्माण झाली आहे.

मानवतेसाठी काँग्रेससोबत एकजुटीने उभे राहा,असे आवाहन मोर्चाला संबोधित करताना वसंतराव पुरके यांनी केले. मोर्चाला साहेबराव कांबळे, तातू देशमुख, सचिन नाईक, राम देवसरकर, खाजाभाई कुरेशी, देवानंद मोरे , प्रेमराव वानखेडे आदींनीही शासनाच्या धोरणावर टीका केली.

# बिंद्राबन बाबा यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
**खामगाव , दि. १० :** तालुक्यातील हिवरखेड वासियांचे आराध्य दैवत असलेल्या ब्रिंदाबनबाबाची पुण्यतिथी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. पुण्यतिथी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमा बरोबरच यात्रा पार पडली. भक्तांनी दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. हिवरखेड येथील ग्रामस्थांच्या वतीने २० ते २५ वर्षापासून पुण्यतिथी महोत्सव मोठ्या भक्ती भावाने साजरा करण्यात येत आहे. या गावातील लग्न झालेल्या मुली या काळात माहेरी येऊन बाबांच्या समाधीचे दर्शन घेतात. सभा मंडपात विवाह सोहळ्या बरोबरच अन्य धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. यंदा पहिल्या दिवशी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भक्तांसाठी ७ क्विंटल ज्वारीच्या पिठाच्या भाकरी, तूर, मूग व उडदाच्या मिक्स डाळींचे दोन क्विंटलचे वरण या महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. बिंद्राबन बाबांच्या मंदिरापासून सजविलेल्या रथात बाबांच्या पादुका ठेवण्यात आल्या आणि गावातून दिंड्या पताकासह शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत वेगवेगळ्या गावांमधील भजनी मंडळांसह हिवरखेड व पंचक्रोशीतील महिला व पुरुष सहभागी झाले होते. शोभायात्रेत सहभागी झालेले भाविक बिंद्राबन बाबांचा जयघोष करीत होते. शोभायात्रा गावातील हनुमान मंदिराजवळ दुपारी ४ वाजेच्या सुमारास आली असता तेथे दहीहंडीचा कार्यक्रम पार पडला. मंदिराचे विश्वस्त केशवराव देशमुख यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. त्यानंतर ही शोभायात्रा मंदिरात परत आली आणि शोभायात्रेचा समारोप करण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १८ क्विंटल गव्हाच्या पोळ्या, ३ क्विंटल तुरीच्या डाळीचे वरण, दोन क्विंटल तांदुळाचा भात व ८ क्विंटलची काशीफळाची भाजी तयार करण्यात आली. हा महाप्रसादाचे भाविकांना वितरण करण्यात आला. रात्री उशिरापर्यंत या महाप्रसादाचे वितरण सुरू होते. दोन दिवसाचा महाप्रसाद तयार करण्यासाठी १२ डबे तेल लागले. महाप्रसादाचा १५ ते २० हजार भाविकांनी लाभ घेतला.

# सुपर स्पेशालिटीत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी

## पन्नास वर्षीय महिलेला दिले जीवदान



■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १० :** सुपर स्पेशालिटी रुग्णालय येथे अंडाशयाच्या कर्करोगाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे रुग्ण ५० वर्षीय महिला असुन तपासणी नंतर रुग्णामध्ये २० १५ सें.मी. आकाराची अंडाशयातून उद्भवलेली गाठ आढळली होती. या रुग्णावर स्टेजिंग लॅप्रोटॉमी शस्त्रक्रिया करण्यात आली. यात गर्भाशय, अंडाशय, ओमेंटम, पोट व कंबरेतील काही लसिका ग्रंथी काढून तपासणीसाठी पाठवण्यात आले. ती जवळपास ३ किलो वजनाची ही गाठ ऑन्कोलॉजिक मार्गदर्शक तत्वांनुसार संपूर्ण व अखंड काढण्यात आली. शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ.मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शना खाली ही शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया स्त्रीरोग कर्करोग तज्ज्ञ डॉ. आयुष हेडा यांनी पार पडली. भूलतज्ज्ञ डॉ. सपना अग्रवाल , नोडल ऑफिसर डॉ.रोहिणी राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पारीसे, डॉ.ऐश्वर्या, डॉ.साक्षी सपकाळ, मेट्रन चंदा खोडके, माला सुरपाम यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर बिल्कीस शेख, जया वाघमारे, वंदना जाधव, कोमल खाडे, करण सदर, पायल अंभोरे, ज्योत्स्ना मुंदाने, शंकर झटाले, सागर गणोरकर, लक्ष्मी सोनवणे, सचिन शेरे, आदींचे शस्त्रक्रियेत मोलाचे सहकार्य लाभले. रुग्ण शस्त्रक्रियेनंतर उत्तम प्रकारे बरी होत आहे. असे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये वन्यजीव सप्ताह



■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १० :** अमरावती मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती येथे निसर्ग संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या विविध संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत मोठ्या प्रमाणात वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहादरम्यान कार्यक्रम, उपक्रमांचे बक्षीस वितरण सोहळा पार पडला. बक्षिस वितरण कार्यक्रम वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक एम. आदर्श रेड्डी, यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उप वनसंरक्षक के.अर्जुना, विभागीय वनअधिकारी, मेळघाट व्याघ्र प्रकल्प डॉ. मयूर भैलुमे, वन्यजीव अभ्यासक डॉ. जयंत वडतकर, प्रा. डॉ.सावन देशमुख, राजेश एकघरे, सर्वेश मराठे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या स्पर्धेमध्ये शहरातील होलीक्रॉस इंग्लिश हायस्कूल, ज्ञानमाता इंग्लिश हायस्कूल, जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा, शिवाजी बहुउद्देशीय शाळा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, प्रेमकिशोर सिकची विद्यालय, मनीबाई गुजराथी हायस्कूल, श्रीराम विद्यालय, विनायका गुरुकुल, शारदा विद्यालय, गर्ल हायस्कूल, तक्षशीला महाविद्यालय, महिला महाविद्यालय, भारतीय महाविद्यालय, विनायक विज्ञान महाविद्यालय, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जि.एस. टोम्पे महाविद्यालय व विनायक विद्यामंदिर येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प, स्टैंडिंग फॉर टायगर संस्था, ऑर्गनायझेशन फॉर कुला, युथ फॉर नेचर कंझर्वेशन, निसर्ग संरक्षण संस्था,निसर्ग कट्टा संस्था, अरण्यम संरक्षण संस्था, कार्स संस्था, वन्यजीव व निसर्ग संरक्षण संस्था, भारतीय महाविद्यालय, शिवाजी विज्ञान महाविद्यालय, व संत गाडगेबाबा विद्यापीठ, यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेत्रीय स्तरावर शालेय विध्यार्थ्यांकरिता ट्रेकिंग, वन्यजीव आधारित माहितीपट व सादरीकरण केले. शालेय विध्यार्थ्यांना वने व वन्यजीव संवर्धनाबाबत जागृत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन अतुल तिखे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता विभागीय वनअधिकारी डॉ. मयूर भैलुमे यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे, किरण श्रीखंडे, गोविंद पवार, रेशमा वानखडे, दीपा बेलाह, वनरक्षक, स्वप्नील बांगडे, अतुल तीखे, आनंद विपट, रोशन गोयटे, कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले. अमरावती येथे वन्यजीव सप्ताह समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवर. १ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित वन्यजीव सप्ताहमध्ये प्रामुख्याने वने व वन्यजीव यावर आधारित चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, परिसंवाद स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, फेस पेंटिंग स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, रील स्पर्धा, आयोजित करण्यात आल्या होत्या.

# राजेश्वर मंदिराला ‘ब’ दर्जा

## शासन आदेश जारी : पुनर्विकास होणार



■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १० :** जिल्ह्याचे आराध्य दैवत राजेश्वर मंदिराला ‘ब’ वर्ग दर्जा देण्याचा शासन निर्णय नगर विकास विभागाने बुधवारी जारी केला. त्यामुळे मंदिर व परिसराचा पुनर्विकासाचा मार्ग प्रशस्त झाला आहे. आता पुनर्विकासाचा आराखडा व त्यासाठीचा निधी किती मंजूर होतो, याकडे शिवभक्तांचे लक्ष लागले आहे.

दिवसेंदिवस शिवभक्तांची संख्या वाढतच आहे. परिणामी राजराजेश्वर मंदिर व परिसराचा विकास, भक्तांसाठी सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. भक्तांना शिव-शक्तिची अनुभूती यावी, वातावरण भावपूर्ण असावे, भाविकांना आणखी व्यवस्थित दर्शन घेता यावे, या अनुषंगाने पुनर्विकासासाठी भाजप लोकप्रतिनिधींकडून पाठपुरावा करण्यात आला. मंदिराला ‘क’ व नंतर ‘ब’ वर्गाचा दर्जा मिळण्यापासून ते १५८ कोटी रुपयाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. भविष्यात ५०० कोटी रुपयाचा प्रस्तावही शासनाने मंजूर करावा, या दृष्टीने भाजप आमदार रणधीर सावरकर यांनी प्रयत्न केले. जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या बैठकीत आराखड्यावर चर्चा करण्यात आली. ५१८.६४ कोटींच्या आराखड्यात मंदिर परिसर व मोर्णा नदी घाट विकास प्रस्तावित करण्यात आला.

# आर्थिक गैरव्यवहारात वाहनीचे सरपंच पदमुक्त

■ महासागर प्रतिनिधी
**भंडारा , दि. १० :** आर्थिक गैरव्यवहार प्रकरण वाहनी येथील सरपंचांचे अंगलट आले आहे. गैरव्यवहार सिद्ध झाले असल्याने नागपूर विभागीय आयुक्तानी सरपंच आशिष ढबाले यांना सरपंच पदावरून पदमुक्त केले आहे. सिहोरा परिसरात आठवड्यात दोन सरपंच पदमुक्त झाले आहेत. उपसरपंचाला सरपंच पदाचा प्रभार देण्यात येणार आहे. वाहनी येथील ग्रामपंचायतची थेट सरपंच पदाची निवडणूक २२ डिसेंबर २०२२ ला घेण्यात आली आहे. या निवडणुकीत सरपंच पदावर आशिष आसाराम ढबाले हे निवडून आले. ३१ जानेवारी २०२३ ला मासिक सभेत आर्थिक अधिकार आणि बँकेतील खाते बदल करण्याचा ठराव घेण्यात आला होता. परंतु ११ जानेवारी २०२३ ला आर्थिक देवाण घेवाण करण्याचे अधिकार प्राप्त झाले नसताना साहित्य पुरवठा धारक यांना २ लाख ३९ हजार आणि १ लाख २१ हजार रुपये ग्रामसेवक आणि सरपंच यांनी डीएससीच्या आधाराने देण्यात आले. सरपंच आशिष ढबाले हे बेजबाबदारपणे वागल्याचे दिसून आले. ग्रामसेवकाने सरपंचाचे डीएससीचा उपयोग करून साहित्य पुरवठा धारकांला देयक अदा केले. ही चुकीची बाब लक्षात आल्यानंतर सरपंच आशिष ढबाले यांनी पोलिस ठाण्यात ग्रामसेवकाचे विरोधात तक्रार दाखल केली नाही, असा ठपका मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवालात ठेवला आहे. आर्थिक देवाण घेवाण करण्याचे अधिकार प्राप्त होण्याचे आधीच आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला आहे. नियमबाह्य देयक अदा करण्यात आले. मुख कार्यपालन अधिकारी यांनी पदमुक्तची कारवाई केल्यानंतर नागपूर विभागीय आयुक्ताचे दालनात दाद मागणारे प्रकरण गेले. विभागीय आयुक्तानी सुनावणी घेतल्यानंतर तक्रार कर्त्यांचे अर्ज मंजूर केले. ९ ऑक्टोबरला सरपंच आशिष ढबाले यांना सरपंच पदावरून पदमुक्त करण्यात येत असल्याचे आदेश दिले आहे. याशिवाय ग्रामसेवकावर कारवाईचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात राधेश्याम शिंदे, विजय बांडेबूचे, शांताराम ढबाले, रवी माथरे यांनी नागपूर विभागीय आयुक्ताकडे प्रकरण दाखल केले होते. १३ सदस्य असलेल्या सिहोरा ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचा दुरुपयोग केल्याने रंजना दिनेश तूरकर यांना पदमुक्तच्या कारवाईला सामोरे जावे लागले आहे.

## जिल्ह्यातील सातपैकी ४ पंचायत समितींवर महिलांचे राज्य

**अकोला :** जिल्हा परिषदे अंतर्गत येणाऱ्या सात पंचायत समितीच्या सभापती पदाची आरक्षण सोडत निघाली आहे. यावेळी चार पंचायत समितीच्या सभापती पदासाठी महिला आरक्षण निघाल्याने तेल्हारा, अकोला, पातूर व बार्शीटाकळी या पंचायत समितीवर महिलांचा राज राहणार आहे. तर दुसरीकडे पंचायत समितीमध्ये सत्ता स्थापनेसाठी सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी ‘फिल्डिंग’ लावण्यास सुरूवात केली आहे.जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत नियोजन भवनात गुरुवारी काढण्यात आली. सातपैकी चार पंचायत समित्यांमध्ये महिलांचे आरक्षण निघाले आहे.

## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क- स्तर कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर**

एम.जे.सी. क्र. ८६/२०२५ — प्रोसेस क्र. १३३३/२०२५
पे.ता. १०-११-२०२५ — दिनांक १०/१०/२०२५

Applicant : 1) Shri Sanjay S/o Balaji Mohurle, Aged-49 Years, Occu. Private. 2) Shri Shantaram S/o Balaji Mohurle, Aged-52 Years, Occu. Private. 3) Shri Kailash S/o Balaji Mohurle, Aged-46 years, Occu. Private, All R/o Behind Haidri Masjid, Bajrang Park, Kamptee, Tah. Kamptee, Distt. Nagpur.
V/s
Non Applicant : NIL

मयत **Late Smt. Chhabubai W/o Balaji Mohurle, मयत दि. २९/०८/२०२४** at Lata Mangeshkar Hospital, Digdoh Hingna, Nagpur District-Nagpur **Late Shri Balaji S/o Kishan Mohurle मयत दि. २३/१०/१९९५**

**सदरहू अर्जदारांने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Smt. Chhabubai W/o Balaji Mohurle, मयत दि. २९/०८/२०२४** at Lata Mangeshkar Hospital, Digdoh Hingna, Nagpur District-Nagpur **Late Shri Balaji S/o Kishan Mohurle २३/१०/१९९५ यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारी कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. १०/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजत ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखवरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत या उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Smt. Chhabubai W/o Balaji Mohurle, मयत दि. २९/०८/२०२४** at Lata Mangeshkar Hospital, Digdoh Hingna, Nagpur District-Nagpur **यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**आज दि. ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी**

## पब्लिक नोटीस (जाहीर सूचना)

**कोर्ट विद्यमान ६वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नागपूर**

नियमित दिवाणी दावा क्र. : ६९४/२०२५ — प्रो. नं. १९७२२
रुम नं. ७०६ — दिनांक : ०७/१०/२३
पे.ता. ३०/१०/२०२५

वादी : १) छाया अमर चौधरी व इतर
...विरुद्ध...
प्रतिवादी : जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर.
चळीळपस व्यक्ती : अमर विशाल चौधरी (Missing dtd. 30/12/2027)
रा. घसियापुरा, लष्करी बाग, नागपूर.

ज्याअर्थी उपरक्त अमर विशाल चौधरी (Missing dtd. 30/12/2027) रा. घसियापुरा, लष्करी बाग, नागपूर. हा बेपत्ता आहे. तो दि. ३०/१२/२०१७ पासून बेपत्ता झाला व त्यानंतर तो जिवंत किंवा मृत असल्याबद्दल त्याच्याविषयी कोणतीही माहिती उपरोक्त वादीस नसल्याचे वादीनी आपल्या दाव्यात नमूद केलेले आहे. सबब सदर अमर विशाल चौधरी तो अंदाजे ०८ वर्षापासून बेपत्ता असून तो मृत झाल्याचे घोषित करण्यासाठी व वादी हे त्याचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यासाठी उपरोक्त वादीने या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर सूचनेद्वारे अमर विशाल चौधरी यांचे सर्व नातेवाईकांना, संबंधीतांना व आम जनतेस सूचित करण्यात येते की, त्यांचेबद्दल कोणत्याही व्यक्तीस, तो जिवंत असल्याबद्दल किंवा मृत झाल्याबद्दल कोणतीही माहिती असल्यास किंवा वादी हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत काही आक्षेप हरकत असल्यास अश्या व्यक्तींनी अशी माहिती किंवा हरकत या न्यायालयात दिनांक ३०/१०/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावी नेमून दिलेल्या तारखेस अश्याप्रकारचे कोणतीही माहिती किंवा हरकती या न्यायालयात उपस्थित न झाल्यास उपरोक्त दाव्याची एकतर्फी सुनावणी करण्यात येईल.

दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नागपूर**

## Change Of Name

MY OLD NAME WAS **SHRIRAM SURAJI SONPURE**. NOW MY NEW NAME IS **SHRIRAM SONPURE.**
**ADD :** TORANWADA, BETUL, MP, 460551

MY OLD NAME WAS **SANJAYKUMAR SEVAKRAM KIALDASWANI**. NOW MY NEW NAME IS **SANJAY SHEVAKRAM KHIYALDASANI.**
**ADD :** PLOT NO 20 HEMU KALANI CHOWK JARIPATKA NAGPUR 440014

MY OLD NAME WAS **SAMBHUNATH THAG CHAUDHARY**. NOW MY NEW NAME IS **SHAMBHU CHAUDHARY.**
**ADD :** P. NO. 9 NEW BORJUWADA CANEL LANE NEAR GAJANAN MANDIR SAVNER NAGPUR - 441107

MY OLD NAME WAS **MALEKHA BI MOHD MAKHDOOM**. NOW MY NEW NAME IS **MALIKABI SHAIKH NABI.**
**ADD :** RAM RAHIM NAGAR UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **RESHMA BANO D/O SD HAROON**. NOW MY NEW NAME IS **RESHAMA PRAVIN SAYYAD AKABAR.**
**ADD :** GANESH NAGAR KURUNDA BASMAT HINGOLI 431512

MY OLD NAME WAS **MOHAMMAD MUNAWWAR ALI**. NOW MY NEW NAME IS **MUNAWWAR ALI SALAMAT ALI.**
**ADD :** PLOT NO 6 ,SHIV NAGAR VANDEVI CHOWK NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **MAHEKKUMAR NARENDRABHAI PATEL / MAHEKKUMAR NARENDRA PATEL**. NOW MY NEW NAME IS **MAHEK NARENDRA PATEL.**
**ADD :** PLOT NO 26, HIWRI LAYOUT, NEAR POONAM MALL, NAGPUR - 440008

MY OLD NAME WAS **UMME HABIBA**. NOW MY NEW NAME IS **HUSAINI UMME HABIBA FAIYYAZUL HASAN HAIDRY.**
**ADD :** GHAR NO.1364 ASHOK NAGAR NAGPUR 440017
PASSPORT NO.**H9403909**

MY OLD NAME WAS **PRAVINKUMAR HARISHKUMAR MANGHARAMANI** . NOW MY NEW NAME IS **PRAVIN HARISHKUMAR MANGHARAMANI.**
**ADD :** HOUSE NO 23,SHRI NARAYAN KRUPA, DATE COLLEGE ROAD, BEHIND LOYA HOSPITAL, VAIDYA NAGAR, AVATMAL - 445001

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण

## बाबा यागाची झोपडी

रशियन लोककथा

रशियात वरझुगा नावाचे एक लहानसे गाव आहे. गावात वासिलिका नावाची एक मुलगी राहत होती. तिची सावत्र आई ओलेन्का तिचा खूप छळ करत असे. एकदा वासिलिकाला तिच्या सावत्र आईने घरातल्या सगळ्यांसाठी स्वेटर्स विणायला सांगितले. 'हे सगळे स्वेटर्स एका दिवसात विणून झाले नाहीत, तर मी तुला घरातून हाकलून देईन.' 'ओलेन्का म्हणाली. बिचारी वासिलिका. ते सगळे स्वेटर्स पूर्ण करण्यासाठी तिला रात्रभर काम करावे लागणार होते. रात्री अंधारात काम करण्यासाठी तिला उजेडाची गरज होती. वासिलिकाला तिच्या आईने मरण्यापूर्वी एक जादूची बाहुली दिलेली होती. 'उजेड मिळवण्यासाठी तुला बाबा यागाकडून प्रकाश आणावा लागेल.' जादूची बाहुली म्हणाली. गावाजवळच्या जंगलात बाबा यागा राहत होती. जंगलाच्या आत अगदी खोल घनदाट झाडीत तिची जादूची झोपडी होती. त्या झोपडीला कोंबड्याचे पाय होते. आश्चर्य म्हणजे ती झोपडी जमिनीवर एका जागी स्थिर नव्हती. ती हवेत उडू शकायची. सगळ्यांना बाबा यागाची भीती वाटायची. 'मी बाबा यागाला मुळीच घाबरत नाही.' वासिलिका म्हणाली. उंच उडणाऱ्या त्या झोपडीत प्रवेश करायला वासिलिका उंच झाडावर चढली. झोपडी त्या झाडाजवळ आली की बाबा यागा तिची जादूची झोपडी एकदम उंच किंवा एकदम खाली घेऊन जाई. बिचारी वासिलिका. उंचावरून खाली पडून तिचे गुडघे फुटले. अंग खरचटले. शेवटी बाबा यागाला तिची दया आली. तिने वासिलिकाला झोपडीत येऊ दिलं. ' मी सांगेन ती कामं केलीस आणि मला खुश केलेस तरच तुला मी 'प्रकाश' देईन.' बाबा यागा म्हणाली. बाबा यागाने तिला खूप कठीण कामे करायला लावली. पण वासिलिकाने जादूच्या बहुलीच्या मदतीने सगळी कामे भराभर केली. अखेर बाबा यागा तिच्यावर प्रसन्न झाली. तिने वासिलिकाला जादूच्या कवटीमध्ये प्रकाश दिला. तो प्रकाश घेऊन वासिलिका घरी आली. सगळ्या वरझुगा गावात तो प्रकाश पसरला. तिच्या पराक्रमामुळे आणि गोड स्वभावामुळे वरझुगाच्या राजपुत्राने तिच्याशी लग्न केले. वासिलिका गावाची राणी बनली.





## अंटार्क्टिकाच्या अंतरंगात...

आगळंवेगळं जग

छोट्यांनो, अंटार्क्टिका हा एक खंड आहे. अंटार्क्टिका म्हणजे जगाचं टोक. अंटार्क्टिकावर सगळीकडे बर्फच बर्फ पहायला मिळतो. म्हणूनच अनेकांना या खंडाबद्दल प्रचंड आकर्षण वाटतं. बरेच संशोधक अंटार्क्टिकावर जाऊन संशोधन करत आहेत. अंटार्क्टिकावर बरंच काही पहायला मिळतं. या अजब अशा अंटार्क्टिकाविषयी जाणून घेऊ.

■ पृथ्वीचा दक्षिण ध्रुव अंटार्क्टिकावरच आहे. या ठिकाणाला ॲम्युंडसेन-स्कॉट दक्षिण ध्रुव स्थानक असं नाव देण्यात आलं आहे. १९११ मध्ये नॉर्वेच्या ॲम्युंडसेन यांच्या नेतृत्वाखालील चमूने दक्षिण ध्रुवावर पहिलं पाऊल ठेवलं होतं. हे मानवाचं दक्षिण ध्रुवावरचं पहिलं पाऊल होतं.

■ अंटार्क्टिकावर भारतानेही संशोधन केंद्र उभारलं आहे. 'भारती' असं या संशोधन केंद्राचं नाव आहे. या कायमस्वरुपी केंद्राच्या माध्यमातून भारताचे शास्त्रज्ञ अंटार्क्टिकावर संशोधन करत आहेत. यासोबतच 'दक्षिण गंगोत्री' आणि 'मैत्री' ही केंद्रंही आहेत.

■ पृथ्वीच्या या दक्षिण ध्रुवावरची कोरडी आणि थंड हवा, समुद्रसपाटीपासूनची उंची आणि पृथ्वीच्या अक्षांवरचं स्थैर्य यामुळे अंटार्क्टिकावरून आकाशनिरिक्षणाची संधी साधता येते. इथे भली मोठी दुर्बिण बसवण्यात आली आहे. या दुर्बिणीतून आकाशातले ग्रह, तारे बघता येतात.

■ दक्षिण ध्रुवावर फारसं प्रदूषण नाही. त्यामुळे इथल्या प्रयोगशाळेत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांचे निष्कर्ष बऱ्याच अंशी अचूक असतात.

■ अंटार्क्टिकावर कोणाचंही सरकार नाही. या खंडावर कोणत्याही देशाचा अधिकार नाही. पण जगातल्या बऱ्याच देशांमध्ये अंटार्क्टिकाबाबत करार झाले आहेत.

■ दक्षिण ध्रुवावर बर्फाचा भला मोठा थर असल्यामुळे उत्तर ध्रुवाच्या तुलनेत दक्षिण ध्रुव अधिक थंड आहे.

## हार्मोनियम

ओळख वाद्यांची

हार्मोनियम हे सुषिर वाद्यांपैकी एक लोकप्रिय वाद्य आहे. हे पेटीच्या आकाराचे असून त्याला 'बाजाची पेटी' किंवा संवादिनी असेही म्हणतात. या वाद्यात पितळेच्या पात्यांपासून आवाज निर्माण होतो. यात पियानोप्रमाणे पांढऱ्या आणि काळ्या कळा असतात. मागे एक 'बेलोज' म्हणजे हवा भरण्याची पिशवी असते. ती हाताने चालवली जाते. हवा आत गेल्यावर ती धातूच्या 'रीड्स' मधून जाते आणि सूर उमटतो. फ्रान्स मधील अलेक्झेंडे डेबेन याने १८४० मध्ये हार्मोनियमचा शोध लावला. त्याने ९ ऑगस्ट १८४० ला पॅरिस मध्ये आपल्या नावावर हार्मोनियमचे पेटंट करून घेतले होते. हार्मोनियम वाजवणे तुलनेने सोपे असल्यामुळे ते गायकांच्या साथीला सर्वाधिक वापरले जाते. भजन-कीर्तन, शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, गझल आणि चित्रपटसंगीतातही हार्मोनियमचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. साधारणपणे १९ व्या शतकात युरोपातून हे वाद्य भारतात आले असे म्हटले जाते. त्यानंतर हे वाद्य भारतीय संगीतामध्ये इतके मिसळले की ते आता भारतीय परंपरेचाच भाग वाटते.



हार्मोनियममध्ये स्केल चेंज ही खास सुविधा असते. त्यामुळे त्यातून गायकाच्या आवाजाला अनुरूप स्वर मिळवता येतात. पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व यांच्यासारख्या गायकांच्या साथीसाठी हार्मोनियमचे विशेष स्थान होते. आजही अनेक संगीत शाळांमध्ये प्राथमिक शिकवणी हार्मोनियमवरच सुरू केली जाते. याचे सूर स्वच्छ, स्पष्ट आणि स्थिर असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वर शिकणे सोपे जाते. हार्मोनियम म्हणजे संगीताच्या अभ्यासाचा आधारस्तंभ आणि भारतीय संगीताचा अविभाज्य घटक आहे.

## सह्याद्री पर्वतरांग

सह्याद्री पर्वतरांगेला पश्चिम घाट असेही म्हणतात. ही भारतातील एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. सह्याद्री पर्वतरांग महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील भागात,गोवा,कर्नाटक,केरळ आणि तमिळनाडू या राज्यांत पसरलेली आहे. सह्याद्री पर्वतांची लांबी सुमारे १,६०० किलोमीटर असून ते अरबी समुद्राच्या किनाऱ्याला समांतर पसरले आहेत. या रांगेची उंची साधारणपणे ९०० ते १२००मीटर दरम्यान आहे.काही शिखरे २,६०० मीटरपर्यंत उंच आहेत.कळसुबाई शिखर, भैरवगड, रत्नगड, साल्हेर, हरिश्चंद्रगड, म्हैसाळगड, राजगड, तोरणा ही महाराष्ट्रातील तर कर्नाटकातीलमुल्लयनगिरी शिखर आणि केरळातील अणमुदी शिखर प्रसिद्ध आहेत. कळसूबाई शिखर१६४६ मीटर उंच असून ते महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर मानले जाते. सह्याद्री पर्वतरांग नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक किल्ले, धबधबे, नद्या आणि दाट जंगलांनी समृद्ध आहे. कृष्णा,गोदावरी आणि कावेरी यासारख्या अनेक नद्या येथे उगम पावतात. सह्याद्री जैवविविधतेसाठीही प्रसिद्ध आहे. विविध प्रकारचे पक्षी,कीटक आणि प्राणी या जंगलांमध्ये राहतात. युनेस्कोने त्याला जागतिक नैसर्गिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे.इतिहासाच्या दृष्टीनेही सह्याद्री पर्वत अनेक गड-किल्ल्यांसाठी ओळखला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्यांचा उपयोग आपल्या साम्राज्याच्या सुरक्षेसाठी आणि लढायांसाठी केला. रायगड, प्रतापगड, तोरणा, हरिश्चंद्रगड, राजगड यासारख्या किल्ल्यामुळे सह्याद्रीला सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे.नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, पावसाळ्यातील धबधबे, आणि निसर्गप्रेमींसाठी असलेली आकर्षणे यामुळे सह्याद्री पर्वतरांग पर्यटक आणि गिर्यारोहकांसाठी स्वर्ग मानली जाते. त्यामुळेच सह्याद्री पर्वतरांग महाराष्ट्राचे अभिमानस्थान आहे.





## महागडे कुत्रे

फन टाईम

दोस्तांनो, कुत्रा हा ईमानदार प्राणी. बरेचजण कुत्रा पाळतात. वेगवेगळ्या प्रजातींची कुत्री पहायला मिळतात. प्रत्येक प्रजातीची वैशिष्ट्यं, गुण वेगवेगळे असतात. कुत्रे विकत घेण्यासाठी पैसे मोजावे लागतात. जगातले काही कुत्रे खूप महागडे आहेत. या कुत्र्यांच्या किंमती वाचून तुम्हालाही आश्चर्याचा धक्का बसेल. अशाच काही महागड्या कुत्र्यांची ओळख करून घेऊ.

▶ 'सेंट बर्नर्ड' हा खूप मोठ्या आकाराचा कुत्रा आहे. कुत्र्यांची ही प्रजाती खूप प्रेमळ असते. काश्मीर, अंटार्क्टिका तसंच इतर बर्फाळ प्रदेशात माणसं बर्फाखाली गाडली जातात. या माणसांना शोधण्याचं काम हे कुत्रे करतात. त्यांना सतत प्रशिक्षण द्यावं लागतं. या प्रजातीच्या कुत्र्याची किंमत ७२ हजार ते २.६ लाख रुपयांच्या घरात असते.

▶ 'केस कोर्सो' प्रजातीचे कुत्रे ग्रीसमध्ये आढळतात. त्यांच्या अंगावर केस असतात. हे केस वेळोवेळी काढून टाकावे लागतात. हे कुत्रे युद्धात सहभागी होत असत. त्यांच्यावर राखण करण्याची जबाबदारी असते. त्यांना शेताची राखण करण्यासाठी ठेवलं जातं. या कुत्र्याची किंमत १.८ लाख ते २.६ लाख रुपयांच्या घरात आहे.

▶ 'अफगाण हाउंड' या प्रजातीचे कुत्रे खूप सुंदर दिसतात. या कुत्र्यांना सगळं स्वतंत्रपणे करायला आवडतं. ते खूप प्रेमळ असतात. 'अफगाण हाउंड' ही कुत्र्यांची पृथ्वीवरची सर्वात जुनी प्रजाती आहे. हे कुत्रे माणसांसोबत शिकारीला जात असत. त्यांची किंमत १.१० लाख ते २.६ लाख रुपयांपर्यंत असते.

▶ 'पग' ही कुत्र्यांची प्रजाती चीनमधल्या राज्यकर्त्यांमध्ये बरीच लोकप्रिय होती. डच व्यापाऱ्यांनी ही प्रजाती युरोपला नेली. हे कुत्रे हुशार असतात. ते हट्टीही असतात. या कुत्र्यांसाठी १.८ ते २.६ लाख रुपये मोजावे लागतात.

ठिपके जुळवा



## अशी आहे यो-यो चाचणी

जाणून घ्या

मुलांनो, तुम्ही यो-यो टेस्टबद्दल ऐकलं असेल. यो-यो ही क्रिकेटपटूंच्या तंदुरुस्तीची चाचणी असते. ही यो-यो चाचणी म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ.

♥ भारतीय क्रिकेट संघातल्या प्रत्येक खेळाडूला यो-यो चाचणी द्यावी लागते. या चाचणीत उत्तीर्ण होणाऱ्या खेळाडूंची संघात निवड केली जाते. मैदानात उतरणारा प्रत्येक खेळाडू तंदुरुस्त असायला हवा. म्हणूनच यो-यो चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे.

♥ यो-यो चाचणी ही संकल्पना सर्वात आधी फुटबॉलपटूंसाठी राबवण्यात आली. आता मात्र क्रिकेटच नाही तर हॉकीच्या खेळाडूंनाही ही चाचणी द्यावी लागते.

♥ क्रिकेटपटूंची चाचणी बंगळूरूमधल्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत घेतली जाते.

♥ यो-यो चाचणी डेन्मार्कचे फूटबॉल फिजिओलॉजिस्ट जेन्स बँग्सबो यांच्या संकल्पनेतून साकारली आहे.

♥ यो-यो ही सॉफ्टवेअरवर आधारित चाचणी आहे. यात खेळाडूंना ठराविक अंतर धावावं लागतं. यावरून खेळाडूंच्या तंदुरुस्तीबाबत निष्कर्ष काढले जातात. फूटबॉल, क्रिकेट आणि रग्बी या खेळांसाठी यो-यो चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे.




## ...म्हणून वाढतं वजन

हेल्थ वेल्थ

छोट्यांनो, तुम्हाला नेहमीच्या पोळी भाजीपेक्षा फास्ट फूड, जंक फूड जास्त आवडतं. लिंबू सरबतापेक्षा कोल्डड्रिंक प्यावंसं वाटतं. तुमच्या वयाच्या बऱ्याच मुलांचं वजन वाढलेलं असतं. पण अशा प्रकारे वजन वाढणं चांगलं नाही. वाढलेल्या वजनामुळे मोठं झाल्यावर बराच त्रास होतो. मधुमेह, उच्च रक्तदाबासारखे विकार जडतात. म्हणूनच वजन नियंत्रणात ठेवायला हवं. आपण बरंच काही खातो, पितो. पण काही पदार्थांमुळे, पेयांमुळे आपलं वजन वाढू शकतं. वजन वाढवणारे पदार्थ कोणते? जाणून घेऊ.

⇨ वजन कमी करण्यासाठी बरेच जण डाएट करतात. पण ही फॅट डाएट्स तुमचं वजन वाढवू शकतात. डाएट केल्यामुळे शरीराची वजन वाढण्याची क्षमता वाढते. चयापचय क्रियेचा वेग मंदावतो. सतत खावंसं वाटतं. त्यामुळे कोणाच्या नादी लागून भलतीच डाएट्स करू नयेत.

⇨ कोल्डड्रिंक आरोग्यासाठी घातक आहे. या कोल्डड्रिंकमध्ये साखरेचं प्रमाण बरंच जास्त असतं. त्यामुळे वजन वाढण्याची शक्यताही जवळपास सहापटींनी वाढते. या पेयांची गोडी वाढवण्यासाठी साखरेसोबतच कृत्रिम गोड पदार्थही घातले जातात. यामुळे दात खराब होतात. तसंच आरोग्यावर वाईट परिणाम होतात.

⇨ बरीच मुलं टीव्ही बघताना वेफर्स, पिझ्झा तसंच इतर जंक फूड खातात. टीव्ही बघत असताना आपलं खाण्यावर नियंत्रण रहात नाही आणि वजन वाढू लागतं.

⇨ रात्री झोप येत नसेल तर आई-बाबांना सांगा. आपल्या शरीराला पुरेशी झोप हवी असते. अपुऱ्या झोपेमुळेही वजन वाढू शकतं. त्यामुळे सात ते आठ तासांची झोप घ्यायला हवी.

⇨ तुम्हा मुलांवरही बराच ताण असतो. भरपूर अभ्यास करण्याचा, चांगले गुण मिळवण्याचा दबाव असतो. तुमचीही बरीच धावपळ होते. पण हा ताण तुमचं वजन वाढवू शकतो. त्यामुळे ताणाला जरा लांबच ठेवा. संध्याकाळी मैदानी खेळ खेळा. व्यायाम करा. यामुळे ताण निघून जाईल.





## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) जर्मनीचं चलन कोणतं?
२) लीप वर्षात किती दिवस असतात?
३) ऑस्ट्रेलियाची राजधानी कोणती?
४) हॉकीच्या एका संघात किती खेळाडू असतात?
५) बंगळूरू या शहराला कोणत्या नावाने ओळखलं जातं?
६) आयएएसचं पूर्णरुप काय?
७) एनजीओचं पूर्णरुप काय?
८) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष कोण?
९) सरहद्द गांधी म्हणून कोण ओळखलं जातं?
१०) भारत छोडो आंदोलनाची सुरुवात कोणत्या वर्षी झाली?

उत्तरं : १) युरो २) ३६६ ३) कॅनबेरा ४) ११ ५) गार्डन सिटी ६) इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेस ७) नॉन गव्हर्नमेंटल ऑर्गनायझेशन ८) ॲनी बेझंट ९) खान अब्दुल गफार खान १०) १९४२

दोस्त हे मस्त

### 'अटलांटिक पफिन'



मुलांनो, पक्षी आकाशात निवांत विहार करत असतात. जगात अनेक सुंदर आणि आकर्षक पक्षी पहायला मिळतात. 'अटलांटिक पफिन' हा सुद्धा असाच एक सुंदर पक्षी आहे. हा पक्षी एखाद्या खेळण्यासारखाच दिसतो. याचे डोळे आणि चोच खूप आकर्षक असते. या पक्ष्याला समुद्री पोपट असंही म्हटलं जातं. हा पक्षी हवेत भरारी घेतो शिवाय पाण्यातही ६० मीटरपर्यंत खोल जातो. 'अटलांटिक पफिन' हा अनोखा पक्षी आहे.

खादाडी

### चीजी डिप

दोस्तांनो, तुम्हाला चीज आवडत असेल. मग मस्तपैकी चीजी डिप बनवता येईल. यासाठी एक कप चीज, दोन चमचे मैदा, अर्धा चमचा मीठ, अर्धा चमचा मिरपूड, दोन चमचे बटर आणि दोन कप दूध हे साहित्य घ्या. आता एका कढईत बटर गरम करून घ्या. यात मैदा घालून परतून घ्या. त्यानंतर दूध घालून उकळी येईपर्यंत हलवत रहा. मग यात मिरपूड आणि मीठ घाला. त्यात किसलेलं चीज घाला. चीज वितळेपर्यंत हलवत रहा. तुमचं डिप तयार आहे. हे डिप थंड होऊ द्या. नाचोस, वेफर्स, पापडसोबत हे डिप खाता येईल.



स्टडी टिप्स

### तयारी परीक्षेची...



छोट्यांनो, तुम्हाला आता वार्षिक परीक्षेचे वेध लागले असतील. वार्षिक परीक्षेत जास्त जोर लावावा लागतो. परीक्षा कोणतीही असली तरी अभ्यास करायलाच हवा. सर्वात आधी तुमचं वेळापत्रक तयार करा. परीक्षेच्या तारखा आणि अभ्यासक्रमानुसार वेळेचं नियोजन करा. अभ्यासाची वेळ स्वतःच ठरवा. अभ्यास करताना टीव्ही, मोबाईल बंद ठेवा. सगळं लक्ष अभ्यासावर केंद्रित करा. प्रत्येक विषयाला समान वेळ द्या.

योगा टाईम

### मत्स्यासनाने आजारांना दूर ठेवा

मुलांनो, तुम्हाला सारखा सर्दी-खोकला होतो का? मग योगासनं करा. योगामुळे आपलं आरोग्य उत्तम राहतं. मत्स्यासनामुळे सर्दी-खोकला तसंच श्वसनाशी संबंधित आजार बरे व्हायला मदत होते. या आजारांना प्रतिबंध म्हणूनही हे योगासन करता येईल.



# गुणवत्तेसोबत कुठलीही तडजोड करू नका...

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन : फॉरेन्सिक सिव्हिल इंजीनियरिंग या विषयावर अखिल भारतीय चर्चासत्र



गडकरी यांना इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सतर्फे लाइफटाईम फेलोशीप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

बांधकाम क्षेत्रातील व्यावहारिक समस्या समजून घेण्याची गरज आहे. त्याचवेळी पयार्यी बांधकाम सामग्रीच्या सहाय्याने निर्माण खर्च कमी करण्यावर भर द्यायला हवा. गुणवत्तेशी कुठलीही तडजोड न करता बांधकाम क्षेत्रातील अभियंता तसेच हितधारक यांनी पर्यावरण पूरक आणि शाश्वत असे बांधकाम करावे, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले.

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर शाखेच्या वतीने 'फॉरेन्सिक सिव्हिल इंजीनियरिंग' या विषयावरील दोन दिवसीय अखिल भारतीय चर्चासत्राचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स एमएसईचे अध्यक्ष ए. डब्ल्यू जवंजाळ तसेच इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअरचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष कोठारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी गडकरी यांना इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या वतीने फेलोशिप प्रदान करण्यात आली. कृतज्ञता, आदर आणि प्रेमाचे प्रतीक म्हणून ही लाइफटाइम फेलोशिप प्रदान करण्यात आली. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्सच्या १०५ वर्षांच्या इतिहासात, या फेलोशिपचा मान पटकाविणारे गडकरी १२ वे दिग्गज आहेत.

इमारत बांधकाम क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाविषयी बोलताना गडकरी यांनी सांगितले की, सध्याच्या काळात 'रोड फॅक्टरी'ची गरज असून 'प्री-कास्ट' मटेरियलच्या असेंबलींगच्या सहाय्याने आता रोड आणि इमारतींचे निर्माण आवश्यक आहे. यामुळे प्रत्येक जिल्ह्यात प्री कास्ट टेक्नॉलॉजीचा वापर झाल्यास ते उद्योगाला फायदेशीर ठरेल, असे गडकरी यावेळी म्हणाले. उड्डाणपुलामध्ये स्टील फायबरच्या उपयोगामुळे दोन पीअर मधील अंतर कमी झाले आहे. त्यामुळे बांधकाम खर्चात देखील कपात झाली आहे.

वणी-वरोरा-जाम येथे बांबूचे क्रॅश बॅरियर्स लावल्यामुळे सुद्धा खर्च वाचला आहे. बायो बिटुमीनच्या सहाय्याने मनसर येथे १ किलोमीटर लांबीचा रस्ता देखील नुकताच बनवण्यात आला आहे.

अशा प्रकारच्या शाश्वत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तसेच पर्यावरण पूरक आणि भविष्यातील दृष्टिकोन ठेवून बांधकाम केल्यास अपघाताच्या घटना कमी होईल, असेही गडकरी म्हणाले.

# ..त्याच्या सुटकेचा मार्ग मोकळा!



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

भारतात तस्करीदरम्यान पकडलेल्या ओरंगुटान या प्राण्याला इंडोनेशियात परत पाठवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

जामनगर येथील वनतारा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ग्रीन झुऑलॉजीकल, रेस्क्यू अँड रिहॅबिलिटेशन सेंटरने वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेला याबाबत पत्र लिहिले आहे. हा प्राणी आधी नागपूर येथील गोरेवाडा वन्यजीव बचाव केंद्र व नंतर वनतारा येथे पाठवण्यात आला होता.

नोव्हेंबर २०२४ मध्ये कल्याणमधील एका इमारतीतून विदेशी वन्यप्राण्यांची तस्करी वनविभागाने उघडकीस आणली. यावेळी अनेक विदेशी वन्यप्राण्यांच्या प्रजाती जप्त करण्यात आल्या. त्यात प्रामुख्याने उत्तर आणि मध्य अफ्रिकेत आढळणारे सहा बॉल पायथॉन, जागतिक स्तरावरील सर्वात मोठ्या अजगरापैकी एक असलेले गोल्डन चाइल्ड रेटिक्युलेटेड अजगर, एक सरडा, तीन पट्टे असणारे मातीत राहणारे कासव, एक भारतीय तारा कासव आणि एक इंडोनेशियातील सुमात्रा बेटांवर आणि बोर्नियोच्या इंडोनेशियन भागात आढळणारा ओरंगुटान हे प्राणी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर या सर्व प्राण्यांची रवानगी नागपूर येथील गोरेवाडा बचाव केंद्रात करण्यात आली.

मात्र, मार्च २०२५ मध्ये ह्यग्रीन झुऑलॉजीकल, रेस्क्यू अँड रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये या प्राण्याची रवानगी करण्यात आली. या निर्णयावर अनेक वन्यजीवप्रेमींनी नाराजी दर्शवली. या केंद्रात प्राणी गेल्यानंतर तो त्याच्या मूळ अधिवासात परत जाणार नाही, अशी भीती त्यांना होती.

माधुरी हत्तीच्या प्रकरणानंतर वनतारा अधिक चर्चेत होते. वनतारा येथे बेकायदेशीररित्या प्राणी आणले जात असल्याचे प्रकरण देखील न्यायालयात होते. न्यायालयाने मात्र वनताराच्या बाजूने निर्णय देत येथे कोणतेही प्राणी बेकायदेशिररित्या आणले जात नसल्याचा निकाल दिला.

मात्र, आता ग्रीन झुऑलॉजीकल, रेस्क्यू अँड रिहॅबिलिटेशन सेंटरचे संचालक डॉ. ब्रिजकिशोर गुप्ता यांनी वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेला लिहिलेल्या पत्रात ओरंगुटानची प्रकृती आता स्थिर असून तो इंडोनेशियाला परत पाठवण्यासाठी पूर्णपणे योग्य आहे, असे नमूद केले आहे.

मार्गदर्शक तत्त्वानुसार त्याला इंडोनेशियाला परत पाठवण्याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती देखील केली आहे. केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय आणि संबंधित वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेने प्रसिद्ध केलेल्या सर्व निर्देशांचे पूर्ण पालन करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत आणि आवश्यक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी पूर्ण सहकार्य करू, असेही या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे ओरंगुटान आता लवकरच इंडोनेशियात परत जाण्याचे संकेत मिळत आहेत.

# आवास योजनांतील लाभार्थ्यांना १० टक्के मोफत मिळण्याचा मार्ग मोकळा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

महाराष्ट्र सरकारने गरिबांच्या घरकुल स्वप्नाला बळ देणारा मोठा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री आवास योजना आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवगार्तील घरकुल योजना या योजनांतील लाभार्थ्यांना १० टक्के मोफत वाळू मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



राज्य सरकारने यासंदर्भात सुधारित शासन निर्णय जारी केला असून, या निर्णयामुळे गरीब कुटुंबांना घर बांधताना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा आर्थिक बोजा लिलावधारकांवर न टाकता सरकार स्वतः उचलणार आहे, अशी माहिती महसूल विभागाकडून देण्यात आली आहे.

राज्य सरकारने अलीकडेच वाळू धोरणात मोठे बदल केले आहेत. राज्यातील वाळू व्यवस्थापन आणि घरकुल योजनांना गती मिळावी यासाठी आता तीन वर्षांतून एकदा होणारा वाळू लिलाव दरवर्षी केला जाणार आहे. यामुळे वाळूच्या उपलब्धतेचा प्रश्न सुटणार असून, बांधकाम प्रकल्पांना आवश्यक वाळू वेळेवर मिळू शकेल. तसेच, खाणकाम आराखडा, पर्यावरण परवानगी आणि इतर आवश्यक परवानग्यांचा कालावधी एक वर्षावर मर्यादित करण्यात आला आहे. या सुधारणा वाळू तस्करी रोखण्यासाठी आणि पारदर्शक व्यवस्थापनासाठी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

# दलित असल्यामुळेच सरन्यायाधीशांवर हल्ला

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ला हा ते दलित असल्यामुळेच झाला आहे, असा थेट आरोप केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केला आहे. भूषण गवई हे स्वतःच्या मेहनतीने सरन्यायाधीश झाले. पण सवर्ण समाजातील काही लोकांना हे रुचले नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला, असे आठवले म्हणालेत.

भूषण गवई हे दलित समाजाचे असल्यामुळे त्यांना लक्ष्य करण्यात आल्याचा आरोप केला. तसेच हल्ला करणाऱ्या वकिलावर अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (अॅट्रोसिटी) कारवाई करण्याचीही मागणी केली. रामदास आठवले म्हणाले, भारताच्या सरन्यायाधीशांवर अशा प्रकारचा हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ आहे. भूषण गवई हे दलित समाजातून आलेले आहेत. कठोर अभ्यास करून व स्वतःच्या प्रयत्नांनी प्रथम मुंबई उच्च न्यायालय व नंतर सर्वोच्च न्यायालयात स्थान मिळवले. पण सवर्ण समाजातील काही लोकांना हे रूचत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला.

लोकरंग

: साप्ताहिक संवाद :

## स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान राज्यात यशस्वी

प्रत्येक कुटुंबाचा प्रमुख आधार म्हणजे त्या कुटुंबातील एक स्त्रीच असते. सकाळ पासून रात्री झोपेपर्यंत सतत राबणाऱ्या या स्त्रीला निसगार्ने देखील जणू भरपूर ऊर्जा बहाल केलेली दिसते. परंतु असं असलं तरी हीच स्त्री जर शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या देखील सशक्त आणि सुदृढ असेल तरच संपूर्ण कुटुंब हे सशक्त होऊ शकत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवा हाच संकल्प आणि भारत हीच प्रेरणा याच संकल्पनेतून संपूर्ण राज्यात स्वस्थ नरी सशक्त परिवार हे अभियान राज्यात राबविले गेले आणि ते यशश्वी देखील झाले. याच निमित्ताने राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**राज्यात स्वस्थ नरी सशक्त परिवार हे अभियान राबविले गेले त्याबद्दल थोडक्यात?**

■ आपल्या महाराष्ट्र राज्यात १७ सप्टेबर ते २ ऑक्टोबर या काळात राबविण्यात आलेल्या स्वस्थ नरी सशक्त परिवार या अभियानाला नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि एकनाथ शिंदे तसेच कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या स्वस्थ नरी सशक्त परिवार या अभियानातंर्गत एकूण २,३०,६५० आरोग्य शिबिरांचे आयोजन राज्यभर करण्यात आले. या शिबिरांमध्ये तब्बल १ कोटी ८ लाख ५९ हजार नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यापैकी ३२ लाख ७१ हजार पुरुष अंडी ७५ लाख ८७ हजार महिला लाभार्थी ठरल्या आहेत.

**या अभियानाची संकल्पना नेमकी काय होती?**

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवा हाच संकल्प, भारत हीच पहिली प्रेरणा यानुसार राष्ट्रीय स्तरावर सर्व राज्यांमध्ये स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान राबविण्यात आले.

महाराष्ट्रात आरोग्य विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे या अभियानाला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. स्त्रीशक्तीला आरोग्य शक्तीची साथ देण्यासाठी आणि महिला आरोग्य सशक्तीकरणाला प्राधान्य देण्यासाठी हे अभियान राबविले गेले.

या अभियानांतर्गत राज्यभर महिला आणि बालकांच्या आरोग्य तपासणीसह विविध उपक्रमाचं आयोजन करण्यात आले.

**स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत महिलांच्या कोणकोणत्या आजारांसंदर्भात जनजागृती केली गेली?**

■ संपूर्ण राज्यभर राबविण्यात आलेल्या या अभियानांतर्गत महिलांच्या असंसर्गजन्य आजार,उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग विशेषतः स्तनाचा कर्करोग, क्षयरोग आणि रक्ततपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, बालकांचे लसीकरण, पोषण आणि मासिक पाळी, स्वछतेबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात आले. याशिवाय रक्तदान शिबीर, निक्षय मित्र नोंदणी मोहीम, आयुष्यमान कार्ड, वितरण, मातृवंदना कार्ड वितरण,आणि अंगणवाडी केंद्रामार्फत पोषण जनजागृती उपक्रम राबविण्यात आले.

■ ■ ■

## सोन्याच्या वाढत्या दराबाबत कामा ज्वेलरीचे संचालक कॉलिन शहा यांचा दृष्टिकोन

घरेलू बाजारात प्रति 10 ग्रॅम 1,22,000 आणि आंतरराष्ट्रीय बाजारात प्रति औंस $4,000 या स्तरावर पोहोचणं, हे सोन्याने प्रस्थापित केलेलं एक नवीन ऐतिहासिक शिखर आहे,ह्व अशी प्रतिक्रिया कामा ज्वेलरीचे व्यवस्थापकीय संचालक कॉलिन शहा यांनी दिली आहे.



शहा यांच्या मते, जरी जागतिक भू-राजकीय अस्थिरता आणि आर्थिक अनिश्चितता कायम असली, तरी सध्या सोन्याच्या किंमती गगनाला भिडण्यामागे अमेरिकन सरकारचा शटडाऊन हे मुख्य कारण ठरलं आहे.

या ट्रेन्डमध्ये काहीसा तात्पुरता बदल किंवा स्थिरता दिसून येऊ शकते. मात्र जागतिक बाजारातील सकारात्मक परिणामांमुळे किंमतींचा एकंदर कल चढता राहणार आहे. लवकरच आंतरराष्ट्रीय बाजारात सोने $4,037 प्रति औंस आणि देशांतर्गत बाजारात 1,30,000 प्रति 10 ग्रॅम या दरांपर्यंत जाऊ शकते, असा अंदाजही त्यांनी व्यक्त केला.

या किंमत वाढीचा परिणाम म्हणून, जागतिक पातळीवर मागणीत घट झाली आहे, विशेषतः किरकोळ दागिन्यांच्या बाजारपेठेत, जिथे ग्राहकांचे खचार्बाबत भान अधिक जाणवत आहे.

आजचा ग्राहक अधिक सजग असून, मोठ्या प्रमाणावर बुलियन खरेदीला प्राधान्य देत आहे, जे त्यांना आर्थिक अस्थिरतेपासून सुरक्षित ठेवू शकते,ह्व असे शहा यांनी स्पष्ट केले.भारतीय बाजारात 9, 14 आणि 18 कॅरेटच्या हलक्या वजनाच्या दागिन्यांना वाढती मागणी आहे. यामागे परवडणारी किंमत आणि सणासुदीच्या खरेदीचे वातावरण हे दोन महत्त्वाचे घटक आहेत.दुसरीकडे, पारंपरिक जड दागिन्यांची मागणी सध्या काहीशी मंदावलेली असली तरी ती तात्पुरती असून, हिवाळी विवाहहंगामात पुन्हा उभारी घेईल, असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला.

■ ■ ■

## मध्यप्रदेशातील बांधवगड उद्यान

मध्य प्रदेशमध्ये अनेक पर्यटन स्थळे आहेत ज्यांनी जगभरातील लोकांना आकर्षित केले आहे. यात भारतातील काही महत्त्वाच्या पुरातत्त्व स्थळांचा समावेश आहे, ज्यापैकी अनेक युनेस्को जागतिक वारसा स्थळे आहेत.

प्रागैतिहासिक गुंफा, तीर्थक्षेत्रे आणि अभयारण्ये यांचे सुरेख मिश्रण असलेल्या मध्य प्रदेशात प्रत्येकासाठी काहीतरी आहे. मध्य प्रदेशात येणारे पर्यटक या राज्याचे सौंदर्य आणि तेथील समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा पाहून थक्क होतात.

ओरछा किंवा उर्छा हे मध्य प्रदेशातील निवारी जिल्ह्यात स्थित एक विलक्षण शहर आहे. या शहराची स्थापना राजपूत शासक रुद्र प्रताप सिंग यांनी 1502 मध्ये केली होती. हे पूवीर्चे संस्थान आता जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणारे महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. हे ठिकाण एमपी मधील पर्यटन स्थळांमध्ये सर्वात वरचे स्थान आहे आणि ते रस्ते आणि रेल्वेने प्रवेश करण्यायोग्य आहे. येथील स्मारकांमध्ये राजपूत आणि मुघल स्थापत्यकलेचे जटिल मिश्रण दिसते. राम राजा मंदिर, जहांगीर महाल, चतुर्भुज मंदिर, उथ खाना, लक्ष्मी मंदिर आणि छत्री ही येथे पाहण्यासारखी लोकप्रिय ठिकाणे आहेत.

. मध्यप्रदेशातील बांधवगड राष्ट्रीय उद्यान हे राज्यातील आणखी एक प्रमुख व्याघ्र प्रकल्प आहे. 105 चौ.कि.मी.मध्ये पसरलेल्या या जैवविविधता उद्यानात ए रॉयल बंगाल वाघांचा ब?यापैकी मोठा संग्रह. तुम्ही उद्यानात सफारी करून या वाघांना जंगलात फिरताना पाहू शकता.

याव्यतिरिक्त, आपण पांढरे वाघ, बिबट्या आणि हरीण सारखे इतर प्राणी देखील पाहू शकता. मध्य प्रदेशातील या प्रसिद्ध ठिकाणी येण्यासाठी पर्यटकांना प्राचीन बांधवगड किल्ला देखील शोधता येईल. या गवताळ प्रदेशांच्या विक्रीच्या झाडांवर तुम्हाला विविध प्रकारचे पक्षी देखील आढळतात. मध्य प्रदेशात जाताना बांधवगड राष्ट्रीय उद्यानाला भेट देणे सर्व पर्यटकांसाठी आवश्यक आहे.

■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com




## कुणबी प्रमाणपत्राबाबत शासनआदेश
# हैदराबाद गॅझेटपुरता मर्यादित

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे मराठा आरक्षणाबाबत शासनाची भूमिका स्पष्ट केली. राज्य शासनाने काढलेला आदेश हा हैदराबाद गॅझेटपुरता मर्यादित असून ओबीसींची माथी भडकवून संभ्रम निर्माण करू नये, असा स्पष्ट इशारा महसूलमंत्री व मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष बावनकुळे यांनी दिला.



ते म्हणाले, सरकारने जीआर काढताना कोणतीही कुणबी व्यक्ती ओबीसी आरक्षणापासून वंचित राहू नये ही काळजी घेतली आहे. सरकार ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. मात्र हेतू लक्षात न घेता संपूर्ण महाराष्ट्रात या निर्णयाविरुद्ध आकांडतांडव करून महाराष्ट्रातील ओबीसी समाजावर अन्याय होत आहे, असा संभ्रम निर्माण केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ओबीसी समाजाच्या संपूर्ण रक्षणासाठी अतिशय प्रभावीपणे काम करत आहेत. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ओबीसी शिष्टमंडळाला ओबीसींच्या आरक्षणाला किंचितही धक्का लागणार नाही, असे आश्वासन दिले आहे.

उध्दव ठाकरेंच्या मराठवाड्यात निघणाऱ्या हंबरडा मोर्च्याबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, ज्यांनी मराठवाड्याच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष करून निजामासारखे व्यवहार केले; ते आता विकासाच्या गप्पा मारत आहेत.आमचे महायुती सरकार केवळ नावे बदलत नाही, तर मराठवाड्याला विकासात अग्रस्थानी आणण्यासाठी आणि सर्वसामान्य लोकांचे जीवनमान उंचावण्यास कटिबद्ध आहे.

महायुती सरकारने औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर असे नामांतर करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंनी मात्र मराठवाड्यावर निजामासारखा अन्याय केला आणि या भागाला विकासापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले. आम्ही केवळ शहरांची नावे बदलली नाहीत, तर मराठवाड्याच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

बावनकुळे म्हणाले, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महायुती म्हणून कशी तयारी करायची, जागावाटप कसे सांभाळायचे, यावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्ष यांच्या पातळीवर तसेच जिल्हा समित्यांमध्ये चर्चा सुरू आहे.

## ओबीसी मोर्चाची धडक आणि भरली धडकी!





■ **नागपूर :** मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात राज्य सरकारने काढलेला २ सप्टेंबरचा जीआर रद्द करण्याच्या मागणीसाठी ओबीसी समाजाच्यावतिने आज शुक्रवारी नागपूर येथे अभूतपूर्व मोर्चा काढण्यात आला. विदर्भासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने ओबीसी बांधव या मोर्चात सहभागी झाले होते.

**सर्व छायाचित्र : आशिष चेडगे, साकोली**



■ **नागपूर :** पतीच्या दीर्घायुष्यासाठी सौभाग्यवतींकडून करवा चौथ हे व्रत आज देशभरात साजरे करण्यात आले. दिवसभर कठीण उपवास करून रात्री चंद्रदर्शन झाल्यानंतर सौभाग्यवती उपवास सोडतात. यावेळी एका विशिष्ट प्रकारच्या जाळीतून चंद्र पाहण्याची प्रथा आहे. नागपूर शहरातही महिलांनी हा सण साजरा केला.

## महिला प्राध्यापकाला २३ लाखांचा गंडा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
सायबर गुन्हेगारांनी गुंतवणुकीवर बक्कळ नफ्याचे आमिष दाखवून एका महिला प्राध्यापकाची २३ लाख रुपयांनी फसवणूक केल्याचे प्रकरण पुढे आले आहे. सायबर पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

आरोपी इंस्टाग्रामच्या माध्यमातून पीडितेच्या संपर्कात आले. त्यानंतर त्यांनी पीडितेला एका बनावट ऑनलाईन इन्व्हेस्टमेंट ग्रूपशी जोडले. या ग्रूपचे इतर सदस्य गुंतवणुकीवर त्यांना लाभ झाल्याचे सांगत होते आणि पैसे जमा झाल्याचे स्क्रीनशॉटही ग्रूपवर टाकत होते. त्यामुळे पीडितेचा विश्वास बसला. पीडितेला विश्वासात घेतल्यानंतर आरोपींनी वेळोवेळी स्वतःच्या विविध बँक खात्यांमध्ये महिलेकडून २३ लाख रुपये जमा करून घेतले. मात्र जेव्हा पीडितेने पैसे काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना अडचण आली.

त्यांनी आरोपींशी संपर्क केला असता आरोपींनी आणखी पैसे जमा करण्यासाठी दबाव टाकला. आपली फसवणूक झाल्याचे समजताच पीडित प्राध्यापकाने सायबर पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# २२ वर्षीय युवकाचा सापळा मिळाला





■ **महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. १० :**
एका २२ वर्षीय तरुणाचा सापळा मिळाल्याने परीसरात एकच खळबळ उडाली. तरुणाचा सापळा सावनेर कळमेश्वर मार्गा लगत वाघोडा डब्लुसीएलच्या वनराईत शुक्रवारी मिळाला. मृतकाचे नांव करण सोमा तुमडाम असून, तो बोरगाव (बु) ता. कळमेश्वर येथील रहिवासी होता. तो १६ सप्टेंबर पासून बेपत्ता असल्याने पोलीस स्टेशन सावनेर येथे वडील किसनराव यांनी तोंडी तक्रार दिली होती. त्यावरून सावनेर पोलिसांनी बेपत्ता असल्याची नोंद केली होती.

घटनेची माहिती काही लोकांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे दिली. एसडीपीओ सागर खर्डे व पोलीस निरीक्षक उमेश पाटील आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. पोलीस कर्मचारी अंकुश मुळे, नंदू मेश्राम, माणिक शेरे यांनी पंचनामा केला. समाजसेवी हितेश बनसोड यांच्या रूग्णवाहिकेने सापळा नागपूर मेडिकल कॉलेज येथे पाठविण्यात आला. घटनास्थळी फॉरेन्सिक टीमने पाहणी केली, मृतकाच्या कपड्यावरून त्याच्या वडिलांनी ओळख पटवली. त्यांच्याच तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास ठाणेदार उमेश पाटील करीत आहेत.

## देहव्यापाराचा भंडाफोड

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :**
गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने गोपनिय माहितीच्या आधारावर बेलतरोडी ठाण्यांतर्गत एका हॉटेलवर धाड टाकून देहव्यापाराचा भंडाफोड केला. पोलिसांनी सेक्स रॅकेट चालविणाऱ्या महिलेसह दोघांना अटक केली. तसेच तीन पीडित महिलांच्या या नरकातून सुटका केली.

कांचन मोरेश्वर निमजे (२८) रा. गोळीबार चौक आणि दीपक हेमंतकुमार शुक्ला (२१) रा. संत ताजुद्दिन बाबानगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून रोकड, मोबाईल फोन आणि आक्षेपार्ह वस्तू जप्त केल्या आहेत. माहितीच्या आधारावर पोलिसांनी हॉटेलवर धाड टाकली. दोन्ही आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता ग्राहकांना मुली उपलब्ध करण्यासोबतच खोलीही उपलब्ध करीत होते. आरोपींनी त्यांना पैशांचे आमिष दाखवून जाळ्यात अडकवले होते. पोलिसांनी दोघांनाही अटक केली. शुक्रवारी दुपारी त्यांना न्यायालयात हजार करण्यात आले. न्यायालयाने त्यांची पोलिस कोठडीत रवानगी केली, तर पीडित महिलांना सुधारगृहात पाठविण्यात आले.

## महाराजा ऑफ नागपूर ट्रस्ट व लाखे प्रकाशनतर्फे सहा पुस्तकांचे प्रकाशन




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :**
महाराजा ऑफ नागपूर ट्रस्ट व लाखे प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूरकर भोसल्यांच्या ऐतिहासिक कामगिरी व सांस्कृतिक वारशावर आधारित सहा पुस्तकांचा भव्य प्रकाशन सोहळा महालातील सिनियर भोसला पॅलेस येथे शुक्रवार १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता आयोजित करण्यात आला होता..
या सोहळ्यात उदय जोशी लिखित चार ऐतिहासिक कादंबऱ्या आदिपर्व, संघर्षपर्व, कलहपर्व, ऱ्हासपर्व तसेच डॉ.भालचंद्र हरदास लिखित महालची धमंती व धर्मभूषण श्रीमंत राजे लक्ष्मणराव महाराज भोसले या दोन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले.

पुस्तकांचे प्रकाशन सरसंघचालक डॉ.मोहन भागवत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या शुभहस्ते करण्यात आले, प्रमुख उपस्थिती परमपूज्यनीय आचार्य जितेंद्रनाथ स्वामी महाराज, श्रीनाथ पीठाधीश्वर, अंजनगाव -सुर्जी उपस्थित होती.
आचार्य जितेंद्रनाथ स्वामी महाराज म्हणाले ----महावीर भगवान ते जीन आहे जीन म्हणजे विजेता विजेता हा साम्राज्याच्या अधिपतीचे विजयाचे यशोगाथा सांगणारा तो शब्द आहे त्यामुळे शांती सलोखा सौदागर समता बंधुता सांगणारा देश आमचा राजघराण्याचा मित्र आणि शास्त्र दोन्ही घेऊन आपली पराक्रमाची गाथा लिहिणारा आमचा भोसले समुदाय आजही महाराष्ट्राची पताका ढोलांनी फडकवत आहे. आणि त्याच्या एक कळस नागपूर मध्ये असल्याचा आपल्याला अभिमान आहे. असे मत व्यक्त केले.

सरसंघचालक डॉ.मोहन भागवत, बोलताना म्हणाले --पहिल्या रघुजी महाराचे चरित्र वाचल कि त्यांच्या कायाची प्रेरणा मिळते हा इतिहास आपण वाचन केले पाहिजे.इतिहास आपल्या मुलांपर्यंत पोहोचला पाहिजे कारण मागे काय झालं त्यावरून शिकायचं असतं धर्माधिकारी ही प्रेरणा जोपर्यंत असते तोपर्यंत सर्व प्रकारच्या विपरीत परिस्थिती सर्व प्रकारच्या विकारांवर मात करून मनुष्य हा परमार्थ साधत असतो. ही प्रेरणा कायम आहे आणि त्याच्यामुळे कित्येक वेळा सामूहिक हिताकरता मराठीशाहीच्या इतिहासात हे सतत ज्यांनी पाळला सगळ्यात जास्त असे कोण तर ते नागपूरकर भोसले आहेत. भोसल्याचे आपल्या सर्वांवर खूप मोठे उपकार आहेत त्याबद्दल भोसले त्यांना धन्यवाद देतो कृतज्ञता व्यक्त करतो असे मत डॉ. भागवत यांनी व्यक्त केले.

महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्रीमंत डॉ.राजे मुधोजी महाराज भोसले , राजे तेजसिंग भोसले, प्रकाशक चंद्रकांत लाखे यांनी नागरिकांना व त्यावेळी भालचंद्र हरदास, लेखक उदय जोशी उपस्थित होते.

## गुमगाव आणि कोतेवाडा भागात
# बिबट्याचा वावर वाढला

नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १० :**
तालुक्यातील गुमगाव आणि कोतेवाडा भागात मागील दोन दिवसांपासून दररोज बिबट्या च्या दर्शनामुळे या भागात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

काही दिवसांपूर्वी मिहान परिसरात दिसलेला हाच बिबट्या असावा असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. दोन दिवसापूर्वी ग्रीनफिल्ड सोसायटी जामठा परिसरात रात्री १० वाजताच्या सुमारास या मार्गाने जाणाऱ्या दोन सुरक्षारक्षकाना हा बिबट्या दिसला याची माहिती त्यांनी हिंगण्याचे ठाणेदार जितेंद्र बोबडे यांना दिली.पो हवा. अरविंद नाईक, सुभाष मारवते, शिपाई अनिल झाडे, संजू तायडे, रुपेश हिवाळे, आकाश उईके हे पेट्रोलिंग वाहनाने त्या भागात गेले. त्यांनी सीआर मोबाईल गाडीचे सायरन व टॉर्च चे लाईट मारून आरडा ओरड करून त्या बिबट्याला तेथुन हुसकावून लावले. त्यानंतर गुरुवारी रात्री पुन्हा समृद्धी महामार्ग लगत गुमगाव जवळ सर्व्हिस रोडवर बसून असलेला बिबट्या या मार्गाने जाणाऱ्या लोकांनी बघितला.

या भागात समृद्धी महामार्गाचा एन्ट्री पॉईंट आहे.त्यामुळे रात्रभर या भागात वाहनांची वर्दळ असते.बुटीबोरी एमआयडीसी ला दररोज हिंगणा तालुक्यातील कामगार या भागातून ये जा करतात.

बिबट्याचा वावर या भागात वाढल्याने या भागातील शेतकरी, कामगार यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तात्काळ ह्या बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे. हा परिसर हिंगणा व बुटीबोरी वनपरिक्षेत्र याच्या सीमेवर आहे.

दोन्ही विभागाचे अधिकारी व कर्मचारी त्याचा शोध घेत आहेत. काही ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तरीसुद्धा नागरिकांनी काळजी घ्यावी.रात्री एकटे ,पायदळ फिरणे टाळावे असे आवाहन बुटीबोरी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद वाडे, हिंगण्याच्या वनपरिक्षेत्र अधिकारी शीतल कनार्से यांनी केले आहे

## वाहतूक कोलमडली

■ **नागपूर, दि. १० :**
ओबीसी समाजाच्या विराट मोर्चामुळे नागपूर शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडल्याचे दिसून आले विदर्भासह राज्यभरातून लक्षावधी ओबीसी नागरिक शहरात आल्याने सर्वत्र गर्दी दिसून येत होती. मोर्चेकऱ्यांची हजारो वाहने अस्ताव्यस्त पार्क केली होती. परिणामी, शहराच्या काही भागात वाहतुकीचे नियोजन पूर्णतः कोलमडल्याचे दिसून आले.

# दंडारे मठ कोसळला
## आतून निघाले सापच साप...

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
जागनाथ बुधवारी या परिसरात ३०० वर्षे जुने विठ्ठल रुक्मिणी दंडारे मठ आहे. या मठाला लागूनच असलेली धोंडिबा दंडारे यांची दोन मजली इमारत कोसळून उध्वस्त झाली.
या इमारतीचा मलबा मंदिर परिसरात पडल्याने मागील दहा वर्षापासून भक्तांना मंदिरात जाण्याची गैरसोय होत आहे. शिवाय या मलब्यात दोन मोठे साप दडून बसल्याने भक्तांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.

मंदिर परिसरात जमा झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यावर झाडे झुडपे वाढीस लागल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे डेंग्यू, मलेरिया होण्याची शक्यता असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मंदिर परिसर स्वच्छ करण्यासाठी धोंडबा दंडारे यांना वारंवार सूचना देऊनही ते समस्या गांभीर्याने घेत नाही आहेत. सर्पमित्राच्या सहाय्याने सापांना पकडण्यासाठी व मंदिर स्वच्छतेसाठी इमारत मालकांवर कारवाई करण्यासाठी नागरिकांकडून मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.

दरम्यान, मठाशेजारच्या इसमाने नवीन घर बांधणीसाठी भिंत उभारली. त्यावेळी मठाचा काही भाग कोसळला आणि त्यातून मोठ्या प्रमाणात साप बाहेर निघाले. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत वेकोलि कर्मचाऱ्याचा क्रेन खाली दबुन मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
**कन्हान, दि. १० :** कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या डब्लुसीएल एकीकृत इंदर कामठी डीप ओपन कास्ट माईन्स मध्ये काम करणाऱ्या वेकोलि कर्मचाऱ्याचा क्रेन मशीनच्या खाली दबुन मृत्यु झाल्याने डब्लुसीएल परिसरात एकच खळबळ उडाली आहे .

प्राप्त माहिती नुसार गुरुवार (दि.९) ऑक्टोंबर रोजी दुपारी २ वाजता पासुन ते रात्री १० वाजता पर्यंत डब्लुसीएल कामठी खदानच्या आत मध्ये रविप्रकाश रामप्रसाद कुशवाह (वय ५९) रा.खदान हे आपल्या ड्युटीवर हजर होते . त्यांचे सोबत एक्सेवेटर मशीन (पोकलॉन्ड) चालक नामे श्रीकांत रामकृष्ण नितनवरे (वय३२) रा.उमरगाव ह.मु.कांद्री (कन्हान) ड्युटीवर हजर असून तो पोकलॉन्ड मशिनने होलपॉक (डंपर ट्रक) मध्ये माती भरत होता.

रात्री ८:३० वाजता च्या दरम्यान मशिनच्या मागच्या बाजुला ५० मिटर दुर वर उभा असतांनी रविप्रकाश यांना मशिनच्या सायलेन्सर मधून खुप मोठ्या प्रमाणात धूर निघतांनी दिसला . त्यांनी श्रीकांत -श्रीकांत असा



ऑपरेटरला आवाज दिला व तो पोकलॉन्ड ने डंपर मध्ये माती भरतांनी दिसुन आला नाही . रविप्रकाश यांनी पोकलॉन्ड मशिन जवळ टार्च लावून जात असतांना मशिनच्या अगोदरच १५ फुट अंतरावर पोकलॉन्ड चालक श्रीकांत रामकृष्ण नितनवरे हा मशिन गेलेल्या चाकुलीवर मृत अवस्थेत चेंदा-मेंदा स्थितीत दिसुन आला . रविप्रकाश यांनी शिफ्ट इंचार्ज शरद नागपुरे यांना फोन करून घटनेची माहीती दिली.

सदर घटनेची माहिती कन्हान पोलीसांना मिळताच पोलीस निरीक्षक बैजयंती मंडवधरे आपल्या स्टाफ सह घटनास्थळी दाखल झाले . पंचनामा करुन मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदना करिता उपजिल्हा रुग्णालय कामठी येथे नेण्यात आले. मृतक श्रीकांत नितनवरे हा एक्सेवेटर (पोकलॉन्ड) नंबर -१०१७९ वर मशिन ऑपरेटींग करत असतांनी त्याचा तोल जावून तो मशिनच्या ट्रॅकचैनच्या खाली दबून मृत्यु झाला.

या प्रकरणी कन्हान पोलीसांनी रविप्रकाश कुशवाह यांचा तक्रारी वरून मर्ग चा गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक बैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे .

# सेंटर पॉइंट स्कूलच्या मंथना काटेची राज्य जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी निवड

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १० :** नागपूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने तालुका क्रीडा संकुल, कोराडी येथे पार पडलेल्या डी.एस.ओ. विभागीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगर येथील विद्यार्थिनी मंथना काटे हिने आपल्या उत्तम सादरीकरणाने चमकदार कामगिरी करत आर्टिस्टिक व रिदमिक जिम्नॅस्टिक या दोन्ही प्रकारांत सहभाग घेत राज्यस्तरावर आपली निवड निश्चित केली आहे.



मंथनाने अंडर-१७ मुलींच्या गटात उत्कृष्ट प्रदर्शन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या या यशामध्ये प्रशिक्षक पल्लवी खंडाळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. मंथना आपले यश आई-वडील व प्रशिक्षिका पल्लवी खंडाळे यांना समर्पित करते. मंथनाच्या यशाबद्दल प्राचार्या कांचन उके, उपप्राचार्या दीपा चक्रवती, जयती चक्रवती, क्रीडा प्रमुख रोशन चौधरी, तसेच मनोज रक्षक, प्रितीन रंगारी, तृप्ती खापर्डे, वीरेंद्र बघेल, खुशाल बालबुधे, निशांत श्रीवास्तव, धीरज यादव आणि रश्मी बैस यांनी तिचे अभिनंदन करत आगामी महाराष्ट्र राज्य जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.सेंटर पॉइंट स्कूल परिवाराकडून मंथना काटेला पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ९६ प्रकरणांची नोंद
# उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १० :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे.शुक्रवार(ता.१०) रोजी शोध पथकाने ९६ प्रकरणांची नोंद करून ४३,६०० रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत २५ प्रकरणांची नोंद करून १०,००० रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून रू.१०० चे दंड वसुली केली.दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ५ प्रकरणांची नोंद करून रू.२,००० चे दंड वसुली करण्यात आली.मॉल,उपहारगृहे,लॉजिंग,बोर्डिंग हॉटेल,सिनेमाहॉल,मंगलकार्यालये,कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २ प्रकरणाची नोंद करून रू.४,००० रूपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करून अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १४ प्रकरणांची नोंद करून १४,५०० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ४५ प्रकरणांची नोंद करून ९,००० रुपयाचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ४ प्रकरणांची नोंद करून रु. ४,००० चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे.झेस्ट मल्टीकोर हॉस्पीटल यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्यामुळे रू.१०,००० दंड वसुल करण्यात आले.हनुमाननगर झोन अंतर्गत मे.खुशी इंफ्रास्ट्रक्चर यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्यामुळे रू.१०,००० दंड वसुल करण्यात आले. धंतोली झोन अंतर्गत मे.इनोवेटिव्हरिटेल प्रा.लि. यांनी अनधिकत जागी दुकानाचा कचरा टाकल्यामुळे रू.५,००० दंड वसुल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे.भावना स्वीटस अँड ज्यूस कॉर्नर यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-चेदंड वसूल करण्यात आले. लकडगंज झोन अंतर्गत मे. श्री दुर्गा अपार्टमेंट यांच्यावर इमारतीचे वाहते पाणी रस्त्यावर आल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार रू.५,००० चे दंड वसुल करण्यात आले. आशीनगर झोन अंतर्गत मे. क्रितीक ट्रेडर्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-चेदंड वसूल करण्यात आले. मंगळवारी झोन अंतर्गत गुरप्रीत सिंग जब्बाल यांनी बोअरवेल विहिर खोदकामाची माती आणि चिखल रस्त्यावर टाकल्यामुळे रू.५,००० दंड वसुल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने ७ प्रकरणांची नोंद करून रू. ४५,००० दंड वसूल केला.

# मतदार यादी दुरूस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवा
## सर्वपक्षीय नेत्याचे मुख्याधिकारी यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १० :** वाडी नगर परिषद ची निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने प्रकाशीत झालेल्या प्रभागनिहाय मतदार यादी प्रभाग कं. १ ते १३ मधील प्रारूप मतदार यादी प्रसिध्द झालेली आहे. आपण प्रसिध्द केलेल्या प्रारूप मतदार यादी मधील सर्वच प्रभागातील मतदारांची नावे ही त्या भौगोलिक नकाशे यानुसार कुठेही बसत नसल्याचे तसेच प्रभाग निहाय मतदार यादीचा ताळमेळ नसल्याचे दिसुन येते. राज्य निवडणुक आयोगाने त्यांनी दिलेल्या कार्यक्रमानुसार फारच कमी वेळ दिल्याने १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आक्षेप घ्यावयाचे आहे परंतु ही मुदत खुपच कमी असल्याने दिलेल्या वेळेत प्रभागनिहाय मतदार यादी तयार करणे शक्य नाही. आणि आपण आक्षेप होण्याकरीता दिलेल्या विहीत नमुन्यानुसार सादर करणे शक्य नाही. करिता राज्य निवडणुक आयोग यांना पत्र व्यवहार करून मुदत वाढवुन देण्याची विनंती करावी जेणेकरून त्या प्रभागातील नावे त्याच प्रभागात टाकण्यात यावी तसेच विशेष मोहीम राबवविण्यात यावी ही विनंती. अशा आशयाचे निवेदन सर्वपक्षीय नेत्यांनी मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांना शुक्रवार १० ऑक्टोबर रोजी दिले. यावेळी राजेश जयस्वाल, माजी नगराध्यक्ष प्रेम झाडे, हर्षल काकडे ,संतोष नरवाडे, प्रकाश कोकाटे, संतोष केचे,शैलेश थोराने, श्याम मंडपे,वसंतराव ईखनकर, अखिल पोहणकर,अतुल शेंडे, भिमराव लोखंडे, अमीत हुसनापुरे ,सुरेंद्र मोरे,निखील कोकाटे, दिनेश उईके, संजय जिवनकर,राजेश जंगले,आशिष नंदागवळी,योगेश कुमकुमवार,रोशन सोमकुवर, दर्शन सोमकुवर,प्रज्ञा वासनिक उपस्थित होते.

# जागतिक बेघर दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर आयोजीत



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १० :** नागपूर महानगरपालिका नागपूर व समाज विकास विभाग म.न.पा नागपुर, दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (ऊअध-छणडच),द्वारा संचालित आपुलकी शहरी बेघर निवारा आणी बोधिसत्व शहरी बेघर निवारा येथे जागतिक बेघर दिनाचा कार्यक्रम अभिजित चौधरी आयुक्त म.न.पा वैष्णवी बी. अति. आयुक्त, डॉ. रंजना लाडे उपायुक्त समाज विकास विभाग यांच्या मार्गदर्शनानुसार आणि सहकार्याने संपन्न झाला.जागतिक बेघर दिनाच्या निमित्ताने आरोग्य तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले.

या वेळी कार्यक्रमाचे उदघाटक ममता महेश शहारे माजी नगरसेविका, अमिता खापर्डे (आरोग्य प्रतिनिधी), तसेच बोधिसत्व शहरी बेघर निवाऱ्याचे संचालक भास्कर पराते आणी आपुलकी शहरी बेघर निवाऱ्याचे संचालक देवेंद्र गाडे, प्रमोद खोब्रागडे, मोनिका फुलमाळी, रवींद्र तेलगोटे, अॅड. आशिष उके, सार्थक बैसवारे (निवारा व्यवस्थापक), वसंत रंगारी, नरेंद्र शरणागत, सेख फरहाद अल्ली (समाज सेवक), प्रीती इंदुरकर, प्रशांत उके, इत्यादी मान्यवरांची जागतिक बेघर दिनाकार्यक्रमात उपस्थिती होती व त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# रामटेक येथे नाभिक समाज मेळावा चे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक , दि. १० :** महाराष्ट्र नाभिक महामंडळ शाखा रामटेक च्या वतीने दि.९ ऑक्टोंबर ला संत नगाजी महाराज पुण्यतिथी व विर जिवा महाले जयंती चे औचित्य साधून श्रीक्षेत्र अंबाळा येथील लोटांगण महाराज धर्मशाळा येथे समाज मेळावा चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळ नागपूर चे जिल्हाध्यक्ष राजेन्द्र फुलबांधे व महीला जिल्हाध्यक्षा मंजुषाताई पानबुडे, सरचिटणीस विनेश कावळे, कार्याध्यक्ष वैभव तुरक, विजयदादा वलोकर, धरम दादा अतकरे, कोषाध्यक्ष अशोक सुर्यवंशी, उपाध्यक्ष प्रफुल अनकर, संपर्क प्रमुख सतीश सुरुसे, संघटन सचिव रविन्द्रजी लक्षणे, संघटक जितेंद्र वालुकर,युवा आघाडी उपाध्यक्ष रवि वालुकर तसेच महीला पदाधिकारी रुपालीताई राऊत, पुजाताई अतकरे, राजश्रीताई इंगळे, कांचनताई मिराशे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी कौशल्य विकास समीतीचे प्रशिक्षक



व मार्गदर्शक धरम अतकरे यांनी सर्व सलुन दुकानदार बांधवांच्या समस्या समजून घेतल्या व त्यावर उपाययोजनेचे योग्य मार्गदर्शन केले. महीलाध्यक्षांनी सुध्दा महीलांना स?घटित राहण्याचे आवाहन केले. जिल्हाध्यक्षांच्या मार्गदर्शनातुन सुध्दा विविध उपाययोजना व व्यवसायात वाढ व कौशल्याचे महत्व समजावून सांगितले व नाभिक बांधवांची समाजाची जनगनना करण्याचे आवाहन केले. यावेळी नवनियुक्त कार्यकारणी खालिल प्रमाणे करण्यात आल्या. रामटेक तालुका कार्यकारणी तालुका अध्यक्ष सुनिल खुरगे, कार्याध्यक्ष सुनिल(बबलु) फुलबांधे, उपाध्यक्ष सुरेंद्र बोरकर, मनोज पगाडे,सचिव कृष्णा कावळे, सचिन वालोकर,रमेश उमरकर,संघटन सचिव तथा प्रसिद्धी प्रमुख नंदकिशोर पापडकर, संघटक देवराज पगाडे,नरेश जांभूळकर, कमलाकर सुरुसे, कृष्णा वाटकर, शहर अध्यक्ष उमेश पापडकर, कार्याध्यक्ष सनी येऊतकर, रवि पगाडे, राहुल लांजेवार,नत्थु चन्ने, संतोष गणोरकर,पीयुष जाभुळकर, विजय फुलबांधे,वैभव पुंडे, रवि फुलबांधे, आशिष येऊतकर,मनोज अनकर रामटेक सलुन दुकानदार संघ रामटेक पदाधिकारीअध्यक्ष क्रिष्णा कावळे, उपाध्यक्ष वैभव पुंड,रवी फुलबांधे, सचिव सुनील खूरगे, प्रविण अनकर,श्याम वैद्य,सनी येवतकर,उमेश पापडकर, गणपत येवतकर,आशीष पापडकर, संतोष गणोरकर, तुषार कावळे,राजु अनकर,गोविंदा अनकर,दिपक येवतकर, अमोल वानखेडे. महिला आघाडी मार्गदर्शक विमलताई तुरक, कुसुमताई पापडकर,अध्यक्ष प्रिती पापडकर, उपाध्यक्ष वर्षा वालुकर, वैशाली फुलबांधे,अर्चना अनकर, अवंतीका येऊतकर, प्रमिला पापडकर, भाग्यश्री फुलबांधे, निर्मला लांजेवार, सोनाली पापडकर, सविता लांजेवार, प्रभा पापडकर, सुप्रिया लांजेवार सह आदि उपस्थीत होते.या मेळाव्यात सकाळी उल्पोहार आणि दुपारी स्वरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे संचालन क्रिष्णा कावळे यांनी केले तर आभारप्रदर्शन जितेंद्र वलोकर यांनी केले.

# आर्य वैश्य महासभेच्या वतीने नागपुरात मान्यवरांचा सत्कार सोहळा व पुस्तकांचे होणार विमोचन

**नागपूर:** महासभेतर्फे सुधीरभाऊ मुनगंटीवार (माजी मंत्री महाराष्ट्र ) तसेच आ. समीरभाऊ कुणावर (तालिका अध्यक्ष महाराष्ट्र, विधानसभा.) यांचा सत्कार माजी खासदार विजयबाबू दर्डा ( चेअर मन लोकमत समूह) यांच्या शुभ हस्ते करण्यात येणार आहे. प्रमुख उपस्तीथी मध्ये, डॉ. गिरीश गांधी (संस्थापक अध्यक्ष, वनराई फॉउंडेशन), महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासभेचे महासचिव गोविंद बिडवाई उपस्थित राहणार आहे. सोबतच नागपुरातील सुप्रसिद्ध डॉक्टरांचा सत्कार, डॉ.श्रीकांत मुक्केवार, डॉ. सतीश पोशेट्टीवार, डॉ. शैलेंद्र गंजेवार, डॉ. समीर श्रीरंगवार, यांचाही सत्कार महासभेने आयोजित केलेला आहे. कार्यक्रमाचे स्थळ दि. १२ ऑक्टोबर रविवार संध्याकाळी ६ वाजता. वनामती सभागृह, भोले पेट्रोलपंप जवळ, व्ही.आय.पी रोड नागपूर येथे होणार आहे. तसेच महासभा तीर्थक्षेत्र तिरुपती येथे भक्त निवास बांधित आहे, ज्यात १०२ रूम्स उपलब्ध असतील. त्या प्रकल्पाच्या माहिती पुस्तकाचे विमोचन सुद्धा विजयबाबू दर्डा यांच्या शुभहस्ते होणार आहे, अशी माहिती दीपक नीलावार (अध्यक्ष महासभा नागपूर) यांनी दिली आहे.

# महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या अवमानाचा मोर्चा काढुन निषेध

■ महासागर प्रतिनिधी
**कन्हान, दि. १० :** मानव धर्माचे संस्थापक महानत्यागी बाबा जुमदेव यांचा अवमानाचा निषेधार्थ कन्हान , कांद्री परिसरितील शैकडो सेवक , सेविकांनी कुलदीप मंगल कार्यालय येथुन कन्हान पोलीस स्टेशन पर्यंत बाबा जुमदेवजी यांच्या घोषणा देत शांति पूर्ण मोर्चा काढुन अवमान करणाऱ्या मुकेश प्रकाश सावरबांधे यांचा विरुद्ध कठोर कारवाई ची निवेदन देऊन मागणी केली आहे .




सोमवार (दि.२९) सप्टेंबर रोजी रात्री ११:१४ वाजता च्या दरम्यान गैरअर्जदार कु.मुकेश कुमार सावरबांधे मो. नंबर ९३५९२९०७८१ रा. बाम्हणी , तालुक.पवनी , जिल्हा भंडारा या तरुणाने आपल्या मोबाईल वर व्हाट्सएप स्टेट्स ला परम पूज्य परमात्मा एक मंडळाचे संस्थापक महानत्यागी बाबा जुमदेव यांचा व्हिडियो बनवुन त्यांचाबद्दल अश्लील भाषेत शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला . बाबा जुमदेव यांचा अपमान केल्यामुळे कन्हान , कांद्री परिसरितील शैकडो सेवक , सेविकांच्या भावना दुखवल्या आहेत . या घटनेचा निषेधार्थ गुरुवार (दि.९) ऑक्टोंबर रोजी शैकडो सेवक , सेविकांनी परमात्मा एक सेवक मंडळ वर्धमान नगर नागपूर अंतर्गत कन्हान , कंद्री , खंडाळा , जुनिकामठी , अजनी परिसरातील मार्गदर्शक अशोक मानकर यांच्या नेतृत्वात कुलदीप मंगल कार्यालय येथुन कन्हान पोलीस स्टेशन पर्यंत मोर्चा काढला . कन्हान पोलीस स्टेशन मार्फत राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवुन मुकेश प्रकाश सावरबांधे यांचा विरुद्ध कठोर कारवाई ची मागणी केली आहे . या प्रसंगी मार्गदर्शक अशोक मानकर , संभाजी मस्के , नारायणराव मांडलेकर , शालिक सहारे , शंकर राऊत , गंगाराम मरबते , शंकर लेंडे , अरुण हटवार , दौलत बर्वे , सेवाकरम चौधरी , लीलाधर कुंभलकर , वसंतराव लोहकरे , गणेश सरोदे , दिपक कुंभलकर , प्रवीण बावणकुळे , सारंग काळे , अजय मांडरे , संजय चौधरी , कृष्णा चौधरी , यशवंत आंबिलधुके , जयंत कुंभलकर , विलास वाडीभस्मे , रवी राणे , विष्णू गाढवे , गज्जू गोरले , प्रभाकर समरित , श्यामराव बावनकुळे , प्रकाश भोयर , नामदेव कामडे , सोनू बर्वे , सेविका रश्मी बर्वे , वर्षा मानकर , कल्पना कुंभलकर , सत्यफुला गाते , सुनदा राऊत , संगीत वांढरे , निर्मला मेश्राम , तुळसाबाई मस्के , मालू आकरे , दुर्गा सरोदे सह आदि शेकडो सेवक आणि सेविका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

## टिप्परखाली सापडून इसमाचा करूण अंत

**नागपूर, दि. १०** अमरावती मार्गावरील आठवा मैल येथील डिफेन्स गेटसमोर टिप्परखाली सापडून एका पादचारी इसमाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. शुक्रवारी दुपारी ३.४५ च्या सुमारास ही घटना घडली. विकास सुरेश तेलमोरे (३३) रामजी आंबेडकरनगर असे मृताचे नाव आहे.

घटनेच्या वेळी तेलमोरे हे रस्त्याने पायी जात होते. त्याचवेळी नागपूरकडून येणाऱ्या एमएच ४० वाय ९५४१ क्रमांकाचा टिप्परचालकाचे संतूलन बिघडले आणि तेलमोरे हे मागील चाकात सापडून जागीच ठार झाले. याप्रकरणी वाडी पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

## बालाजीनगरात चोरी

**नागपूर, दि. १०** हुडकेश्वर पो. स्टे. अंतर्गत गिरी बालाजीनगर येथे राहणाऱ्या सुनीता रायचौधरी (६०) यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी २ लाख ५ हजाराचा ऐवज चोरून नेला.

# भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापनेसाठी व विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १० :** ७ आक्टोंबर २०२५ ला महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने समाजाकरीता भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे व विविध मागण्यांच्या संदर्भात आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन करण्यात आले. . भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, सातारा गॅझेट,हैदराबाद गॅझेट आणि विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपरिक मद्य व्यवसाय समाजाला देण्यात यावा, लाडवाणी सुगंधी तेलंग यांना कलाल २५४ मध्ये समाविष्ट करून ओबीसी जात प्रमाणपत्र देण्यात यावे अशा विविध मागण्यांसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून समाज बांधव मोठ्या संख्येने आझाद मैदानावर उपस्थित होते व आंदोलनाच्या माध्यमातून समाजाच्या मागण्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम समाजबांधवांनी संघटनेच्या माध्यमातून केले.यावर सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष वेधून आहे.कारण गेल्या चार वर्षांपासून संघटनेच्या माध्यमातून आर्थिक विकास महामंडळ व अन्य मागण्यांची मागणी करीत आहे. परंतु सरकार वारंवार फक्त आश्वासन देत असल्याने दिनांक ७ आक्टोंबरला संघटनेचे अध्यक्ष सागर समुद्रवार, सरचिटणीस संतोष खंबलवार, राज्य कार्याध्यक्ष रविंद्र हटवार,प्रवक्ता रमेश लांजेवार, महिला अध्यक्ष सिमा खंबलवार,मराठवाडा अध्यक्ष संजय हिवाळे,विदर्भ अध्यक्ष संजय हटवार, यांनी गिरगाव चौपाटी येथे जलसमाधी आंदोलन करण्याची घोषणा केली होती.परंतु सरकारने आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन संघटनेचे आंदोलन आझाद मैदानावर वळिवले.याठीकाणी समाजबांधवांनी आपला संयम बाळगून आझाद मैदानावर शांततेत आंदोलन केले.या आंदोलन स्थळी अनेक मान्यवर आमदार व माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी आवर्जून भेट दिली यामुळे समाजबांधवामध्ये एक नवी उर्जा निर्माण झाली.यानंतर मुंबई पोलिस प्रशासनाच्या माध्यमातून सन्माननीय मंत्री अतुल सावे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री(महाराष्ट्र राज्य) यांना मंत्रालय मुंबई येथे जाऊन भेट घेतली आणि निवेदन देण्यात आले व भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत व इतर मागण्यांच्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.यानंतर आंदोलनाची दखल घेऊन कलाल-कलार समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचे ठोस आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले आणि इतरही मागण्यांच्या संदर्भात गांभीर्याने दखल घेऊन त्यावरही योग्य तो विचार करण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी यावेळी दिले.

# ज्योतिबा शाळेतील शिक्षिका महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

ज्योतिबा उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षिका संसार सारिका अनिल घोडमारे यांना २८ सप्टेंबर २०२५ रोजी शिर्डी येथे बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र यांनी आयोजित केलेल्या महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गेल्या ३१ वर्षांपासून त्या विद्यार्थ्यांसाठी विविध सेवाभावी कार्यात गुंतल्या आहेत आणि त्या अजूनही करत आहेत. आजपर्यंत त्यांनी हजारो विद्यार्थ्यांचे संगोपन केले आहे. त्यांचे विद्यार्थी डॉक्टर, अभियंते आणि सरकारी कर्मचाऱ्यांसह महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. त्यांच्या कामगिरीची आज खऱ्या अर्थाने दखल घेण्यात आली आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संपूर्ण समाज आणि शिक्षकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे, असे सामाजिक कार्यकर्ते राहुल गौर यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत कनिष्का घोंगे राज्यात तृतीय

## श्री संताजी अखिल तेली समाज संघटनेकडून गौरव



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

डिफेन्स येथील कनिष्का संजय घोंगे हीची नाशिक येथे पार आयडीयल प्ले अबॅकस इंडिया प्रा. लि. तर्फे ९ ऑक्टोबर रोजी आयोजित महाराष्ट्र स्टेट लेव्हल अबॅकस स्पर्धा तथा मेंटल अरिथमेटिक स्पर्धेत राज्यात तृतीय क्रमांक पटकावून वाडीचे नाव उज्वल केले आहे.या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील एकूण २००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

आय.पी. ए. क्रिएटिव्ह अकॅडमी सेंटर, वाडी येथून १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. केंद्रीय विद्यालयात सहावी इयत्तेत शिकणारी कनिष्का प्रत्येक प्रश्नावलीत अव्वल ठरली.

तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री संताजी अखिल तेली समाज संघटन, वाडी डिफेन्स शाखेतर्फे कनिष्काचा पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार गोविंदराव रोडे, प्रसिद्ध उद्योजक पुरुषोत्तम लिचडे ,मोतीराम शहारे व अनिल पुंड यांच्या हस्ते संपन्न झाला.

कनिष्काच्या आई सुचिता संजय घोंगे यांनाही नागपूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कॉस्मेटिक विभागात द्वितीय क्रमांक आणि नागपूर विभागात तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल बजाईत, प्रदेश सचिव चेतन वरटकर, सल्लागार देवा क्षिरसागर व विभागीय संघटक मनोज भुरे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कनिष्काच्या यशामागे तिच्या वर्गशिक्षिका सलोनी कुमारी, अबॅकस शिक्षक लिना मोराबकर, आनंद सर, अभय सर, तसेच केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले.

तिचे वडील संजय घोंगे व आई सुचिता घोंगे यांच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाले, असे कनिष्काने सांगितले.

डिफेन्स-वाडी परिसरातून कनिष्काचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

या कार्यक्रमाला गोविंद रोडे, पुरुषोत्तम लिचडे, मोतीराम शहारे, अनिल बजाईत, अनिल पुंड, चेतन वरटकर, मनोज भुरे, देवा कामडी, देवा क्षिरसागर, संदीप साठवणे, मंगेश येनुस्कर, राजेंद्र कैकाडे, विजय मालेवार, कृष्णा टिपले, ओमदेव लांबट, सचिन लिचडे, अनिल दहाघाणे, मंगेश माहुरे उपस्थित होते.

# शासकीय औद्यो. प्रशिक्षण संस्थेत

## रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचा उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

लक्ष्मीबाई केळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागपूर मुलींची व शासकीय तंत्र माध्यमिक शाळा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबई येथे केलेल्या अल्पमुदतीच्या रोजगारश्रम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले या कार्यक्रमाला पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार श्रीकृष्णा खोपडे हे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना व नागरिकांना खोपडे यांनी मार्गदर्शन केले .व अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम प्रशिक्षणाचा माध्यमातून युवक युवतीना रोजगार व स्वयंरोजगार संधी उपलब्ध होईल.या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचेआवाहन केले व विभागाने राबविलेल्या या प्रशिक्षण उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमला गोस्वामी ,डॉ लांजेवार, बजाज,विश्वकर्मा, स्थानिक नागरिक, कर्मचारी, प्रशिक्षणार्थींनी, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# हेमलता धुडस यांना जिल्हा दिव्यांग आदर्श शिक्षक पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

नागपूर तालुक्यातील फेटरी जि.प. उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षिका हेमलता दिपक धुडस यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हा दिव्यांग आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला असून, या निमित्ताने त्यांची आकाशवाणी, नागपूर केंद्रावर खास मुलाखत घेण्यात आली. या यशाबद्दल शिक्षिकेचे गटशिक्षणाधिकारी सुनील ढेंगे, शिक्षण विस्तार अधिकारी मंगला गजभिये, नारायण चापले, रेश्मा शेख, प्रतिभा पोटफोडे, केंद्रप्रमुख अलका पालवे तसेच फेटरी केंद्रातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.हेमलता धुडस यांच्या कार्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून, त्यांचा हा गौरव सर्व शिक्षकांसाठी अभिमानास्पद ठरला आहे.

# मोवाड न. प. निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सर्व उमेदवार रिंगणात उतरणार : सरचिटणीस अनिल साठोणे



■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. १० :

प्रशासकीय राजवट असणाऱ्या मोवाड नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्पष्ट झाले आहेत. बुधवार (ता. ८ ) रोजी प्रभाग निहाय आरक्षण सोडत काढण्यात आली आरक्षण सोडत २०२२ च्या सोडती प्रमाणे जाहीर करण्यात आली असून त्यानुसार अनुसूचित जाती ०१,अनुसूचित जमाती ०२, नामाप्र ०५, तर खुल्या वर्गात १२ अशी सोडत निघाली आहे. तर नगराध्यक्ष पदासाठी ओपन महिलांसाठी आरक्षित निघाली असल्याने महिला राज नगरपरिषद मध्ये पहावयास मिळणार आहे.

परंतु सोडती नंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष साजरा करत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सर्वच जागेवर निवडणुकीत उमेदवार रिंगणात उतरणार असून जोमाने कार्यकर्ते आतापासूनच कामाला लागले असल्याचे चित्र आहे. यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सरचिटणीस व माजी नगराध्यक्ष अनिल साठोणे यांनी दिलेल्या निवडणुकी संदर्भात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे मोवाड नरखेड काटोल नगरपरिषदेच्या निवडणुकीकडे विशेष लक्ष राहणार असून सर्वतोपरी प्रयत्न करू असे आश्वासित करत मोवाडच्या राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये निवडणूक जिंकण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. शहरात प्रथमच प्रभाग पद्धतीने निवडणूक होणार असून त्यात एकूण १० प्रभाग होणार असून २० वार्ड राहतील २० वार्डमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सर्व उमेदवार रिंगणात उतरणार असून निवडणूक लढणार आहे सर्व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते या कामाला लागले असून नगराध्यक्ष पदासाठी उभे राहणारे उमेदवार सुद्धा जोमाने कामाला लागल्याचे भाकीत असून मोवाड नगरपरिषद मध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाची सत्ता येणार असल्याचे आतापासूनच चर्चाला उधान आले आहे.

# गौतमबुद्ध विहार, मायानगर येथे वर्षावास समापन सोहळा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० : प्रभाग क्र. ७ इंदोरा मधील मायानगर येथील गौतमबुद्ध विहारात वर्षावास समापन व भिक्षूंना भोजनदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. समारंभात भन्ते विरायानंद यांच्या उपस्थितीत सामूहिक बुद्धवंदना करण्यात आली. या प्रसंगी नागपूर शहर कॉंग्रेस कमिटीचे सचिव कुणाल निमगडे, अध्यक्ष निता भैसारे, सुचित्रा भोवते, नलिनी अंबादे, माधुरी मोटघरे, तसेच परिसरातील अनेक उपासक-उपासिका उपस्थित होते.कार्यक्रम संयोजनात आशा मोरे, लिला टेंभुर्णे, कविता बडगे, सरूआई नंदेश्वर आदींचा सक्रिय सहभाग होता.शांत, सात्त्विक आणि सामाजिक ऐक्य वाढवणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समिती करणार धरणे आंदोलन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समिती, नागपूर विभाग यांनी दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी पासून मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथे रा. प. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीकारिता धरणे आंदोलन करण्याचे ठरविले आहे. प्रलंबित आर्थिक मागण्यांची सोडवणूक न झाल्यास १४ ऑक्टोबरपासून नागपूर विभागातील संयुक्त कृती समिती विभागीय कार्यालय,विभागीय कार्यशाळा व सर्व आगारात बेमुदत धरणे आंदोलन करेल.

त्याकरिता नागपूर विभागातील संयुक्त कृती समितीच्या वतीने विनोद चवरे विभाग नियंत्रक नागपुर विभाग तसेच प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभने साहेब यांना निवेदन देण्यात आले.

कृती समिती मधील महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार, कामगार सेनेच्या राज्य महिला संघटिका यामिनी कोंगे, महाराष्ट्र मोटार फेडरेशन चे विनोद कुमार धाबर्डे, कास्टट्राईब संघटना चे संग्राम जाधव, मकेश्वर जी, महाराष्ट्र परिवहन मजदूर युनियन चे मुन्ना मेश्राम, सुधाकर गजभिये, सोसायटी अध्यक्ष प्रशांत बोकडे, जेष्ठ नेते अरुण भागवत, मुरलीधर गुरपुडे, संघटनेचे विभागीय अध्यक्ष जगदीश पाटमासे, कृष्णकुमार शेरकर, शशिकांत वानखेडे, अतुल निंबाळकर, गजानन दमकोंडवार, प्रवीण अंजनकर, लक्ष्मीकांत चौधरी, डीमोले जी, नितेश साकरकर, शर्माजी, संदीप गडकीने, रितेश देशमुख, दिनेश पारडकर यांच्या सह मोठ्या प्रमाणात कृती समितीचे सभासद उपस्थित होते.

# जानवी देशमुख नगराध्यक्ष पदाकरिता उतरणार मैदानात



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १० :

काटोल नगर परिषद ओबीसी महिला नगराध्यक्ष पदासाठी आरक्षित असल्याने शिवसेनेचे मिलिंद देशमुख यांची पत्नी जानवी देशमुख शिवसेना (उबाटा) गटाकडून निवडणूक रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जानवी देशमुख या उच्चशिक्षित असून त्यांचे शिक्षण, एम ए इंग्लिश, एम ए पॉलिटिकल सायन्स, पुसद शहरातून शिक्षण पूर्ण केले.

अनेक वर्षापासून सामाजिक धार्मिक सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय असून प्रशासनाने काटोल नगरपरिषद नगराध्यक्ष पद महिला ओबीसीसाठी राखीव असल्याचे घोषित करताच राजकीय हालचालींना वेग आला आहे. इंडियन नृत्य स्पर्धा, गरबा नृत्य, कोरोना काळात रुग्णाची सेवा करणाऱ्या आशा वर्करांना साडीचोळी देऊन सन्मान करण्यात केला होता. तसेच गोरगरिबांची सेवा अन्नदान,रक्तदान शिबिराच्या आयोजन करून त्यांनी सामाजिक क्षेत्रात आपला नावाचा ठसा उमटविला होता. शिवसेना (उबाटा) गटाकडून काटोल नगराध्यक्ष पदाची निवडणूक जानवी देशमुख लढणार असल्याची माहिती जानता राजा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद देशमुख यांनी दिले आहे.

नगराध्यक्ष पद हे जनतेतून निवडून दिले जाणार असल्याने जानवी देशमुख हे येत्या निवडणुकीत कोणाला टक्कर देतील यावर काटोलकरांचे लक्ष वेधले आहेत.

# कोजागिरी कार्यक्रमातून अबालवृद्धांनी लुटला आनंद

▼ पंचवटी वासियांचा स्तुत्य उपक्रम ▼ विविधांगी स्पर्धेतून बक्षीसांची लूट ▼ ज्येष्ठांचाही सहभाग



कोजागिरी पौर्णिमेच्या कार्यक्रमात सहभागी सर्व पंचवटीवासीय

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १० :

परिसरात उभारलेला रंगीबेरंगी शामियाना, त्यात बच्चे कंपनीसाठी आयोजित केलेल्या एकापेक्षा एक सरस स्पर्धा, स्पर्धेतील त्यांचा अलोट उत्साह, दिमतीला चिमुकल्यांचा नृत्याविष्कार, स्पर्धेत विजयी ठरल्यावर चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद, त्यानंतर विजेत्यांवर होणारी बक्षिसांची लूट, बाजूलाच स्वयंपाकाची लगबग आणि खमंग जेवणासोबतच बासुंदीच्या दुधाचा गोडवा.

हे सर्व दृश्य होते काल संपन्न झालेल्या पंचवटीतील कोजागिरी कार्यक्रमाचे. पंचवटी वसाहतीतील नागरिकांनी लोकसभागातून कोजागिरी कार्यक्रम उभा केला. कार्यक्रमाला अबाल वृद्धांसह परिसरातील ज्येष्ठांनीही उत्साहाने सहभागी होऊन एकप्रकारे सामाजिक सलोख्याचे दर्शन घडविले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसाहतीत राहणारे माजी सैनिक शेखरजी पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून रमेश पोतदार, धनराज सावरकर, विजय गुडधे, श्रीरामजी ढोक, राजेश ठाकरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. कार्यक्रमात वसाहतीतील लहान मुले, महिला व कपलकरीता विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या.

ज्यामध्ये सर्वांनी उत्साहाने सहभागी होऊन यथेच्छ आनंद लुटला. विजेत्यांवर भरघोस बक्षिसांची लयलूट करण्यात आली. सर्वांनी खमंग जेवणावर ताव मारीत बासुंदीच्या दुधाचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिनेश निंबाळकर, प्रस्ताविक महेंद्र साव तर आभार प्रशांत मोरे यांनी मांडले.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी विजय गुडधे, महेश वाघ, महेश दळवी, संदीप पांडव, राजेश धपके, राहुल धोटे, मनोहर कोंडे, अशोक बोंद्रे, प्रमोद पांडव, मंगेश कुंभारे, मोरेश्वर नागमोते, हेमंत कुकडे, गणपत पाचपोर, अमोल खोरणे, विनोद ढोक, प्रथमेश गुडधे, दीपक ढोरे, तुषार ढोक, सचिन ढोरे, पीयूष पांडव आदींनी अथक परिश्रम घेतलेत.

## ४ दिवसांपासून हवालदार बेपत्ता

नागपूर: गोरेवाडा येथे ट्रॅकिंगला जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडलेला पोलिस हवालदार अचानक बेपत्ता झाला. चिंताग्रस्त नातेवाईकांनी हुडकेश्वर पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली असून त्याचा शोध सुरू आहे. रवींद्र हिम्मतराव पाटील (४९) रा.चक्रधरनगर, असे बेपत्ता झालेल्या पोलिस हवालदाराचे नाव आहे. या घटनेमुळे पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवींद्र पाटील हे सक्करदरा पोलिस ठाण्यात कार्यरत आहेत. गत ४ ऑक्टोबर रोजी त्यांना गोरेवाडामध्ये ट्रॅकिंगला जायचे होते. त्यामुळे ते सकाळी उठून तयार झाले. कुटुंबीयांना ट्रॅकिंगला जात असल्याची माहिती दिली आणि घराबाहेर पडले. मात्र सायंकाळी नेहमीप्रमाणे ते घरी परतले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना फोन लावला. मात्र, त्यांचा फोन बंद येत होता. कुण्या मित्राकडे गेले असतील, असे वाटल्याने कुटुंबीयांनी त्यांची वाट बघितली. दिवसभर शोध घेतल्यानंतरही कोणतीही माहिती न मिळाल्याने कुटुंबीयांनी हुडकेश्वर पोलिस स्टेशन गाठून ते बेपत्ता असल्याची तक्रार दिली. पोलिसांनी काही सीसीटीव्ही फुटेज काढले असून तपास सुरू केला आहे.

# आधुनिक जीवनशैलीमुळे वाढतोयब 'फ्रोझन शोल्डर': डॉ आशिष सावरकर



■ महासागर प्रतिनिधी
मौदा , दि. १० :

सध्या ज्येष्ठ नागरिकच नव्हे तर तरुण मुलांमध्येही खांदेदुखीची समस्या आढळून येत आहे. खांद्याच्या वेदना वाढत असतील तर हा 'फ्रोझन शोल्डर' तर नाही ना?, यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. साधारणतः खांद्याच्या दुखण्याकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. मात्र, असे करणे धोक्याचे ठरू शकते. यातून 'फ्रोझन शोल्डर' होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे अधूनमधून खांदे दुखत असल्यास वेळीच अस्थिरोग तज्ञांना दाखवून उपचार करावा, असा सल्ला अस्थिरोग तज्ञ डॉ. आशीष सावरकर यांनी दिला.

चाळीस वर्ष असलेल्या किंवा त्याहून अधिक वयाच्या व्यक्ती, महिलांना, गोठलेल्या खांद्यांबद्दल वाढीव संवेदनशीलतेचा सामना करावा लागतो. मधुमेहासारखी विशिष्ट परिस्थिती असलेल्या व्यक्ती, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग किंवा पार्किन्सन यामुळे 'फ्रोझन शोल्डर' विकसित होण्याची शक्यता असते. चाळीशीनंतर फ्रोझन शोल्डरचा धोका अधिक असतो. खांदे दुखणे आणि नीट काम न करणे ही त्यातील प्रमुख लक्षणे आहेत. फ्रोझन शोल्डरमुळे माणसाला दैनंदिन काम खूप अडचणी येतात.

**फ्रोझन शोल्डरची कारणे....!!!!**

खांद्याच्या जॉईटच्या बाहेर एक कॅप्सूल असते. गोठलेल्या खांद्यामध्ये ही कॅप्सूल कठोर किंवा कडक होते. ज्यामुळे खांद्याची हालचाल खूप कमी होते. ही समस्या कोणामध्येही उद्भवू शकते. परंतु, दीर्घकाळ खांदा स्थिर राहिल्यानंतर, जसे की शस्त्रक्रिया किंवा हातास फॅक्चर झाल्यानंतर फ्रोझन शोल्डर होण्याची शक्यता जास्त असते.

**काय काळजी घ्याल?**

फ्रोझन शोल्डर साधारणतः वयाच्या चाळिशीनंतर होण्याचा धोका असतो. महिलांना अधिक धोका असतो. खांद्याची नियमित हालचाल करणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम करावा, एखाद्या वेळेस अपघात झाला आणि योग्य उपचार झाला नाही तर फ्रोझन शोल्डर होण्याचा धोका अधिक असतो. खांद्याच्या स्नायूमध्ये कडकपणा आल्यास फ्रोझन शोल्डरचा अधिक त्रास असतो. यात तीव्र वेदना होत असतात. साधारणतः वयाच्या चाळिशीनंतर फ्रोझन शोल्डरचा धोका अधिक असतो. त्यामुळे या काळात अधिक काळजी घेणे गरजेचे असते. मधुमेहाची व्याधी असणाऱ्यांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. खांद्यामध्ये सतत दुखत असेल तर दुर्लक्ष न करता अस्थिरोग तज्ज्ञांना दाखवून उपचार घ्यावा.

# चोवीस तास पाणी पुरवठ्याचे काय झाले?

## केंद्रीय मंत्री गडकरी यांची प्रशासनाला विचारणा : प्रकल्पाचा घेतला आढावा

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० :**
नागपुरात चोवीस बाय सात पाणीपुरवठा योजनेंतर्गत जलकुंभांचे बांधकाम सुरू आहे. यातील काही जलकुंभांचे काम अद्याप पूर्ण व्हायचे आहे. तर काहींचे काम पूर्ण होऊनही पाणीपुरवठ्याचे ट्रायल सुरू आहे.

यासंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवार १० ऑक्टोबर रोजी प्रशासनाला विचारणा केली. प्रकल्पाच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला.

गडकरी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला आमदार कृष्णा खोपडे, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, एमएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक ब्रजेश दीक्षित, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, ओसीडब्ल्यूचे सीईओ निलेश सिंग यांची उपस्थिती होती.



एकुण ३२ जलकुंभांपैकी २९ जलकुंभांचे काम पूर्ण झाले आहे. एका जलकुंभाचे बांधकाम अद्याप पूर्ण व्हायचे आहे. तर इतर दोन जलकुंभांचे बांधकाम पूर्ण होऊनही अद्याप ट्रायल सुरू आहे. या जलकुंभांना तातडीने कार्यान्वित करून नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा होईल, याची काळजी घ्यावी. विशेषतः पुनापूर, भरतपूर या स्मार्ट सिटी परिसरांमध्ये चार जलकुंभांचे बांधकाम व कार्यान्वन लवकरात लवकर करावे, अश्या सूचनाही गडकरी यांनी दिल्या.

डिक दवाखाना, नेताजी मार्केट, कॉटन मार्केट - टप्पा १, संत्रा मार्केट - टप्पा १, इतवारी बाजार आदी महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या संदर्भातही ना. श्री. गडकरी यांनी आढावा घेतला. या प्रकल्पांचे काम एमएसआयडीसीला दिले आहेत. यावेळी डिक दवाखाना आणि कॉटन मार्केटच्या कामांच्या निविदा काढण्यात आल्याची माहिती मंत्र्यांना देण्यात आली.

या प्रकल्पांमध्ये परिसरातील अधिकृत गाळेधारक, लीजधारक व परवानाधारकांना सामावून घेऊन पुढील प्रक्रिया वेगाने करण्याच्या सूचना गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## बेकायदा संपाविरुद्ध महावितरण
# औद्योगिक न्यायालयात

### सात संघटनांच्या संयुक्त कृती समितीची संपातून माघार

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० :**
कामगार आयुक्त कार्यालयात समेट प्रकरणावर कार्यवाही सुरू असताना ७२ तासांच्या बेकायदा संपावर जाणाऱ्या ७ वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीविरुद्ध महावितरणकडून मुंबई औद्योगिक न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली.

त्यावर शुक्रवार १० ऑक्टोबर झालेल्या सुनावणी दरम्यान संयुक्त कृती समितीने संपातून २४ तासानंतर माघार घेत असल्याचे जाहीर केले.

दरम्यान, गेल्या दीड दिवसांच्या संपकाळात महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमध्ये ६२.५६ टक्के अभियंते, अधिकारी व कर्मचारी कार्यालयांत उपस्थित होते तर ३७.४४ टक्के कर्मचारी या संपात सहभागी झाले होते. प्रामुख्याने महावितरणमधील पुनर्रचना व इतर मागण्यांबाबत महवितरणमधील २९ पैकी ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने ७२ तासांच्या संपाची नोटीस दिली होती.

। संप टाळण्यासाठी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), राजेद्र पवार (मानव संसाधन) यांनी स्वतंत्र बैठकी घेऊन सकारात्मक व मागण्यांशी सुसंगत भूमिका जाहीर केली. त्याप्रमाणे कृती समितीला बैठकीचे लेखी इतिवृत्त तसेच संप न करण्याचे आवाहन करणारे पत्रेही देण्यात आले.

कर्मचारी संघटनांच्या मागणीप्रमाणे व ग्राहकसेवा गतिमान करण्यासाठी पुनर्रचनेनुसार उपविभागांचे कामकाज प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आले आहे. या प्रायोगिक कालावधीत आवश्यकतेनुसार फेरबदल किंवा दुरूस्ती करून संघटना व व्यवस्थापनाच्या सहमतीनंतरच पुनर्रचनेच्या अंमलबजावणीबाबत अंतिम आदेश काढण्यात येईल हेही स्पष्ट करण्यात आले. मात्र संयुक्त कृती समितीने त्यासही दाद दिली नाही.

सध्या महाराष्ट्र अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या संकटातून सावरत आहे. सर्व शासकीय यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहेत. दिवाळी सण देखील काही दिवसांवर आला आहे.

पूर परिस्थितीच्या संकट काळात तसेच सणासुदीच्या दिवसांत संप टाळून नागरिकांना वीज सेवा देण्याचे कर्तव्य बजवावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले. त्यालाही संयुक्त कृती समितीने प्रतिसाद दिला नाही.

दरम्यान, संपाची नोटीस मिळताच औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत मुंबई येथील कामगार आयुक्त कार्यालयात समेटासाठी महावितरणकडून प्रकरण दाखल करण्यात आले होते. समेट प्रकरणावर कार्यवाही सुरू असताना संप करता येत नाही अशी कायद्यात तरतूद आहे. तसेच वीज ही अत्यावश्यक सेवा आहे व राज्यात महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू असल्याने हा संप करू नये असे आवाहन महावितरण व्यवस्थापनाकडून करण्यात आले होते.

मात्र समेट प्रकरणावर कार्यवाही सुरु असताना संयुक्त कृती समितीने गुरुवारी संपाला सुरवात केली. त्यामुळे या बेकायदा संपाविरुद्ध मा. औद्योगिक न्यायालयामध्ये महावितरणने याचिका दाखल केली.

ही याचिका दाखल करून घेत न्यायालयाने कृती समितीला नोटीस बजावली. शुक्रवारी सकाळी न्यायालयात याचिकेवर सुनावणी सुरु झाल्यानंतर संयुक्त कृती समितीने हा संप २४ तासांनंतर मागे घेत असल्याचे जाहीर केले.

## आग्नेय मध्य रेल्वेची निरोगी महिला - सक्षम कुटुंब मोहिम
# कालावधीत १८ ऑक्टोबरपर्यंत वाढ





**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
आग्नेय मध्य रेल्वेमध्ये राबविण्यात येणाऱ्या निरोगी महिला - सक्षम कुटुंब मोहिमेला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे आणि जास्तीत जास्त महिला कर्मचारी आणि त्यांच्या अवलंबितांना याचा फायदा व्हावा या उद्देशाने, या मोहिमेचा कालावधी ०४ ऑक्टोबर वरून १८ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आला आहे.

ही मोहीम आग्नेय मध्य रेल्वेच्या वैद्यकीय विभागाद्वारे आयोजित आणि समन्वयित केली जात आहे. या मोहिमेचा प्राथमिक उद्देश प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांमध्ये शक्य तितक्या जास्त महिला कर्मचारी आणि त्यांच्या अवलंबित लाभार्थ्यांना समाविष्ट करणे आहे, ज्यामुळे आरोग्य तपासणी आणि लवकर रोग ओळखून महिलांचे आरोग्य संरक्षण बळकट होईल.

या मोहिमेचा विस्तार करण्यासाठी, ८ ऑक्टोबर रोजी संपूर्ण झोनमध्ये एकूण १४ महिला आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. ही शिबिरे बिलासपूर , रायपूर आणि नागपूर विभागातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आली होती, ज्यात बिलासपूर येथील सेंट्रल हॉस्पिटलचा समावेश होता . महिला कर्मचारी आणि रेल्वे कर्मचा?यांच्या आश्रितांनी या शिबिरांमध्ये लक्षणीय सहभाग घेतला.

शिबिरांमध्ये, एकुण ४८६ महिलांची उच्च रक्तदाब , मधुमेह आणि लठ्ठपणासाठी , ३६६ महिलांची कर्करोगासाठी, ३५८ महिलांची अशक्तपणासाठी आणि ३५ महिलांची प्रसूतीपूर्व तपासणी करण्यात आली. सर्व लाभार्थ्यांना त्यांच्या चाचणी निकालांवर आधारित आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला आणि नियमित फॉलो-अप चाचण्यांचे वेळापत्रक तयार करण्यास मार्गदर्शन करण्यात आले.

निरोगी महिला - सक्षम कुटुंब मोहीमचे उद्दिष्ट महिलांचे आरोग्य आणि कल्याण मजबूत करणे, रोगांचे लवकर निदान सुनिश्चित करणे आणि निरोगी महिला - सक्षम कुटुंब हा संदेश व्यापकपणे प्रसारित करणे आहे. आग्नेय मध्य रेल्वेचा हा उपक्रम संस्थेमध्ये महिला सक्षमीकरण आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्रोत्साहन देण्यासाठी एक प्रशंसनीय पाऊल आहे.

## विदर्भ साहित्य संघात आज रंगणार
# अभिजात मराठीवर परिसंवाद

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राज्य शासनाच्यावतीने अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याअंतर्गत विदर्भ साहित्य संघाच्या वतीने शनिवार ११ ऑक्टोबर रोजी अभिजात मराठी आणि आजचे वास्तव या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या चौथ्या माळ्यावरील अमेय दालनात सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर आणि विशेष अतिथी म्हणून आमदार संदीप जोशी उपस्थित राहतील.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. मोना चिमोटे आपले विचार व्यक्त करतील.

विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र डोळके हे भूमिका मांडणार असून मराठी प्रेमींनी व साहित्यिकांनी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये द्या



शिवसेना उबाठा पक्षाची मागणी

**■ महासागर प्रतिनिधी**
**भिवापूर, दि. १० :**
विधानसभा निवडणूकीच्या वेळी सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्ज मुक्तीचे आश्वासन दिले होते. परंतू एक वर्ष होवून सरकारने आश्वासन पाळले नाही. अतिवृष्टीमुळे शेतकरी आर्थीक अडचणीत सापडला असून, हेक्टरी ५० हजार रूपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी शिवसेना उपजिल्हा प्रमुख संदीप निंबार्ते यांच्या नेतृत्वात तहसिलदार बाबासाहेब टेळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी नागपूर यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

पिक विम्याचे निकष बदलवून विम्याची रक्कम शेतकऱ्यांना द्यावी, घरे व पशुधनाची नुकसान भरपाई देण्यात यावी आदि मागण्याही निवेदनात करण्यात आल्या आहेत. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख श्रेयस जैयस्वाल, तास विभाग प्रमुख प्रदिप वैदय, संतोष धरत, धनराज नागपूरे, प्रभाकर कांबळी, अशोक गौर, राजू उरकुडे, अशोक गौर उपस्थित होते.

# १२८८ वाहन चालकांवर कारवाई

**■ महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १० :**
वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण १२८८ वाहन चालकांवर कारवाई करून ३,३३,५०० रुपयांचा दंड वसूल केला.

त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये १२ प्रकरणात १२ आरोपींवर कारवाई करून १९,२३१ रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये २ प्रकरणात ६ आरोपींवर कारवाई करून ७५,०३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# टिप्परने तरूणाला चिरडले

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
अमरावती मार्गावरील आठवा मैल येथील डिन्स गेटसमोर टिप्परखाली सापडून एका पादचारी इसमाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. शुक्रवारी दुपारी ३.४५ च्या सुमारास ही घटना घडली. विकास सुरेश तेलमोरे (वय ३३), रा. रामजी आंबेडकरनगर असे मृताचे नाव आहे.

घटनेच्या वेळी तेलमोरे हे रस्त्याने पायी जात होते. त्याचवेळी नागपूरकडून येणाऱ्या एमएच ४० बाय ९५४१ क्रमांकाचा टिप्परचालकाचे संतूलन बिघडले आणि तेलमोरे हे मागील चाकात सापडून जागीच ठार झाले. याप्रकरणी वाडी पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

## लोकनाथ यशवंत यांची 'कथा' ही कविता नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० :**
नागपूर विद्यापीठाच्या विज्ञान स्नातक द्वितीय वर्षासाठी (सत्र -३) मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक' अक्षर साहित्य' यात लोकनाथ यशवंत यांची कथा' ही कविता अर्तभूत करण्यात आली आहे.



सोबत कवी विंदा करंदीकर, ग्रेस, मधुकर केचे असे एकूण चार कवी निवडले गेले आहेत. लोकनाथ यशवंत यांची कथा' ही कविता 'आता होऊन जाऊ द्या!' या कविता संग्रहातून घेण्यात आली आहे.

बी.एससी, बी.एससी (आय.टी), बी.एससी (डाटा सायन्स), बी.एस सी (ए. आय-कृत्रिम बुद्धीमत्ता) आणि बी.सी.ए. या अभ्यासक्रमासाठी रक्षा फक्त चार कवितांचा समावेश करण्यात आला आहे.

## डागा रूग्णालयाचे संबधित डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर
# गुन्हे दाखल करा

### आमदार प्रविण दटके यांची आरोग्य मंत्र्यांकडे मागणी



**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
प्रसुतीची शस्त्रक्रिया करताना निष्काळजीपणा करीत महिलेच्या आतड्यांवर शस्त्राची जखम करणाऱ्या डागा रूग्णालयाचे संबंधित डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आमदार प्रविण दटके यांनी केली आहे . यासंदर्भात त्यांनी आरोग्य मंत्र्यांना तक्रार पाठविल्याची माहिती आहे.

कुंदनलाल गुप्ता नगर, नागपूर येथील रीना योगेश गोन्नाडे या महिलेला २५ सप्टेंबर रोजी प्रसुतीसाठी डागा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी २६ ला सकाळी १० वाजता सिजेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याचवेळी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आली.

शस्त्रक्रियेनंतर त्या महिलेचे पोट मोठ्या प्रमाणात फुगल्याचे दिसून आले. नातेवाईकांनी डॉक्टरला विचारणा केली असता ॲसिडिटी मुळे पाणी जमा झाले असून, आम्ही लक्ष देत असल्याचे त्यांनी सांगितले. महिलेची प्रकृती खालावत असल्याने नातेवाईकांनी रुग्णाला दुसऱ्या दवाखान्यात भरती करण्यासाठी धावाधाव केली . परंतु, एकही खाजगी रूग्णालय तिला घेण्यास तयार नव्हते.

दरम्यान, विशेष सर्जन बोलावून तपासणी करण्याची विनंती केली असता शस्त्रक्रिया करताना मोठ्या आतड्याला शस्त्र लागून जखम झाल्याचे सांगण्यात आले . नंतर या महिलेला मेडिकल हॉस्पिटलमध्ये नेऊन तिच्यावर पुन्हा शस्त्रक्रिया करण्यात आली.

या घटनेसंदर्भात माजी नगरसेवक भास्कर पराते यांना समजताच त्यांनी स्थानिक आमदार प्रविण दटके यांना माहिती दिली . आमदार प्रविण दटके यांनी तत्काळ संबधित अधिकारी यांचेशी चर्चा करून सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेशी सुद्धा फोन वर चर्चा केली.

डागा हॉस्पिटलचे संबधित अधिकारी, कर्मचारी आणि डॉक्टरवर जिवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल करावा आणि या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी आरोग्यमंत्री यांच्याकडे केली.

दरम्यान, या प्रकरणासंदर्भात आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भास्कर पराते यांच्या नेतृत्वात निवेदन सादर करण्यात आले. याप्रसंगी साहिल भनारकर, स्वामी माथनिकर, तारिका पाटील,प्रतिमा, अम्बोलिकर, निशा माथनिकर, सेवक माथनिकर, शेवंती भनारकर पायल अम्बोलिकर, रेणुका बारापात्रे उपस्थित होते.

डागा हॉस्पिटलमध्ये रूग्णांच्या जिवीताशी खेळण्याचे असे अनेक प्रकार यापूर्वी घडले आहेत . नाईक तलाव बांगलादेश येथील अंजली दिनेश मेंढेकर यांचा असाच डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाला होता.

## उठा उठा साधुसंत.... साधा आपुलें हित!!
# वाडी परिसरात काकड आरतीचा गजर





**■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १० :**
कोजागरी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवसापासून काकड आरतीला सुरुवात झाली. हिंदू धर्मात कार्तिक महिन्याला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. काकड आरती दरम्यान वारकरी, बालगोपाल एकत्र येत देवाला साकडे घालतात.

काकडा आरती म्हणजे हिंदू धर्मात देवाला जागविण्यासाठी केलेली आरती. मूर्तीला काकड्याने म्हणजे एक प्रकारच्या ज्योतीने ओवाळले जाते. म्हणून तिला काकडा आरती म्हणतात. वाडी येथील प्रत्येक हनुमान मंदीरात रोज पहाटे भूपाळीनंतर काकडा आरती केली जाते. काकडा आरतीने पहाटेच्या मंत्रमुग्ध वातावरणात दिवसाची सुरुवात होते.

बालगोपाल आणि वारकरी मंडळी एकत्र येत काकडा आरतीला प्रारंभ करतात.

*उठा उठा साधुसंत साधा आपुलें हित*
*जाईल हा नरदेहे मग कैचा भगवंत*
*उठोनि वेगेसी चला जाऊ राउळासी*
*जळती पातकांच्या राशी*
*काकड आरती देखिलिया ....*

संत नामदेव महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज,संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज यांच्या रचना काकडा आरती दरम्यान गायिल्या जातात. आरती झाल्यानंतर प्रसादाचे वितरण करण्यात येते.रोजच्या रोज नव-नवीन प्रसाद आणण्यासाठी भावीकांचा क्रम ठरत असतो यामुळे काकड आरतीसाठी भाविकांची मोठी गर्दी असते.

शुभारंभ सोसायटीमधील श्री हनुमान मंदीरातुन दररोज परिसरातुन प्रभातफेरी काढण्यात येत आहे. काकड आरती कार्यक्रमात विणेकरी ह.भ.प. प्रभाकर महाराज केदार, मुदंगवादक अरुण कराळे, गायन संजय टोळे, टाळकरी शरद टोळे,केशव बांदरे, सुभाष अंजीकर, चंद्रशेखर (बबलू) ढाकरिया, प्रकाश बारापात्रे, प्रकाश पडोळे, अनील गुप्ता, भिखुराम शर्मा, किसन हजारे, प्रभाकर धामनकर, मनोहर पिल्ले, विजय देशपांडे, रुपराव मोवाळे, महादेव मिश्रा, राजू सावंत, राजेंद्र मस्के, जैलाल मेश्राम, प्रकाश पडोळे, धुमाळ, पलाश आगरे, चिराग आगरे, महीला मंडळ सुरेखा बांदरे, कविता टोळे, निलीमा टोळे, सवीता टोळे, प्रतीभा उमाळे, संगीता वऱ्हाडे, शिला पडोळे, माधुरी भोंगळे, अर्चना उज्जैनकर, इंदू शर्मा, वनश्री देशपांडे, सीमा धुमाळ, बेबीताई माडेकर, बबीता आंजीकर, दिपा मस्के, रोहीणी मस्के, रिता मेश्राम, प्रतिक बांदरे आदीसह सोसायटी आणि परिसरातील शेकडो भावीक उपस्थित राहत आहेत.